19-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SMT/ 11:00

19-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SMT/ D/ 11:00

सभापतीस्थानी माननीय सभापती

प्रश्नोत्तरे

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

अल्पसंख्याकांसाठी दिलेल्या 51.80 कोटी रुपयांच्या निधीपैकी राज्याने केवळ 15.41 कोटी खर्च केल्याबाबत

(1) * 25942 श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.अरुण गुजराथी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.एम.एम.शेख , श्री.मोहन जोशी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.राजन तेली , श्री.नितीन गडकरी , श्री.विनोद तावडे , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो गाणार , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने अल्पसंख्याकाचे कल्याण व्हावे यासाठी राज्याने शासनास दिलेल्या 51.80 कोटी रुपयाच्या निधी पैकी केवळ 15.41 कोटी रुपये खर्च केल्याचे माहे जानेवारी,2011 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच उर्वरित निधी खर्च करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान : (1) नाही. केंद्र शासनाने बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी, बुलढाणा, वाशिम व हिंगोली या चार जिल्ह्यांकरिता जानेवारी, 2012 पर्यंत रु.51.60 कोटी इतका निधी वितरित केला आहे. त्यापैकी रु. 33.58 कोटी इतका निधी खर्च झाला आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) केंद्र शासनाकडून प्राप्त निधी संबंधित जिल्ह्यांना वितरित करण्यात आला आहे. कामे लवकर पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, केंद्र शासनाने अल्पसंख्याकाचे कल्याण व्हावे यासाठी राज्य शासनास दिलेल्या 51.80 कोटी रुपयाच्या निधी पैकी केवळ 15.41 रुपये खर्च केल्याचे माहे जानेवारी, 2011 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय? असा प्रश्न विचारण्यात आला होता त्याला दिलेल्या उत्तरात "नाही" असे म्हटले आहे. माझ्याकडे यादी प्राप्त आहे. अल्पसंख्याकासाठी जो निधी उपलब्ध झालेला आहे त्यापैकी शासनाने फक्त 54.16 टक्के निधी खर्च केलेला आहे. शासनाकडे जवळ जवळ 12 हजार 41 लाख रुपये निधी प्राप्त असताना त्यापैकी जवळ जवळ 11 हजार 911.85 लाख रुपये फेब्रुवारीपर्यंत खर्च झालेले आहेत. प्राप्त निधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SMT/ D/ 11:00

ता.प्र.क्र.25942. . .

श्री रमेश शेंडगे . . .

एकूण 15396 लाख रुपये इतका आहे. हा निधी अपुऱ्या प्रमाणात खर्च झालेला आहे त्याची कारणे काय आहेत? उर्वरित निधी कधी खर्च करण्यात येणार आहे? महाराष्ट्र शासन प्रत्येक शाळेला पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी दोन लाख रुपये निधी देते. यासाठी राज्यभरातून 2400 अर्ज प्राप्त झालेले असताना सुध्दा जिल्हाधिकाऱ्यामार्फत किंवा ज्या विभागामार्फत तो निधी वितरित करावयास पाहिजे होता तो वितरित झालेला नाही, तो वितरित न होण्याची कारणे काय आहेत आणि हा संपूर्ण निधी केव्हा खर्च करण्यात येणार आहे?

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, पहिल्यांदा मला या ठिकाणी असे निवेदन करावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी केंद्र शासनाने अल्पसंख्याकाचे कल्याण व्हावे यासाठी राज्य शासनाला जो निधी दिलेला आहे तो खर्च झालेला नाही अशा प्रकारचा प्रश्न विचारलेला आहे. एमएसडीपी योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल जिल्ह्याचा विकास करण्यासाठी या राज्यातील चार जिल्हयांची निवड केंद्र शासनाने केलेली आहे. त्या चारही जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने 60 कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी आतापर्यंत 51 कोटी 60 लाख रुपये पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी 76 टक्के पैसे खर्चही झालेले आहेत. बाकीचे सर्व पैसे या मार्च महिन्याच्या अगोदर खर्च होण्याची शक्यता आहे, हा या प्रश्नाचा एक भाग आहे. पायाभूत सुविधांच्या नावाखाली अल्पसंख्यांक शाळांना शासनाकडून जे पैसे देण्यात येतात त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारलेला आहे, तो वेगळा प्रश्न आहे. तरी सुध्दा या संदर्भात जो क्रायटेरिया ठरविण्यात आलेला आहे त्याप्रमाणे पायाभूत सुविधांच्या योजनेंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शिफारस होऊन ज्या शाळा येतात त्या शाळांना नियमाप्रमाणे निधी वितरित करण्यात येतो त्याप्रमाणे या वर्षी सुध्दा तो वितरित करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अल्पसंख्यांकाच्या विकासासाठी अतिशय महत्वाच्या अशा योजना आहेत आणि या योजनांसाठी विलंबाने निधी वितरित होणार असेल तर जो विकास अपेक्षित आहे तो होण्यामध्ये अडचणी येतात. आतापर्यंत जो निधी खर्च केलेला आहे तो या चार जिल्ह्यांमध्ये कुठल्या-कुठल्या कामांवर खर्च झालेला आहे याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, बुलढाणा, परभणी, हिंगोली आणि वाशिम या चार जिल्ह्यांची अल्पसंख्याक बहूल जिल्हे म्हणून केंद्र शासनाने निवड केली होती. बुलढाण्यामध्ये 3000 घरकुले बांधण्याचा प्रस्ताव आहे. तसेच 237 अंगणवाडया बांधण्याचा प्रस्ताव आहे. हिंगोलीमध्ये 3730 घरकुले बांधण्याचा प्रस्ताव आहे. तसेच 42 अंगणवाड्या बांधण्याचा प्रस्ताव असून 2 मुलींची वसतिगृहे बांधण्याचा प्रस्ताव आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परभणी जिल्ह्यामध्ये घरकुले 2200, अंगणवाड्या 215, मुलींची वसतिगृहे 2, वाशिम जिल्ह्यामध्ये घरकुले 2740, अंगणवाड्या 132, मुलींची वसतिगृहे 2 अशा प्रकारच्या योजना प्रस्तावित झालेल्या आहेत. यापैकी किती घरकुले तयार झाली आणि प्रगतिपथावर किती आहेत हे मी सांगू इच्छितो. बुलढाण्यामध्ये 1405 घरकुले तयार झालेली आहेत आणि 1595 प्रगतिपथावर आहेत. ती कामे लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे. अंगणवाड्यांची कामे प्रगतिपथावर असून ती लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे. हिंगोलीमध्ये 2040 घरकुले तयार झालेली असून बाकीची कामे प्रगतिपथावर आहेत. ती कामे लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे चारही जिल्ह्यांमध्ये तीनही प्रकारच्या ज्या योजना त्या अर्ध्या तयार झालेल्या आहेत आणि अर्ध्या प्रगतिपथावर असून लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, केंद्र शासन अल्पसंख्यांकासाठी योजना आखत आहे आणि महाराष्ट्र शासनाकडे पैसे पाठवित आहे. परंतु अल्पसंख्यांक समाजासाठी ज्या योजना येतात त्या त्यांच्यापर्यंत न पोहोचविण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे आणि त्याचे उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विचारलेला प्रश्न आहे. एवढेच नव्हे तर केंद्र सरकार महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप सुध्दा देते. सन 2009-2010, 2010-2011 आणि 2011-2012 या तीन वर्षामध्ये आलेला निधी खर्च झालेला नाही हे खरे आहे का ? 2011-2012 साठी केंद्र शासनाकडून आपल्याकडे स्कॉलरशीपसाठी निधी उपलब्ध झालेला आहे पण बँका खाते उघडत नाहीत. महाराष्ट्र बँक, इंडियन बँक खाते उघडत नाही. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये 8 हजार विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप मंजूर झाली पण कोणतीही बँक त्यासाठी खाते उघडण्यास तयार नाही. या बाबतीत शासन काय पावले उचलणार आहे ?

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, केंद्र शासनाची जी स्कॉलरशीप योजना आहे ती बँकेमार्फत वितरित करण्याची योजना आहे आणि तशा प्रकारचे निर्देश बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी केलेली तक्रार खरी आहे. ती तक्रार माझ्या सुध्दा लक्षात आलेली आहे. मी लवकरात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लवकर बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन त्यांना तशा प्रकारची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत निवेदन करणार आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अल्पसंख्यांक समाजासाठी केंद शासनाच्या ज्या योजना आहेत त्या योजनांतर्गत जे पैसे येतात त्या निधीचा वापर होत नाही असा विषय होता. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यासाठी निधी आला, आम्ही खर्च करीत आहोत आणि उर्वरित निधी सुध्दा खर्च होणार आहे. या अल्पसंख्यांक समाजासाठी ज्या वेगवेगळ्या योजना आहेत त्याची फक्त घोषणा होते परंतु त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे या लोकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. अल्पसंख्यांक विभागाने उर्दू शाळेतील मराठी शिक्षकांसाठी योजना सुरु केली. परंतु गेल्या 10 महिन्यापासून त्यांना मानधन मिळालेले नाही. वारंवार पत्रव्यवहार करुनही त्याची दखल घेतलेली नाही. ते मानधन त्यांना किती दिवसामध्ये देणार ? मी एका तालुक्याचे उदाहरण देतो. सन 2008-2009, 2009-2010 आणि 2010-2011 या तीन वर्षाचे भिवंडी तालुक्यातील 144, 146 आणि 164 उर्दू शाळेतील शिक्षकांना अद्याप मानधन दिलेले नाही. एका बाजूला जे पैसे येतात ते आपण खर्च करतो असे सांगितले जाते आणि त्या ठिकाणी तीन-तीन वर्षाचे मानधन मिळत नाही. ते मानधन किती दिवसांमध्ये देणार ? 11 जानेवारीला या संदर्भात मी शासनाला निवेदन दिलेले आहे. त्याचे उत्तर मिळालेले नाही. त्यावर किती दिवसात कार्यवाही करणार ?

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला तो वेगळा आहे. तरी सुध्दा भिवंडी विभागाची जी तक्रार सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे त्याची माहिती घेऊन त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, केंद्र शासनाने 60 कोटी रुपये मंजूर केले आणि त्यापैकी 51 कोटी 60 लाख रुपये मिळाले. हे वर्ष संपण्यासाठी आता फक्त 11 दिवस राहिलेले आहेत. हे 8 कोटी 40 लाख रुपये केंद्र शासनाकडून त्वरेने मिळविण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे आणि उर्वरित 8 कोटी 2 लाख रुपये खर्च होतील याची खात्री शासन देणार का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25942....

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान : केंद्र शासनाच्या विभागाच्या माध्यमातून परस्पर कार्यवाही झालेली आहे. दिनांक 31 मार्च पूर्वी सर्व निधी मिळेल.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

आष्टी (जि.बीड) तालुक्यातील उसतोड कामगारांना सोयी सुविधा पुरविण्याबाबत

(2) * 25916 ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे, श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आष्टी (जि.बीड) तालुक्यातील 50 हजार ऊसतोड कामगारांना स्थलांतरित झाले असता गट शिक्षण अधिका-यांनी केवळ साडेबारा हजार उसतोड स्थलांतरित झाल्याची नोंद केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आष्टी तालुक्यातील सर्वच उसतोड कामगारांना शासनाच्यावतीने देण्यात येणा-या विविध सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. आष्टी (जि.बीड) तालुक्यातून एकूण 6731 पाल्यांचे पालक स्थलांतरित झाले आहेत.

(2) व (3) ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आष्टी तालुक्यामध्ये 23 हंगामी निवासी वसतिगृहे चालू करण्यात आली असून याचा लाभ 1109 विद्यार्थी घेत आहेत. तर इतर 5622 विद्यार्थ्यांची सोय नातेवाईकांकडे झालेली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांसंबंधी हा प्रश्न विचारलेला आहे. या कामगारांची संख्या 50 हजार असताना स्थलांतरित झालेल्या ऊसतोड कामगारांची संख्या केवळ 12 हजार 500 असल्याची नोंद करण्यात आलेली आहे. शासनाकडे असलेल्या आकडेवारीपैकी कोणती संख्या बरोबर आहे ? या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी हंगामी निवासी वसतिगृहे चालू करण्यात आली आहेत. या वसतिगृहांचा लाभ 1109 विद्यार्थी घेत असल्याचे नमूद केलेले आहे. उर्वरित मुले कोठे शिक्षण घेत आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आष्टी तालुक्यात 23 निवासी वसतिगहे चालू आहेत. त्याचा 1109 विद्यार्थी लाभ घेत आहेत. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांची संख्या 6731 इतकी असून 5622 विद्यार्थ्यांची सोय नातेवाईकांकडे केलेली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, बीड जिल्हा संपूर्ण महाराष्ट्रात ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या कामगारांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्या पाल्यांसाठी सातत्याने शासनाकडून व्यवस्था केली जाते. हा प्रश्न आष्टी तालुक्याचा असला तरी संपूर्ण बीड

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25916... श्री.विक्रम काळे....

जिल्ह्यासाठी महत्वाचा प्रश्न आहे. बीड जिल्ह्यात आज रोजी सुरु केलेल्या वसतिगृहांची संख्या किती आहे आणि त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ?

प्रा.फौजिया खान : बीड जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांची संख्या 49,565 इतकी आहे. आज रोजी 2478 केंद्रे मंजूर आहेत, त्यापैकी 352 केंद्रे सुरु केलेली आहेत. प्रत्यक्षात लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 16,588 इतकी आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ऊसतोड कामगारांच्या मुलांचा सातत्याने प्रश्न उपस्थित होतो. गेल्या वर्षी शासनाने पटपडताळणी केली होती, त्यामध्ये तथाकथित बोगस विद्यार्थ्यांचे आकडे प्रसिध्द झाले होते. त्यामध्ये ऊसतोड मजुरांच्या मुलांची संख्या किती होती आणि त्या मुलांना पुन्हा शाळेत घालण्यासाठी व त्यांचे शिक्षण कन्टीन्यू राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? कारण 50 हजार ऊसतोड कामगारांची संख्या असताना शासनाने फक्त 16 हजार विद्यार्थ्यांची व्यवस्था केलेली आहे असे मंत्री महोदयांच्या उत्तरातच आलेले आहे.

प्रा.फौजिया खान : 50 हजार मंजूर संख्या आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. या ज्या लाभार्थ्यांनी नोंद केलेली आहे त्यांची संख्या 16 हजार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, लाभार्थ्यांची नोंद करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ऊसतोड मजूर नोंद करण्यासाठी जाऊ शकत नाही. कारण हे ऊसतोड मजूर एका गावातून दुसऱ्या गावामध्ये जातात. हा वर्ग अशिक्षित आहे, ही गरीब मुले आहेत. स्थलांतरित वर्गाकडे शासन कमालीचे दुर्लक्ष करीत आले आहे, त्यांची शासन कशा प्रकारे जबाबदारी घेणार आहे, येत्या जून महिन्यापासून या सर्व मुलांची शिक्षणाची सोय करुन त्यांचे शिक्षण पूर्ववत चालू राहण्यासाठी शासन जबाबदारी घेईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सर्व विद्यार्थ्यांची सोय करण्याचीच ही योजना आहे. त्यामध्ये दोन प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. मूळ राहण्याच्या ठिकाणाहून ज्या ठिकाणी ते स्थलांतर करतात तेथे हंगामी वसतिगृह निर्माण केले जाते. ज्या मजुरांनी आपल्या विद्यार्थ्यांना त्यामध्ये ठेवलेले असते त्यांच्यासाठी शासन अनुदान देते. जर मुलांना घेऊन त्यांनी स्थलांतर केले आणि तेथे शाळेत प्रवेश घेतला तर त्यासाठी सुध्दा व्यवस्था केली जाते. शासनाने 'राईट टू

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25916..... प्रा.फौजिया खान...

एज्यूकेशन' या कायद्यानुसार 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलांना शाळेत जाण्याचा अधिकार दिलेला आहे. त्यानुसार त्या मुलांची सोय करणे, त्यासाठी सर्व उपलब्धता आहे की नाही हे बघणे ही जबाबदारी शासनाची आहे आणि त्याप्रमाणे शासन करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : केन्द्र आणि राज्य शासनाची ही योजना आहे. ऊसतोड कामगारांच्या 50 हजार पाल्यांसाठी करावयाची व्यवस्था या दृष्टीने हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. या मुलांना शालेय शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : राज्य शासनातर्फे अनेक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. विशेषत: बीड जिल्ह्यामध्ये शेतक-यांच्या संदर्भात असेसमेंट सुपरव्हिजन करण्यासाठी बीड जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच ऊसतोड कामगार स्थलांतरित झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एका नोडल व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यशदा मार्फत सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. अवतीभोवती असलेल्या कारखान्यामध्ये किती मुले आहेत, मुलांना कोणकोणत्या सुविधा आहेत इत्यादी पाहणी करुन अनेक उपाय योजलेले आहेत.

डॉ. नीलम गो-हे : हा ऊसतोड कामगारांचा प्रश्न सातत्याने या सभागृहामध्ये मांडला जात आहे. जेव्हा आष्टी तालुक्याची चर्चा होत असते त्यावेळी संपूर्ण राज्यासंबंधीचे उत्तर दिले जाते आणि जेव्हा सबंध राज्याचा प्रश्न विचारला जातो त्यावेळी एखाद्या तालुक्यासंबंधीचे उत्तर दिले जाते. तेव्हा हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे. उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, 5622 विद्यार्थ्यांची सोय नातेवाईकांकडे झालेली आहे. या विद्यार्थ्यांना कोणत्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत ? तसेच वसतिगृहामध्ये किती मुले राहिलेली आहेत आणि इतरत्र किती मुलांची सोय झालेली आहे ? योजनेची अंमलबजावणी किती प्रभावीपणे झालेली आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : ऊसतोड कामगार हे साधारणत: नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत 6-7 महिने स्थलांतरित होत असतात. या स्थलांतरित कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून केन्द्र आणि राज्य शासनाने हंगामी वसतिगृहांची योजना सुरु केलेली आहे. राज्यातील 12 जिल्ह्यामध्ये हे ऊसतोड कामगार असतात. राज्यातील 12 जिल्हयातील 60503 विद्यार्थ्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी 29 कोटी 46 लाखाची तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. बीड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगार स्थलांतरित होतात. स्थलांतरित झालेल्या कामगारांची मुले मागे त्या ठिकाणी राहिली पाहिजेत, त्यांचे शिक्षण त्या गावात झाले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. अनेक मुले नातेवाईकांकडे जातात...(अडथळा) ...मी सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदस्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तर देत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता जवळपास 60503 मुलांची आपल्याला काळजी घ्यावी लागेल. काही जिल्ह्यामध्ये गैरप्रकार होतात असे पटपडताळणी नंतर लक्षात आले. काही ऊसतोड कामगारांनी आपली मुले नातेवाईकांकडे ठेवलेली आहेत असे दाखवून पैसे उकळण्याचे प्रकार होतात. तत्कालीन एमपीएसपीच्या संचालकांनी याबाबत सर्व्हे केला.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25916...

श्री.राजेंद्र दर्डा....

आणि आता महाराष्ट्रामध्ये 25 हजार विद्यार्थ्यांवर 656 केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत जवळपास 8 कोटी 65 लाख रुपये खर्च झाला आहे. या सगळया विद्यार्थ्यांची हंगामी वसतीगृहात व्यवस्था झाली आहे. ऊस तोड कामगारांची मुले् त्यांच्याबरोबर सांगली जिल्हयात गेली, कोल्हापूर जिल्हयात गेले तर त्या कामगारांच्या मुलांना जवळच्या शाळेत टाकण्यात यावे अशा प्रकारचे सर्वेक्षण यशदाच्या माध्यमातून झालेले आहे आणि त्याप्रमाणे यासंदर्भातील जबाबदारी शासनाने पूर्ण केलेली आहे.

श्री. विनायक मेटे : ऊस तोड कामगारांच्या मुलांना शिक्षण देण्याच्या प्रश्नाकडे व ऊसतोड कामगारांना सोयी सुविधा देण्याच्या प्रश्नाकडे पाहण्याचा शासनाचा किती उदासीन दृष्टीकोन आहे हे या प्रश्नाच्या उत्तरावरुन स्पष्टपणे दिसून येते. महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा ऊसतोड कामगाराचा आहे म्हणून प्रसिध्द आहे. बीड जिल्हयाचे पूर्वीप्रमाणेच वैशिष्ट्य ठेवावावयाचे आहे अशा पध्दतीने शासन प्रयत्न करीत आहे असे दुर्देवाने म्हणावे लागते आहे. जवळपास 4 ते 5 लाख ऊसतोड कामगार हे स्थलांतरित होत असतात. पर्यायाने त्या कामगारांचे शिक्षण घेणारे पाल्य देखील नाईलाजाने स्थलांतरित होतात. त्या कामगारांचे पाल्य नातेवाईकाकडे राहतात असे शासनाकडून दाखविले जाते. या सगळया प्रकाराकडे शासनाचे सर्रास दुर्लक्ष होत आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. शासनाकडून ऊस तोड कामगारांच्या थोडयाफार पाल्यांना शिक्षण देण्यात येते, त्यात शिक्षण अधिकारी व संबंधित अधिकारी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहेत. अधिकाऱ्यांसाठी ही गोष्ट म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण बनलेली आहे. मी याबाबतीत अनेक उदाहरणे देऊ शकेन. ऊस तोड कामगारांच्या शिक्षण घेत असलेल्या पाल्यांचा आकडा हा दरवर्षी बदलत जातो. ऊस तोड कामगारांच्या शिक्षण घेत असलेल्या पाल्यासंदर्भात नव्याने सर्व्हे करुन त्यांना निवासी शाळांची व्यवस्था शासन करणार आहे काय ? ही केंद्राची योजना असल्यामुळे राज्य शासन काहीही जबाबदारी घेत नाही. राज्य शासनाने काही तरी जबाबदारी ही योजना राबविण्यामध्ये घेतली पाहिजे. ही योजना केंद्र सरकारची असली तरी राज्य शासन यात कोणती जबाबदारी उचलणार आहे, पुढील वर्षी या सर्व ऊसतोड कामागारांच्या शिक्षण घेणाऱ्या पाल्यांची सोय निवासी शाळेत करणार आहे काय, या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो आहे, त्या बाबतीत चौकशी केली जाईल काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25916...

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या बाबतीत शासनाची भूमिका मुळीच उदासीन नाही. ऊसतोड कामगार स्थलांतरित होतात, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक सोमवारी माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये आढावा घेतला जातो. 5 लाख ऊसतोड कामगारांचा हा प्रश्न आहे असे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितले. याबाबतीत नेहमी सर्वेक्षण होत असते. आपण सर्व लोकप्रतिनिधी आहोत. याबाबतचे सर्वेक्षण चुकीचे झालेले असेल तर आपण लोकप्रतिनिधी म्हणून निश्चितपणे शासनास सांगावे. स्थलांतरित झालेल्या ऊस तोड कामगारांचे सर्वेक्षण हे यशदा संस्थेमार्फत झालेले आहे. तसेच त्याबाबतचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी यांच्यामार्फत झालेले आहे. सर्वेक्षणानंतरच आकडा ठरविण्यात येतो. ऊस तोड कामगारांच्या पाल्याची शिक्षणाची व्यवस्था करावयाची असते ती करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी निवासी शाळेसंबंधी मुद्दा उपस्थित केलेला आहे. बीड जिल्हयात ऊस तोड कामगारांचे मोठया प्रमाणात स्थलांतर होते ही वस्तुस्थिती आहे. स्थलांतरित झालेल्या ऊस तोड कामगारांच्या पाल्याना शिक्षण मिळावे या दृष्टीकोनातून शासन सकारात्मक विचार करील.

श्री. विनोद तावडे : महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचे महाराष्ट्राबाहेर मोठया प्रमाणात स्थलांतर होत आहे. महाराष्ट्राच्या शेजारची जी राज्ये आहेत, त्या ठिकाणच्या 1439 साखर कारखान्यांमध्ये सरासरी 1100 म्हणजे 1 लाख 95 हजार कुटुंबांचे स्थलांतर होत आहे अशा प्रकारचा सर्व्हे रिपोर्ट जनार्थ या संस्थेने शासनाला सादर केलेला आहे. बाहेरील राज्यात स्थलांतरित झालेल्या ऊसतोड कामागारांच्या पाल्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत काहीही व्यवस्था होत नाही म्हणून मुंबई, अहमदाबाद आणि बंगलोर येथील न्यायालयात तक्रार केल्यानंतर अहमदाबाद न्यायालयाने त्याची जनहित याचिका दाखल करुन घेण्यास सांगितले आहे. राज्याबाहेर स्थलांतरित होत असलेल्या ऊसतोड कामगारांच्या बाबतीत 1979 चा कायदा लागू होतो.

यानंतर श्री. शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या अनुषंगाने राज्यातील जे ऊसतोड कामगार राज्याबाहेर स्थलांतरित होतात त्यांच्या पाल्यांबाबत शासनाने अभ्यास केला आहे काय, असल्यास त्या संदर्भात काय उपाययोजना केली आहे?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, स्थलांतरित होणारा ऊसतोड कामगार हा राज्यातील कोणत्याही जिल्हयात गेला किंवा राज्याबाहेर गेला तरी त्यांच्या पाल्यांनी मूळ ठिकाणीच रहावे. बीड जिल्हयातील असेल तर बीड जिल्हयातच रहावे, यासाठी हंगामी वसतीगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. हंगामी वसतीगृहामध्ये प्रवेश घेतल्यानंतर तो विद्यार्थी ज्या शाळेत शिकत होता त्याच शाळेत त्यांनी शिक्षण घ्यावे हा हेतू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, पटपडताळणीमध्ये अनेक शाळांमध्ये बोगस विद्यार्थी आढळून आले. किती बोगस विद्यार्थी आढळले आणि ते कोणत्या शैक्षणिक संस्थेमध्ये आढळून आले? हंगामी वसतीगृहे ही खाजगी संस्थांमार्फत, कारखान्यामार्फत किंवा शासनामार्फत चालविली जातात काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. मी फक्त पटपडताळणीच्या अनुषंगाने बोललो होतो. या विषयाच्या संदर्भात वेगळ्या आयुधाच्या माध्यमातून अधिक चर्चा करण्याची माझी निश्चित तयारी आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, चर्चा घेतली जाणार असेल तर हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री.राजेंद्र दर्डा : हा प्रश्न आष्टी तालुक्याशी संबंधित आहे. विषयावर सांगोपांग चर्चेला माझी तयारी आहे असे मी म्हटले होते.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. आर्थिकदृष्टया गांजलेल्या जिवांचा हा प्रश्न आहे. केवळ आष्टी तालुका नव्हे तर संपूर्ण बीड जिल्हयात ऊसतोड कामगार आहेत. लाखोंच्या संख्येने ऊसतोड कामगार महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेर देखील स्थलांतरित होत असतात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी हंगामी वसतीगृहाची व्यवस्था केली जाते. ही हंगामी वसतीगृहे कायमस्वरुपी केली जातील काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25916.....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ऊसतोड कामगार सहा महिन्यांसाठी स्थलांतरित होत असल्यामुळे शासनाने 656 केंद्रे महाराष्ट्रात सुरु केली आहेत. सर्वच केंद्रे हंगामी ऐवजी निवासी स्वरुपात रुपांतरित करणे शक्य होणार नाही. स्थलांतरितांचे प्रमाण खूप मोठे आहे. ते तपासून पाहण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा जिल्ह्याचे तत्कालीन उपशिक्षणाधिकारी आणि अमरावती शिक्षण विभागात कार्यरत असणाऱ्या शिक्षण उपनिरीक्षकास लाच स्वीकारताना पकडल्याबाबत

(३) * २५७३६ *श्री.विनायकराव मेटे , ॲड.उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे* : सन्माननीय ***शालेय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्याचे तत्कालीन उपशिक्षणाधिकारी आणि अमरावती शिक्षण विभागात कार्यरत असणाऱ्या शिक्षण उपनिरीक्षकास माहे एप्रिल, २०११ च्या शेवटच्या सप्ताहात लाच स्वीकारताना लाचलुचपत खात्याने पकडले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाने शिक्षण उपनिरीक्षकांवर दिनांक १ मे, २०११ पर्यंत कोणतीच कारवाई केली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शिक्षण उपनिरीक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) होय.

(२), (३), (४) व (५) शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती यांच्याकडून दि.२९.४.२०११ रोजी शासनास प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित शिक्षण उपनिरीक्षक, श्री.का.वि.गोमासे यांना दि.२५.५.२०११ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, उत्तरामध्ये शिक्षण उपनिरीक्षक श्री.काशिनाथ गोमासे यांना निलंबित केल्याचे नमूद केले आहे. एक महिन्याच्या कालावधीनंतर त्यांना निलंबित केले आहे, परंतु निलंबित केले ही समाधानाची बाब आहे. श्री.काशिनाथ गोमासे, तत्कालीन उप शिक्षणाधिकारी यांना लाचलुचपत विभागाने लाच स्वीकारताना पकडले होते. ते बुलढाणा जिल्हयात काही वर्षे व नंतर अकोला जिल्हयात कार्यरत होते. शासन सेवेत असताना त्यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून लाखो रुपयांची संपत्ती गोळा केली आहे. त्यांच्या वैयक्तिक संपत्तीची चौकशी केली आहे काय, नसल्यास ती केली जाईल काय?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25736.....

प्रा. फौजिया खान : महोदय, हे प्रकरण सध्या एसीबीच्या अखत्यारित असून त्यासंबंधी त्यांची कारवाई सुरु आहे, अद्याप चार्जशीट दाखल होणे बाकी आहे. तसेच विभाग म्हणून शासनाने त्यांना निलंबित केलेले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विनाअनुदान तत्वावरील वेतनश्रेणीत मान्यता असणाऱ्या व तद्नंतर 100 टक्के अनुदान प्राप्त झालेल्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

(4) *25663 श्री.कपिल पाटील, श्री.जयंत प्र. पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 23176 ला दिनांक 16 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांना शिक्षणसेवक योजना लागू नसल्याने या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना शिक्षण विभागाकडून 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी वेतनश्रेणीत मान्यता दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(2) शासन निर्णय दिनांक 14 फेब्रुवारी, 1972 व शासन परिपत्रक दिनांक 8 एप्रिल, 2008 अन्वये खाते सुरु नसल्यास विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना अंशदान भरण्याचे बंधन नाही हे खरे आहे काय,

(3) 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी वेतनश्रेणीत मान्यता असलेल्या विनाअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतरांना 1 नोव्हेंबर, 2005 नंतर 100 टक्के अनुदान मिळाले असले तरी जुनीच पेन्शन योजना लागू करावी यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(6)या विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या कार्यध्यक्षांनी व लोक प्रतिनिधींनी दिलेल्या दिनांक 26 जुलै, 2011 च्या निवेदनाची दखल घेऊन शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) होय.

(2) होय.

(3) होय.

(4), (5) व (6) यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतच्या प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आला आहे.

श्री. कपिल पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर चांगले आहे पण माझी तक्रार अशी आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांचे प्रश्न स्वीकारले जातात त्यांचेच प्रारुप सुध्दा स्वीकारले पाहिजे. प्रश्न माहितीवजा विचारावयाचे नसतात. माझा मूळ प्रश्न हा क्र. 3 पासून सुरु होतो. पहिले दोन प्रश्न अन्य सन्माननीय सदस्यांनी विचारलेले असू शकतात. येथे स्पेसिफिक प्रश्न विचारण्याची पध्दत आहे. तसेच सहावा प्रश्न देखील मी विचारलेला नाही.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25663.....

सभापती : आपण जी बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहात ती मी स्वत: लक्ष घालून तपासून घेईन की मूळ प्रश्नात फरक केलेला आहे काय, काही ठिकाणी अशा प्रकारे नकळत दुरुस्ती झाली असेल तर याबाबतीत मी स्वत: लक्ष घालीन.

श्री. कपिल पाटील : महोदय, तिसऱ्या प्रश्नात स्पेसिफिक विचारले होते की, "1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी वेतनश्रेणीत मान्यता असलेल्या विना अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतरांना 1 नोव्हेंबर, 2005 नंतर 100 टक्के अनुदान मिळाले असले तरी जुनीच पेन्शन योजना लागू करावी यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय," त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. पुढे मी विचारले होते की, "त्यानुसार काय कार्यवाही केली आहे " प्रश्न क्र. 5 व 6 च्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, "यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आला आहे. कदाचित या प्रश्नाला दिलेले उत्तर चुकले असावे. कारण अंमलबजावणीच्या संदर्भात वास्तविक वित्त विभागाकडे अशा प्रकारची शिफारस शासनाने करणे आवश्यक आहे. औरंगाबाद व नागपूर उच्च न्यायालयाने निर्णय दिला होता. त्यासंदर्भात जे शिक्षण सेवक सन 2005 पूर्वी लागलेले आहेत ते नंतर कायम झाले आणि त्याची अंमलबजावणी देखील सुरु केली आहे. मात्र विना अनुदानित शाळा जेव्हा अनुदानावर आल्या त्यांचा उल्लेख त्या निर्णयात नव्हता, ती दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच त्यासाठी बजेटरी प्रोव्हिजन करणे देखील आवश्यक आहे. तसा प्रस्ताव वित्त विभागाकडे शासनाने पाठविला आहे काय, तसेच येत्या बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात विचारलेला आहे. न्यायालयाने जे अंतरिम आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे विभागाने वित्त विभागाकडे धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने सकारात्मक पध्दतीचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25663.....

श्री. रामनाथ मोते : महोदय, राज्यात अंशदायी पेन्शन योजना लागू झाल्यापासून म्हणजेच 1 नोव्हेंबर, 2000 पूर्वी शिक्षण सेवक म्हणून रुजू झालेल्यांचा प्रश्न मार्गी लागला पण त्यापूर्वी सेवेत रुजू झालेले शिक्षण सेवक पण 100 अनुदान न मिळालेल्या संस्थांमधील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. अंशदायी पेन्शन योजनेच्या संदर्भात शासनाने जे आदेश काढलेले आहेत ते सर्व आदेश उच्च न्यायालयाने स्थगित केले आहेत. मी यासंदर्भात 21 डिसेंबर रोजी शासनाला विनंती सुध्दा केलेली आहे की, उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशानुसार शासनाचे सर्व आदेश स्थगित केले नव्हते. या न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी त्या विशिष्ट याचिकाकर्त्यांना न लागू करता राज्यातील सर्व शिक्षकांना दि. 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी विना अनुदानित असताना सेवेत आलेले असतील त्यांच्या साठी सुध्दा लागू करणार काय, आणि मंत्री महोदयांनी जे पॉझिटीव्ह उत्तर दिले आहे त्यांचा निर्णय तातडीने घेणार काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, 1 नोव्हेंबर, 2000 पूर्वी शिक्षण सेवक म्हणून कार्यरत असलेल्यांना दि. 19 जुलै, 2011 च्या शासन निर्णयाद्वारे जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. त्यात सर्वांचा विचार झाला नाही पण त्यानंतर प्रक्रिया चालूच असताना मध्यंतरी उच्च न्यायालयाच्या माध्यमातून अंतरिम आदेश आलेले आहेत .

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा....

"appropriate policy decision be taken" असा कोर्टाने अंतरिम आदेश दिलेला आहे. विभागाची या प्रश्नाच्या बाबतीतील भूमिका सकारात्मक असल्यामुळे दि.19 जुलै, 2011 रोजी या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात आपल्याला कोर्टाचा जो अंतरिम आदेश आलेला आहे त्याबाबत विभागाकडून अभ्यास करण्याचे काम सुरु असून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न सुरु आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. हा प्रश्न विनाकारण लांबवला गेला आहे. विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेतील सहाय्यक शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असे पत्रक शासनाने काढलेले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारीत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांची बैठक झाली होती व या बैठकीत अंशत अनुदानित व विना अनुदानित शाळेतील जे कर्मचारी 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी पासून कार्यरत आहेत त्यांना पूर्वीचच नियम लागू राहतील असा निर्णय झालेला आहे. त्यामुळे 2005 पूर्वीच्या कर्मचा-यांना शासन सेवा निवृत्तीचे नियम लागू करणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, दि. 19 जुलै, 2011 रोजी वित्त विभागाने जो जी.आर. इश्यू केलेला आहे त्याबाबत शासनाने एक निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाबद्दल शिक्षण विभागाचीही भूमिका होती व त्याच काळात कोर्टाच्या माध्यमातून शासनाने पॉलिसी डिसीजन घ्यावा अशा प्रकारचा अंतरिम आदेश दिला होता. यासंदर्भात आर्थिक बाब येत असल्यामुळे ती प्रोसेस सुरु आहे. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाची भूमिका सकारात्मक आहे परंतु यापेक्षा अधिक सविस्तर उत्तर देणे या क्षणाला तरी शक्य होणार नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, हा विषय अर्थखात्याकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे. यामध्ये एकंदर चार प्रकारच्या शाळांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

समावेश होतो. दि. 1 नोव्हेंबर, 2005 रोजी चार प्रकारच्या विनाअनुदानित शाळा होत्या. 1) 20 %, 40 % व 60 % वेतन घेणा-या शाळा, 2) निकष पात्र ठरलेल्या परंतु अद्यापि अनुदान पात्र न ठरलेल्या शाळा 3) ज्या शाळांचे मूल्यांकन झालेले नाही अशा विना अनुदानित शाळा व 4) कायम विनाअनुदानित शाळा अशा चारही शाळांचा या प्रस्तावामध्ये समावेश करण्यात आलेला आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ज्या शाळा अनुदानित झाल्या होत्या व ज्या शाळांमध्ये शिक्षण सेवक कार्यरत होते अशा शाळांच्या संदर्भात अगोदरच निर्णय जाहीर करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता आपण शाळांची विभागणी करण्याची काही एक गरज नाही. ज्या शाळा उरलेल्या आहेत त्याबाबत न्यायालयाचा जो अंतरिम आदेश आलेला आहे त्याबाबत शासनाची प्रक्रिया या क्षणालाही सुरु आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे त्याबाबत माझा काही एक आक्षेप नाही. परंतु या प्रश्नामध्ये दोन प्रश्न क्लब केल्यामुळे घोटाळा होत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मुंबई हायकोर्टाने असे म्हटले आहे की, " same relief would operate even in the present Petition". मुंबई हायकोर्टापुढे शिक्षक भारती व ज्यांची पूर्वी विनाअनुदान तत्वावर नेमणूक झाली झाली होती परंतु ते नंतर कायम झाले होते त्यांची अगोदर पीएफची खाती सुरु होती परंतु ती नंतर बंद करण्यात आल्यामुळे या प्रक्रियेला स्टे देण्यात आलेला आहे. ही खाती सुरु ठेवावी व या शिक्षकांना पुन्हा एकदा ही योजना लागू करावी. यासंदर्भात अंतरिम आदेश आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या दोन गोष्टी क्लब करु नये अशी विनंती आहे. यासंदर्भात विभागाचा आक्षेप असता तर विभाग सुप्रीम कोर्टात गेले असते परंतु विभाग यासंदर्भात सुप्रीम कोर्टात गेले नाही. जुलै 2011 रोजीच्या निर्णयामुळे बहुसंख्य शिक्षकांना आपण मोठा रिलीफ दिलेला आहे. आता थोडयाच शिक्षकांना रिलीफ द्यावयाचा बाकी आहे त्यामुळे त्यांनाही तोच रिलीफ द्यावा असे मुंबई हायकोर्टाने स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. यासंदर्भात कोर्टाने जे निर्देश दिलेले आहेत ते मी माननीय मंत्रीमहोदयांकडे सुपूर्द करतो. त्यामुळे कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी शासन करणार आहे काय ? एवढेच माझे म्हणणे आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा आभारी आहे कारण त्यांनी दिनांक 19 जुलै 2011 रोजी जो चांगला निर्णय झाला, त्याचा उल्लेख केला. याबाबतीत बहुतांशी एकूण काम झालेले आहे. तसेच याठिकाणी जरी प्रश्न क्लब केलेला असला तरी देखील त्याचे उत्तर देताना आमच्या मनामध्ये गोंधळ नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आमच्याकडे जरुर यासंबंधातील प्रत पाठवावी. पण या विषयाबद्दल शासन सकारात्मक आहे एवढेच मी सांगू इच्छितो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एखादे अवघड काम सोपे करणारे म्हणून माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांची ख्याती आहे. परंतु याठिकाणी प्रश्न अतिशय सोपा आहे. दिनांक 19 जुलै 2011 रोजी निर्णय घेतला की, 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी जे शिक्षण सेवक म्हणून नोकरीमध्ये लागलेले आहेत, त्यांना मुंबई हाय कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्यात येईल. परंतु त्यातील एक वाक्य आपल्या अधिकाऱ्याकडून वाचावयाचे राहून गेले आहे, त्यामध्ये माननीय मंत्री महोदय आपला दोष नाही. 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी . . ..

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी फक्त प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी ज्या अंशत: अनुदानित शाळा आहेत, विना अनुदानित आणि काही अनुदानित शाळा आहेत, त्याठिकाणी काम करणारे जे शिक्षक कर्मचारी आहेत, त्यांना सुध्दा जुनीच पेन्शन योजना लागू करावी अशा स्वरुपाचा एका ओळीचा निर्णय आहे. त्याअनुषंगाने फक्त दिनांक 19 जुलै 2011 रोजीच्या आदेशामध्ये दुरुस्ती करावयाची आहे, दुसरे काहीही करण्याची गरज नाही आणि ही बाब आपल्याही लक्षात आलेली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपला प्रश्न पूर्ण करावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे की, ही बाब जास्त काळ न लांबविता आणि पुढील अधिवेशनामध्ये या विषयाच्या संबंधातील प्रश्न विचारण्याची गरज भासणार नाही यादृष्टीकोनातून हे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदय याबाबतीत सुधारित आदेश काढणार आहेत काय ? असा माझा महत्वाचा प्रश्न आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी शिक्षण सेवकाच्या बाबतीत सांगितल्याप्रमाणे 2005 पूर्वी जे शिक्षण सेवक म्हणून नोकरीमध्ये काम करीत आहेत, त्यांच्या साठी सकारात्मक निर्णय घेतलेले आहेत. त्यानुसार आम्ही त्यांच्या मानधन वाढीसाठी सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, यामध्ये थोडेसे जे शिक्षण सेवक राहिलेले आहेत, त्यांना देखील समाविष्ट करावे यासाठी सुध्दा शासन सकारात्मक आहे. फक्त याबाबतीत केवळ प्रक्रिया होणे गरजेचे आहे. कारण यामध्ये आर्थिक भार असल्याने त्या अनुषंगाने प्रक्रिया केल्याशिवाय तशा प्रकारची दुरुस्ती करता येत नाही आणि तशा प्रकारची प्रक्रिया करण्याचे काम शासनाने सुरु केलेले आहे.

. . . .आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनुदान सूत्र लागू करण्यासाठी मुल्यांकनाचे निकष निश्चित करण्यासंबंधीचा आदेश रद्द करणेबाबत

(5) *25013 श्री.वसंतराव खोटरे,प्रा.दिलीपराव सोनवणे,श्री.विक्रम काळे,श्री.नागो गाणार, श्री.नितीन गडकरी, श्री.भगवान साळुंखे, श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विनाअनुदान तत्वावर असणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांकरीता सुधारित मुल्यांकन निकष निश्चित करण्याचा शासन निर्णय क्रमांक 2009/(599/09)/माशि-1 दिनांक 15 नोव्हेंबर, 2011 नुसार अंत्यत कठीण व कठोर निकष असल्यामुळे शाळा अनुदानास पात्र ठरणार नाहीत म्हणून तो रद्द करून दिनांक 17 फेब्रुवारी, 2004 च्या शासन निर्णयानुसार शाळांचे मुल्यांकन करावे याबाबत म.रा.कायम अनुदानित शाळा कृती समितीद्वारा महाराष्ट्र विधानमंडळ नागपूर येथे दिनांक 14 डिसेंबर, 2011 पासून आमरण उपोषण व दिनांक 16 डिसेंबर, 2011 रोजी मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यांनी सादर केलेल्या मागण्यांबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(3) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. राज्यामध्ये जवळपास 4000 प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत आणि त्यांच्या संबंधातील "कायम" हा शब्द 16 जून 2009 रोजी काढण्यात आलेला आहे आणि 20 जुलै 2009 रोजी शासन निर्णय देखील झालेला आहे. तसेच 15 नोव्हेंबर 2011 रोजी अनुदान लागू करण्याच्या बाबतीत मूल्यांकनाचे निकष सुध्दा जाहीर केलेले आहेत. परंतु मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, या बाबत जो शासन निर्णय काढलेला आहे, तो अत्यंत कठोर, कठीण आणि जाचक आहे. यामुळे जवळपास 99 टक्के शाळा अनुदानावर येणार नाहीत असे मला वाटते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 11 ऑक्टोबर रोजी जो शासन निर्णय काढण्यात आला होता, त्यामध्ये थोड्याशा जाचक अटी होत्या. त्यानंतर लोक कोर्टामध्ये गेल्यानंतर असा निकाल देण्यात आला की, ही बाब सुधारावी. त्यानंतर 17 फेब्रुवारी 2004 मध्ये शासन निर्णय काढला आणि कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे मागच्या वेळेला त्या सूत्रानुसार अनुदानाचे सूत्र लावण्यात आले.म्हणून माझा स्पेसिफीक एकच प्रश्न आहे की, जर शासनाला 2012-2013 मध्ये या लोकांना अनुदान द्यावयाचे असेल तर त्यासाठी शासनाने तरतूद केलेली आहे की नाही हे मला माहिती नाही. परंतु अजून याबाबतीत मूल्यांकन झालेले नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने जो जाचक निर्णय काढलेला आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे . . . .

तो कठीण आणि कठोर आहे. ज्याच्यामुळे एकही शाळा अनुदानावर येऊ शकणार नाही. त्यामुळे या संबंधातील शासन निर्णय बदलून दिनांक 17 फेब्रुवारी 2004 च्या शासन निर्णयाप्रमाणे अनुदानाचे सूत्र लागू करुन त्याप्रमाणे मूल्यांकनाचे काम सुरु करणार आहात काय ?

श्री.फौजिया खान : सभापती महोदय, दि.24 नोव्हेंबर 2001 पासून कायम विना अनुदान तत्वावर शाळा आणि तुकड्या देण्याचे धोरण शासनाने आणले होते.त्यानुसार शाळांनी शपथपत्र दिले की, आम्हाला कोणतेही अनुदान नको. तसेच त्यांनी आपल्या इच्छेने शाळा सुरु केल्या होत्या. पण त्यानंतर शासनाने 16 जून 2009 रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये "कायम" हा शब्द काढण्याचा निर्णय घेतला आणि त्याच बैठकीमध्ये असाही निर्णय झाला की, 2012-2013 पासून अनुदान देताना मूल्यांकनाचे नवीन सूत्र सुरु करण्यात येईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25013...

प्रा.फौजिया खान.....

त्यानुसार सचिव समिती स्थापन करण्यात आली. सचिव समितीने आपला अहवाल शासनास दिला. सचिव समितीने जे निकष सुचविले त्यामध्ये आणखी दुरुस्ती करुन दिनांक 25 नोव्हेंबर, 2011 रोजी मंत्रिमंडळाने नवीन मूल्यांकन निकषाला मान्यता दिली. त्याप्रमाणे राज्यात शाळांचे मूल्यांकन होणार आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, त्यांनी आत्मदहनाची नोटीस दिलेली आहे.. जाचक अटी आहेत...

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने "कायम विनाअनुदानित" मधील "कायम" हा शब्द तीन वर्षापूर्वी काढला त्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. कायम शब्द काढला त्यावेळी मूल्यांकनांचे निकष वेगळे होते. आता त्यामध्ये शासनाने बदल करुन धोरणात्मक निर्णय घेतला त्याबद्दल आमचा आक्षेप नाही. हे जे निकष ठरविण्यात आलेले आहेत त्याबाबत मंत्री महोदयांशी चर्चा झालेली आहे. परंतु या निकषात काही प्रमाणात का होईना बदल केल्या शिवाय या शाळांना न्याय मिळू शकणार नाही. तेव्हा या जाचक अटी काही प्रमाणात बदलून या शाळांना अनुदानास पात्र ठरविण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शाळांना न्याय देणे हा शासनाचा उद्देश नसून शिक्षणाला न्याय देणे हा मूळ उद्देश आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे हा शासनाचा उद्देश आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे आणि हा उद्देश कठोर नाही तर ते अपेक्षित आहे. कमीत कमी फन्डामेन्टल लर्निंग आऊटकम्स येणे अपेक्षित आहे त्याप्रमाणे हे निकष आखलेले आहेत. तेव्हा शाळांकडून अपेक्षित आऊटकम्स येणे गरजेचे आहे यावर शासन ठाम आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, आपण शैक्षणिक कायद्याची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. त्यामुळे इयत्ता आठवी पर्यंतचे शिक्षण मोफत द्यावयाचे आहे. एकीकडे आपण शिक्षणाचा कायदा आहे असे सांगता तर दुसरीकडे या शाळा अनुदानित केल्या नाहीत. शिवाय मुलींकडून फी घ्यावयाची नाही. फी न घेता शाळा कशा चालविणार? आता रोस्टरची अट आहे. रोस्टरला कुणाचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25013...

डॉ.सुधीर तांबे ....

विरोध नाही ते घटनेने मान्य केलेले आहे. विनाअनुदानित शाळांना रोस्टर लागू नाही अशा प्रकारचा निर्णय झाला होता, परंतु आता आपण रोस्टर लागू केले पाहिजे असे सांगत आहात. तेव्हा माझा प्रश्न आहे की, आपण शाळांना काही प्रमाणात सवलती देणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आरक्षणाबाबत शासनाचे निश्चित असे धोरण आहे. शाळा मूल्यांकनासाठी पात्र ठरविण्याकरिता शाळांच्या कर्मचाऱ्यांसाठी हे धोरण असणे गरजेचे आहे. आरक्षणाबाबत तडजोड असू शकत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन 2009 च्या जुलैच्या अधिवेशनात शासनाने शेवटच्या दिवशी हा निर्णय घोषित केला. परंतु अजूनही त्या बाबतीत निकष ठरत नाहीत. निकष काय आहेत त्यावर चर्चा झाली पाहिजे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सन 2012-2013 साठी निकष ठरविणार आहात, परंतु त्या साठी शासनाने बजेटरी प्रोव्हीजन केलेली आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन 2009 मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. सन 2012-2013 पासून शाळांचे मूल्यांकन करुन त्यानंतरच्या वर्षात अनुदान देण्यात येईल. त्याप्रमाणे आर्थिक नियोजन करण्यात आलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25013. . . . .

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शैक्षणिक निकषांबद्दल कोणाचीच तक्रार नाही, ते कठोर असावेत परंतु मूल्यांकनाच्या संदर्भात जे निकष ठरविण्यत आलेले आहेत त्याबद्दल सार्वत्रिक तक्रार आहे आणि ती रास्त आहे. या निकषाची फेरतपासणी शिक्षक प्रतिनिधींना विश्वासात घेऊन करण्यात येईल का ? सन्माननीय सदस्य श्री. तांबे यांनी म्हटल्याप्रमाणे शिक्षणाचा हक्क या कायद्यानुसार या तीन वर्षात किमान आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची जबाबदारी घेणे ही शासनाची जबाबदारी असल्यामुळे अनुदान सुत्रानुसार नव्हे तर निकषास पात्र ठरणाऱ्या सर्व मुलांची पूर्ण जबाबदारी शासन घेणार का? त्यांच्या सॅलरी ग्रँटची जबाबदारी शासन घेणार आहे का कारण फक्त सॅलरी ग्रँटचे पैसे देण्यात येतात, इमारतीसाठी किंवा खडू-फळयासाठी शासनाकडून पैसे देण्यात येत नाहीत. सॅलरी ग्रँट म्हणजे फक्त मुलांची जबाबदारी घेण्यात येते त्यामुळे ती जबाबदारी अनुदानसुत्रांनुसार पूर्ण घ्यावी लागेल. तीन वर्षांची मुदत ऑलरेडी संपलेली आहे. जून, 2012 पासून शासनाला सॅलरी ग्रँट द्यावी लागेल. सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा होता की, निकषाची फेर तपासणी या सभागृहातील शिक्षक प्रतिनिधींना विश्वासात घेऊन करणार का आणि जून, 2012 पासून पात्र ठरणाऱ्या सर्व शाळांना पूर्ण सॅलरी ग्रँट देणार का?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षण प्रतिनिधी या सभागृहात उपस्थित आहेत त्यांनी संदर्भातील काँक्रीट तक्रार उपस्थित केली तर शासन त्या बाबतीत विचार करील.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. सन्माननीय सदस्यांची तक्रार खरोखरच रास्त आहे याची खात्री शासनाला पटली तर शासन त्या बाबतीत विचार करील.

सभापती : विनाअनुदानित शिक्षण या अनुषंगाने शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आहे. आपण सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे सुदैवाने सन 2009 मध्ये कॅबिनेटने हा निर्णय घेतला. आता जून,2012 पर्यंत त्याची अंमलबजावणी व्हावी यादृष्टीने त्याचा सातत्याने पाठपुरावा चालू आहे. मला असे वाटते की, त्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत.

श्री. राजेंद्र दर्डा :सभापती महोदय, सन 2009 ला कॅबिनेटमध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आणि त्यावेळी नियुक्त झालेल्या सचिव समितीच्या शिफारशीनुसार दिनांक 15 नोव्हेंबर

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25013. . . . .

श्री. राजेंद्र दर्डा. . .

2009 रोजी जो निर्णय घेतलेला आहे त्या अनुषंगाने मी या सभागृहाला निश्चितपणे सांगू इच्छितो की, मूल्यांकनाची जी प्रक्रिया आहे ती तातडीने पुढच्याच महिन्यात सुरु होईल आणि जे मूल्यांकनास पात्र होतील त्यांना 20,40,60,80 या पध्दतीने सन 2012-2013 पासून अनुदान मिळेल.

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी थोडयावेळापूर्वी जे सांगितले त्यामध्ये कॅबिनेट या शब्दा ऐवजी मंत्री मंडळाने असा शब्दात बदल करण्यात यावा.

सभापती : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : मंत्री मंडळाने सन 2009 मध्ये निर्णय घेतला त्याबद्दल आता सन 2012 मध्ये सांगण्यात येत आहे याचे समर्थन करण्याऐवजी या संदर्भात मंत्री महोदयांनी त्यांच्या दालनात बैठक घ्यावी. (अडथळा) सन 2009 मध्ये घेतलेला निर्णय 4 वर्षे अंमलात येत नसेल तर या शासनाने राजीनामा द्यावा.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन 2009 मध्ये मंत्री मंडळाच्या बैठकीत निर्णय झालेला आहे की, मूल्यांकनाचे निकष लावून 2012-2013 पासूनच अनुदान देण्यात येईल तेव्हा तीन वर्षे वाया गेलेली आहेत अशा प्रकारचा शासनावर हेत्वारोप करणे बरोबर नाही.

सभापती : या बाबतीत मंत्री महोदयांनी सन्माननीय शिक्षक प्रतिनिधींना आपल्या दालनात बोलावून योग्य ती चर्चा करावी आणि योग्य त्या निर्णयाच्या दृष्टीने सन्माननीय शिक्षक प्रतिनिधींना सहकार्य द्यावे.

यानंतर श्री. अजित. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणात उभारण्यात येणाऱ्या शेततळयास शासनामार्फत देण्यात येणारे कमी अनुदान व अनेक त्रुटींमुळे शेतकऱ्यांकडून योजनेला मिळत असलेला अत्यल्प प्रतिसाद

(६) * ***२५७२०*** ***श्री.प्रकाश बिनसाळे , ॲड. उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले*** **:** सन्माननीय ***रोजगार हमी योजना मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात उभारण्यात येणाऱ्या शेततळयास शासनामार्फत देण्यात येणारे कमी अनुदान व अनेक त्रुटीमुळे शेतकऱ्यांकडून या योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेततळी यशस्वी व्हावीत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता : (१) नाही.

(२) शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी वृत्तपत्रीय प्रसिध्दी, घडी पत्रिका, पोस्टर इत्यादीद्वारे तसेच ग्रामस्तरीय व क्षेत्रीय बैठका आणि प्रशिक्षणाद्वारे शेततळे योजनेचा प्रसार करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना सदर योजनेत सहभाग घेण्याबाबत आवाहन केले जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो आणि त्या ठिकाणी डोंगर असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेततळी होऊ शकतात. आजपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यामध्ये किती शेततळी शासनामार्फत करण्यात आलेली आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्य रोजगार हमी योजनेमधून कोकणामध्ये जवळपास 9 हजार शेततळ्यांचे लक्षांक दिले होते. त्यासाठी 6845 अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी 6505 अर्ज पात्र ठरलेले आहेत. जवळपास 1241 कामे पूर्ण झालेली असून 1370 कामे चालू आहेत. आतापर्यंत या सर्व शेततळ्यांसाठी 7 कोटी 85 लाख रुपये खर्च झालेले आहेत.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, कोकणातील निकष बदलणे आवश्यक आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी कोकणातील शेततळ्यांची संख्या सांगितली. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये प्रत्येक तालुक्याला 200 शेततळ्यांचे उद्दिष्ट दिले आहे. त्या ठिकाणी 1600 पैकी फक्त 78 शेततळी पूर्ण झालेली आहेत. हे प्रमाण आपण बघावे. त्या ठिकाणी कातळ आणि खडकाळ जमीन आहे. आपण संपूर्ण महाराष्ट्राला जो एकच निकष लावलेला आहे त्यामध्ये कोकणासाठी निकष बदलणार का ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25720 .....

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आता जी नवीन नरेगा योजना सुरु झालेली आहे त्यामध्ये आपण काही निकष बदललेले आहेत. ज्या ठिकाणी शेतकरी शेततळे करणार आहे त्या ठिकाणी त्याला मुभा देण्यात आलेली आहे की, त्या ठिकाणी खडक असेल तर तेवढ्या प्रमाणामध्ये त्यांनी खोदकाम करावे किंवा टप्प्याटप्प्याने जेवढा खर्च होईल तेवढी मजुरी त्याला देता येणार आहे. इतकेच काम केले पाहिजे अशी पूर्वीसारखी मर्यादा त्याला राहणार नाही. त्याला पाहिजे तसे कितीही आकारमानाचे शेततळे ते त्या ठिकाणी करु शकतात. त्यामुळे त्यांना आता निकषाची अडचण राहणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 2010 च्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या शेततळ्यांचा उल्लेख होता. 2010 सालापासून या शेततळ्यांपैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये नरेगा योजनेमधून फक्त 78 शेततळी झालेली आहेत. सध्याच्या परिस्थितीत सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बागायतदारांना त्यांच्या बागायतीमध्ये काम करण्यासाठी मजूर मिळत नसताना त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सातत्याने गेले पंधरा दिवस दररोज संध्याकाळी व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे सर्व अधिकाऱ्यांना वेठीस धरुन कामाला लावण्याचा प्रयत्न चाललेला आहे. हे निकष बदलून सध्या अधिकाऱ्यांवर चाललेली जबरदस्ती शासन थांबविणार का ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्यातील मजुरांना काम मिळावे, कोकणातील सुध्दा जे मजूर असतील त्यांना काम मिळाले पाहिजे या उद्देशाने अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करीत आहोत. बऱ्याच ठिकाणी मजुरांना काम मिळत नाही अशा तक्रारी येतात आणि त्या ठिकाणी जर अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असेल, दुर्लक्ष होत असेल तर त्या ठिकाणी अधिकारी अलर्ट राहिले पाहिजे, त्यांनी पाठपुरावा केला पाहिजे यासाठी आपण या गोष्टीचा आग्रह करीत आहोत. कोकणामध्ये सुध्दा कोणताही मजूर कामाविना राहावयास नको यासाठी अधिकाऱ्यांना आपण आग्रहाची भूमिका घ्यावयास लावलेली आहे. यामध्ये मजुरांना काम मिळाले पाहिजे हाच प्रामाणिक उद्देश आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25720 .....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या बांधलेल्या शेततळ्यांमधून पाणी झिरपत असल्यामुळे शेततळ्यांना सिमेंटचे किंवा प्लास्टीकचे अस्तरीकरण करण्यासाठी शेतकरी अनुदान मागतात पण ते अनुदान मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिसाद अत्यल्प आहे असे मला वाटते. शासन या बाबतीत आपली भूमिका किंवा धोरण बदलणार आहे का ? ते केले तर शेतकरी शेततळी करतील. नाही तर पाणी झिरपून गेल्यामुळे त्याचा काही उपयोग होत नाही. यामध्ये 1 लाख 70 हजार रुपये खर्च आहे. ती मर्यादा शासन वाढविणार आहे का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25720.....

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, नरेगा या योजनेतून शेततळे करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामध्ये या तळ्यात प्लास्टिक टाकून देण्याचीही तरतूद केलेली आहे. मजुरीवर खर्च झाल्यानंतर प्लास्टिकचा कागद दिला जाणार आहे. त्याचे व्हाऊचर्स देण्याची सुध्दा शासनाने तयारी ठेवलेली आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, उत्तराच्या दुसऱ्या भागामध्ये असे नमूद केलेले आहे की, शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी वृत्तपत्रीय प्रसिध्दी देऊन शेतकऱ्यांपर्यंत ही योजना पोहोचविलेली आहे. कोकणामध्ये या योजनेचा प्रचार व प्रसार करीत असताना सर्व वर्तमाने तेथे पोहोचत नाहीत, याचाही विचार करणे आवश्यक आहे. या योजनेची सर्व ग्रामसेवकांना माहिती देण्यात आली आहे काय, देण्यात आली असेल तर किती ग्रामसेवकांनी शेततळ्यांसाठी शासनाकडे प्रकरणे पाठविलेली आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या योजनेला प्रतिसाद मिळण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामध्ये घडी पत्रिका गावोगावी अधिकाऱ्यांमार्फत व ग्रामपंचायतींमार्फत वाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली आहे, पोस्टर्स लावलेले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर क्षेत्रीय बैठका सुध्दा घेतल्या जातात. अशा अनेक प्रकारे या योजनेचा प्रचार व प्रसार केलेला आहे, त्यामुळे कोणत्याही गावाला व मजुरांना या संदर्भात माहिती मिळत नाही असे झालेले नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. सन्माननीय सभासदांना माझी विनंती आहे. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एकेका प्रश्नाला 15-16 मिनिटांचा वेळ लागत आहे. माझ्या अनेक सहकारी मित्रांना आपापला प्रश्न डेव्हलप करण्यासाठी 5-7 मिनिटांचा वेळ लागतो. अशा प्रकारे प्रश्न डेव्हलप करण्यासाठी वेळ जात असल्यामुळे ज्या इतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न दिलेले असतात ते प्रश्न चर्चेसाठी येत नाहीत. वास्तविक हे प्रश्न यादीमध्ये येण्यासाठी सन्माननीय सदस्यांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. आज केवळ 6 प्रश्नांवर चर्चा झालेली आहे. इतक्या कमी प्रश्नांवर चर्चा होण्यामध्ये सन्माननीय सदस्यांना समाधान मानावयाचे असेल तर एकाच प्रश्नासाठी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ ST/

सभापती.....

संपूर्ण प्रश्नोत्तराच्या तासाचा वेळ देण्यास काही हरकत नाही. अल्पकालीन चर्चेवर बोलत असताना मुद्दा डेव्हलप करण्यासाठी वेळ लागणे मी समजू शकतो. परंतु एखाद्या सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न डेव्हलप केला तर सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न डेव्हलप केला पाहिजे असा त्याचा अर्थ होत नाही. म्हणून माझे असे मत आहे की, उद्या पासून प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 11-12 प्रश्नांवर उपप्रश्न झाले पाहिजेत. आज पहिल्या प्रश्नासाठी नऊ मिनिटांचा वेळ लागला, तिसरा प्रश्न विसाव्या मिनिटाला आला, त्यानंतरच्या प्रश्नाला अकरा मिनिटे लागली. हे काही बरोबर नाही. कोणताही प्रश्न असला तरी तो 5-6 मिनिटांत संपवून मी पुढच्या प्रश्नांकडे जाणार आहे. त्यासाठी मला सर्व सन्माननीय सदस्यांचे सहकार्य मिळणे गरजेचे आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ ST/

पृ.शी.: महाशतकाचा विश्वविक्रम केल्याबाबत विश्वविख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे अभिनंदन

मु.शी.: महाशतकाचा विश्वविक्रम केल्याबाबत विश्वविख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे अभिनंदन

सभापती : "विश्वविख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचे महाशतक करुन विश्वविक्रम केल्याबद्दल हे सभागृह त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे."

विश्वविख्यात क्रिकेटपट्टू सचिन तेंडुलकर यांच्या अभिनंदनाचा हा प्रस्ताव या सभागृहाने एकमुखाने संमत केला आहे. अभिनंदन प्रस्तावाची एक प्रत सचिन तेंडुलकर यांच्याकडे पाठविण्यात येईल.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ ST/

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बुलढाणा जिल्ह्यातील साठवण तलावांच्या कामासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेबाबत" या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.रणजित पाटील, श्री.धनंजय मुंडे यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 21597 ला दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापण्यात यावी.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज काही नियम 93 अन्वये सूचना आलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे व नागो पुंडलिक गाणार यांनी "गेल्या 10 वर्षापासून राज्यातील माध्यमिक शाळांमधील अनुदान तत्वावरील पायाभूत पेक्षा वाढीव पदांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर व रामनाथ मोते यांनी "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासह शहरातील सुमारे 46 शिक्षण संस्था व इतर संस्थांचे वेबसाईट हॅक करण्यात आल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "मुंबईहून सोलापूरकडे 11 टन गॅस घेऊन जाणारा हिंदुस्थान गॅस कंपनीचा टँकर दिनांक 18.3.2012 रोजी वा त्या सुमारास तळेगाव जवळ दुभाजकाला धडकून पलटी झाल्याने मोठ्या प्रमाणावर गॅस गळती झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे यांनी "कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचे चारही दरवाजे भाविकांसाठी उघडण्यासाठीच्या मागणीबाबत सह्यांची मोहीम सुरु करुन आंदोलन करावे लागण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "शाळा, महाविद्यालये आणि शिक्षणसंस्था यांना व्यापारी दराने वीज बिले भरावी लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकांना सहा महिने झाले तरी आधार कार्ड न मिळाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "बुलढाणा जिल्ह्यात मार्च, 2012 वा त्या सुमारास वणवा पेटलेला असताना सातपुडा पर्वतरांगातील अंबाबरवा अभयारण्यात भीषण आग लागल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर व श्रीमती शोभा फडणवीस यांनी "राज्यात उन्हाळ्या दरम्यान निर्माण होणारी पाणी टंचाई लक्षात घेता ग्रामीण पाणी पुरवठा भूजल सर्वेक्षण विभागाच्या वतीने पाणी टंचाईचा आराखडा तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविलेल्या पाणी टंचाईच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता प्रदान करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

आता मी शुक्रवार, दिनांक 16 मार्च 2012 रोजी प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचना वाचून दाखवित आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "दिनांक 14 मार्च 2012 रोजी निलंबित उप जिल्हाधिकारी श्री. नितीश ठाकूर यांच्या मुंबई व रायगडशी संबंधित 37 मालमत्तांवर प्राप्तीकर खात्याने छापे टाकल्यानंतर सुमारे 118 कोटी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता सापडल्यानंतर त्यांना कुटुंबीयांसह अटक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे व नागो गाणार यांनी "केन्द्राच्या 6 व्या वेतन आयोगच्या धर्तीवर केंद्राने माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांना 15600-39100 ची वेतनश्रेणी व 5400 रुपये ग्रेड वेतन व राज्य

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

शासनाने 9300-34800 ची वेतनश्रेणी व 4800 रुपये ग्रेड वेतन देऊन भेदभाव केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे व रामनाथ मोते यांनी "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिक योजनेअंतर्गत खरेदी केलेले अवजारेसंच 100 टक्के अनुदानावर आधारित वितरित करण्याची योजना असताना कर्जाऊ आधारावर वितरित करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील व भगवान साळुंखे यांनी "नागपूर विभागाअंतर्गत गडचिरोली व गोंदिया हे जिल्हे पूर्णपणे आणि भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात काम करणा-या शासकीय कर्मचा-यांना एकस्तर पदोन्नती, अतिरिक्त घरभाडे भत्ता व 15 टक्के प्रोत्साहन भत्ता शासनाने मंजूर करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, यांनी "जळगाव येथील शासकीय जिल्हा रुग्णालयातील डॉ.विजया चौधरी यांचा दिनांक 12 मार्च, 2012 च्या सुमारास खून झाल्याची उघडकीस आलेली बाब " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर यांनी "दिनांक 15 मार्च, 2012 रोजी नवी मुंबई पोलिसांच्या सेवेत असलेले पोलीस अधिकारी आधि कर्मचारी यांना मद्याची बेकायदा वाहतूक केल्याप्रकरणी गोवा पोलिसांनी अटक केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :. सरकारी रुग्णालयात निवासी डॉक्टारांना मारहाण होत असल्याचे प्रकार थांबविण्यासाठी रुग्णालयांमध्ये पोलीस चौक्या उभारणे

मु. शी. : सरकारी रुग्णालयात निवासी डॉक्टारांना मारहाण होत असल्याचे प्रकार थांबविण्यासाठी रुग्णालयांमध्ये पोलीस चौक्या उभारणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे,श्री.जयप्रकाश छाजेड, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री.मोहन जोशी, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सरकारी रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांकडून निवासी डॉक्टरांना मारहाण होण्याचे वाढते प्रकार,गतवर्षी केईएम रुग्णालयातील निवासी डाक्टरांना मारहाण झाल्यानंतर राज्यातील सर्व निवासी डॉक्टर संपावर जाणे, नोव्हेंबर, 2011 मध्ये निवासी डॉक्टरांच्या संघटनेने मागणी केल्याप्रमाणे, रुग्णालयांमध्ये पोलीस चौक्या स्थापन करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने गृह विभागाकडे पाठविलेला प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असल्याने निवासी डॉक्टरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यात वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टर्सवर रुग्णांच्या नातेवाईकांकडून वारंवार हल्ले होतात. काही हल्ले गैरसमजुतीतून होतात. त्यासाठी शासनाकडून काही उपाययोजना केल्या गेल्या आहेत. मागच्या वर्षी के.ई.एम. रुग्णालयामधील निवासी डॉक्टरांवर हल्ला झाला होता. काही रुग्णालयांमधील परिचारकांवर हल्ला झाला. के.ई.एम.रुग्णालयातील निवासी डॉक्टरांवर हल्ला झाला, त्यावेळी तेथील निवासी डॉक्टर्स संपावर गेले होते. प्रत्येक मोठया रुग्णालयांमध्ये पोलीस चौक्या उभारण्यात येतील अशा प्रकारचे अभिवचन शासनाकडून निवासी डॉक्टरांना देण्यात आले होते. त्या रुग्णालयांमध्ये पोलीस चौक्या केंव्हा उभारण्यात येतील ? शासनाने यासंबंधी कायदा केलेला आहे, परंतु पोलीस अधिकाऱ्यांना त्या कायद्याविषयी माहिती नाही. कारण हा अजामीनपात्र गुन्हा आहे. या कायद्याची पोलीस अधिकाऱ्यांना माहिती नसल्यामुळे ते कडकपणे अंमलबजावणी करु शकत नाही. सर्व पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना या कायद्याची माहिती अवगत करण्यात येईल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या रुग्णालयामध्ये मेडीकल लिगल केसेस करण्यासाठी शासनाकडून पोलिसांची नेमणूक केली जाते. परंतु संरक्षणाच्या दृष्टीने मधल्या काळात मार्डने मागणी केली होती. त्याप्रमाणे बैठक घेऊन या सर्वच महाविद्यालयातील रुग्णालयांना अतिरिक्त पोलीस अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सूचना देत आहोत. मेडीकल लिगल केसेस करण्यासाठी शासनाने प्रत्यक्षात पोलीस अधिकारी आणि कर्मचारी नेमलेले आहेत. परंतु संरक्षणाच्या दृष्टीने अतिरिक्त पोलीस अधिकारी आणि कर्मचारी असावेत अशी त्यांची मागणी आहे. प्रत्येक महाविद्यालयांच्या रुग्णालयांची व्याप्ती ही मोठया प्रमाणात आहे, त्यामुळे या रुग्णालयांना सूचना देऊ इच्छितो की, प्रत्येक रुग्णालयात त्याची प्रायव्हेट सिक्यूरिटी एजन्सी असणे गरजेचे आहे. कारण आपण पाहतो की, पेडीयाट्रीकमध्ये मुलांना पळवून नेण्याचा घटना घडता आहेत. तेथेही सी.सी.टी.व्ही. लावावेत अशा प्रकारच्या सूचना त्या सर्व रुग्णालयांना दिलेल्या आहेत. अनेक वैद्यकीय महाविद्यालयाची रुग्णालये 500 ते 600 बेडस् असलेली आहेत आणि त्या रुग्णालयांचा आवाका देखील फार मोठा आहे. याबाबतीत शासनाची भूमिका सकारात्मक आहे. रुग्णांलयात निवासी डॉक्टरांना मारहाण करण्याच्या घटना घडतील त्या बाबतीत अजामीनपात्र गुन्हे दाखल करावेत अशा पध्दतीच्या सूचना पोलीस स्टेशनला देण्यात येतील.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाने कायदा केला असल्याचे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. या कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत त्या मी सभागृहासमोर मांडू इच्छितो. पोलीस संरक्षण फक्त अपघात विभागात असते. वास्तविक दोन ठिकाणी मारहाणीचे प्रकार घडतात. वॉर्डमध्ये आणि आयसीयू किंवा आयसीसीयूमध्ये रुग्ण दगावतो त्या ठिकाणी असे प्रकार घडतात. प्रत्येक रुग्णालयामध्ये प्रशासनातर्फे किंवा शासनातर्फे या दोन विभागामध्ये सिक्युरिटी ठेवण्याची व्यवस्था केली जाईल काय? आज मुंबईतील के.ई.एम., जे.जे.किंवा नायर रुग्णालयामध्ये आयसीयू बाहेर पोलीस संरक्षण उपलब्ध नाही. या कायद्यांतर्गत जे गुन्हे दाखल होतात ते नॉन बेलेबल ऑफेन्स म्हणून जाहीर केले जातात. त्यामुळे आजपर्यंत या कायद्यामुळे किती लोकांना शिक्षा झाली, असे गुन्हे यापुढे जलदगती न्यायालयापुढे चालविले जातील काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले की, अनेक रुग्णालये 500 ते 600 खाटांची आहेत. प्रत्येक वॉर्ड आणि आयसीयूमध्ये संरक्षण देणे शक्य होणार नाही. गृह विभागाची वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाला हीच विनंती आहे की, प्रत्येक रुग्णालयामध्ये त्यांची स्वत:ची सिक्युरिटी उपलब्ध असणे गरजेचे आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी निश्चितपणे आहे. प्रत्येक रुग्णालयामध्ये आयसीयू विभागात 50-50 खाटा असतात. त्या ठिकाणी अनेक प्रवेशद्वारे असतात. हे विचारात घेतले तर प्रत्येक हॉस्पिटलमध्ये किमान 100 पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील, याची माननीय सदस्यांना कल्पना आहे. जो कायदा केला आहे त्या अनुषंगाने गुन्हे दाखल व्हावेत या दृष्टीने सूचना दिलेल्या आहेत. आतापर्यंत किती गुन्हे दाखल झाले व किती जणांना शिक्षा झाली याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. निश्चितपणे ती माहिती दिली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, दुर्दैवाने एखादा रुग्ण दगावल्यानंतर त्याच्या नातेवाईकांची जी मानसिकता असते त्याचे समर्थन होऊ शकत नाही. त्याचबरोबर होणाऱ्या मारहाणीचे समर्थनही होऊ शकत नाही. दुर्दैवाने अशा घटना दूरचित्रवाणीवर दाखविण्याचे प्रमाण वाढीला लागले आहे. कोणत्याही 500 खाटांच्या हॉस्पिटलमध्ये आयसीयू वॉर्ड दोन ते तीन असतात. अशा वॉर्डमध्ये अनेक प्रवेशद्वारे नसतात, तर एकच प्रवेशद्वार असते. त्यामुळे हॉस्पिटलची सिक्युरिटी आणि पोलिसांची कुमक त्या ठिकाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

तिथे गणवेषातील पोलीस दिसून आला तरी अनेक गोष्टी नियंत्रणात येतील. म्हणून याची दखल घटना घडण्यापूर्वीच घेतली पाहिजे. कायदा व सुव्यवस्था राखायची असेल तर गुन्हा घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी ज्या काही गोष्टी आवाक्यात आहेत त्यांचा जरुर विचार केला पाहिजे. आयसीयू वॉर्डबाहेर रुग्णालय प्रशासनाच्या सिक्युरिटीबरोबर चर्चा करुन एखादा पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन दिला जाईल काय? जेणेकरुन असे मारहाणीचे प्रकार थांबण्यास मदत होईल. कायदा तयार झाल्यानंतर काही लोकांना मारहाण केल्याबद्दल अटक झाली. त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई होईल हा भाग वेगळा आहे. परंतु असे गुन्हे जलदगती न्यायालयासमोर चालविले पाहिजेत. लोकांना हेही कळले पाहिजे की, आपण रुग्णालयामध्ये अयोग्य पध्दतीने वागलो तर आपल्याविरुध्द कारवाई होऊ शकते. नवीन कायद्यांतर्गत आतापर्यंत ज्या लोकांविरुध्द कारवाई झाली त्याची माहिती सभागृहाला दिली जाईल काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हा विषय सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. रुग्णांची मानसिकता काय झालेली असते याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे रुग्णांचे कौन्सिलींग होणे गरजेचे आहे. तक्रार निवारण केंद्र प्रत्येक रुग्णालयामध्ये असणे बंधनकारक आहे. कायद्याच्या अनुषंगाने तशा सूचना दिलेल्या आहेत. असे केंद्र स्थापन करणे बंधनकारक असावे अशा प्रकारचा शासनाचा प्रयत्न आहे. नेमकी चूक काय आहे, कोणत्या पध्दतीने प्रकार घडतात हे देखील पाहणे गरजेचे आहे. जो प्रश्न माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केला, अशा प्रकारच्या घटनांमुळे किती अजामीनपात्र गुन्ह्यांची नोंद झाली याची माहिती निश्चितपणे पटलावर ठेवली जाईल. कायदा अस्तित्वात आल्यानंतरची आकडेवारी लक्षात घेतली तर निश्चितपणे घटना कमी झालेल्या आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सजेज उर्फ बंटी डी. पाटील.....

आणि अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांची एकत्र बैठक बोलावून ज्या ज्या हॉस्पिटल्समध्ये आयसीयूच्या ठिकाणी सुरक्षेची गरज भासणार आहे त्यासंदर्भात चर्चा करता येईल. तसेच या अनुषंगाने त्या त्या हॉस्पिटलच्या बाबतीत एक मास्टर प्लॅन तयार करता येईल व त्या त्या हॉस्पिटल्सची सुरक्षा व्यवस्था कशी सक्षम करता येईल अशी सर्व चर्चा करुन आवश्यक त्या सूचना आम्ही देऊ शकतो. तसेच अशा घटना टाळण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना आवश्यक असतील त्या केल्या जातील.

डॉ. नीलम गोऱ्हे : आताच चर्चेच्या दरम्यात हॉस्पिटलमध्ये पोलीस चौकीसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल काय अशी विचारणा करण्यात आली. पण पोलीस चौकीला जागा मिळणार व नंतर पोलीस येणार यामध्ये कालावधी जाण्याची शक्यता असते. राज्यात जे चार प्रकार घडले ते अतिशय गंभीर आहेत. त्यात जळगांव येथील डॉक्टर विजया चौधरी यांचा खून तेथील सेवकानेच केला. अशा परिस्थितीत त्या हॉस्पिटलची अंतर्गत सुरक्षा याचाही विचार करणे आवश्यक आहे. दुसरा प्रकार म्हणजे आरोपी आणि फिर्यादी यांच्या मारामारीच्या घटना घडत असतात. त्यांच्यात हाणामारी होणे हा सुध्दा गंभीर प्रश्न आहे. म्हणून पोलिसांनी घ्यावयाची दक्षता व हॉस्पिटलची आचारसंहिता असा एक प्रश्न आहे. त्यानंतर आरोपी पळून जाणे हा एक प्रकार. ससून हॉस्पिटमधून योगेश राऊत नावाचा आरोपी सहा महिन्यांपासून पळून गेला तो अद्यापही मिळाला नाही. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था सांभाळणे तसेच सर्व हॉस्पिटल्सच्या ठिकाणी असे गैरप्रकार घडू नयेत म्हणून एक आचारसंहिता तयार करावी व त्यासाठी आम्ही दिलेल्या सूचनांचा अंतर्भाव करणार काय ? त्याचप्रमाणे मुलांच्या बाबतीत एखादे दक्षता पथक निर्माण करता येईल काय, याचाही विचार करणे आवश्यक आहे.

आपण सांगितले की, तक्रार निवारण समिती असते. पण या तक्रार निवारण समितीच्या बाबतीत असे प्रकार होतात की हॉस्पिटल्समधून सामान चोरीला गेल्याची लोकांनी तक्रार केल्यानंतर त्याची दखल घेतली नाही तर पुढे काय करावयाचे हे लोकांना समजत नाही. पुन्हा पुन्हा हेच प्रकार होऊ नयेत म्हणून आचारसंहितेची गरज आहे. तसेच जी तक्रार निवारण समिती सध्या कार्यरत आहे तिला अधिकचे अधिकार देण्यात येतील काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : आपण म्हटल्यानुसार प्रत्येक हॉस्पिटलची रचना वेगवेगळी असते. हे विचारात घेऊन तसेच आपण ज्या ज्या शंका व भीती व्यक्त केली त्या विचारात घेऊन कायमस्वरुपी मास्टर प्लॅन किंवा आचारसहिंता या सर्वच बाबतीत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विचार करण्यात येईल. कारण आपल्या कायद्यातच म्हटले आहे की, असे प्राधिकरण कायदे तज्ज्ञांचे बनलेले असेल, आणि तसे ते बनले नसल्यास तशा सूचनाही दिल्या जातील.

<u>लक्षवेधी सूचना क्र. 2 बाबत</u>

सभापती : कामकाज पत्रिकेत क्र. 2 वर दाखविलेली लक्षवेधी सूचना माननीय मंत्री महोदयांच्या विनंती नुसार पुढे ढकलण्यात येत आहे व ही बाब मी लक्षवेधी सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

पृ.शी. : जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यात होत असलेला विलंब

मु.शी. : जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यात होत असलेला विलंब यासंबंधी श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेली पाण्याची भीषण टंचाई
मु.शी.: सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेली पाण्याची भीषण टंचाई यासंबंधी सर्वश्री दीपकराव साळुंखे, अनिल भोसले, संदिप बाजोरिया, जयवंतराव जाधव, हेमंत टकले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यात या वर्षाच्या हंगामात पडलेला अत्यल्प पाऊस, अपुऱ्या पावसामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जाणे, जिल्ह्यातील बहुतांश नदी, ओढे कोरडे पडणे, पाण्याची पातळी खोलवर गेल्याने करकंब (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील 21 वर्षीय मुलाचा विहिरीतील पाणी काढताना ओढवलेला मृत्यु, सदर मृत्यु प्रकरणी चौकशी करुन मृत मुलाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच पाणीपुरवठा पुरेशा प्रमाणात होणेबाबत सन 2012 ची जनगणना ग्राह्य धरुन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. लक्ष्मण ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

-नि वे द न-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे : महोदय, सोलापूर जिल्हा हा रब्बीचा जिल्हा असून गेल्या वर्षभरात या जिल्ह्यात 85 टक्के पाऊस झाल्याची माहिती मंत्री महोदयांनी दिलेली आहे. मी या निमित्ताने असे विचारु इच्छितो की, या जिल्ह्यात पर्जन्याचे मोजमाप करणारी यंत्रणा व्यवस्थित आहे काय, कारण एवढा पाऊस या जिल्ह्यात पडलेलाच नाही. त्याचप्रमाणे या जिल्ह्यात दरवर्षी जो पाऊस पडतो तो मान्सुनचा परतीचा पाऊस असतो. मागील वर्षी हे प्रमाण अतिशय अल्प असल्यामुळे सांगोला, मंगळवेढा आणि सांगलीतील कवठे-महांकाळ व आटपाडी या परिसरात अत्यल्प पाऊस इ ाल्यामुळे पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे....

टँकरने पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांकडे असल्यामुळे गावांना एक एक महिना टँकर उपलब्ध होत नाही. त्यामुळे टँकरने पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचे अधिकार तहसीलदारांकडे देण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील करकंभ गावामध्ये मागील महिन्यात एक कुंभार पाणी आणण्यासाठी गेला होता परंतु तो विहिरीत पडल्यामुळे त्याचा मृत्यू झालेला आहे. करकंभ गावामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. या गावाला 12.5 कोटी रुपयांची पाण्याची योजना मंजूर केलेली आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे परंतु 12.5 टक्क्याच्या 10 टक्के म्हणजे 1.25 कोटी रुपये लोक वर्गणी भरण्याची ग्रामपंचायतीची ऐपत नसल्यामुळे 12.5 कोटी रुपयांच्या पाणी पुरवठयाच्या योजनेचा प्रस्ताव कधीच मान्य होऊ शकत नाही. त्यामुळे या ठिकाणच्या लोकवर्गणीची अट शासन शिथिल करणार आहे काय ?

सभापती महोदय, गावाने टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केलेली आहे. त्यास 2001 ची जनगणना ग्राहय धरुन प्रत्येक माणशी 20 लिटर पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु जनावरांच्या पाण्याचा विचार करण्यात आलेला नाही त्यामुळे या ठिकाणी जनावरांनाही पाणी देण्याचा शासन विचार करणार आहे काय, तसेच या ठिकाणच्या चारा टंचाईच्या बाबतीतील जाचक अटी शासन रद्द करणार आहे काय ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सोलापूर जिल्हयाचे वार्षिक पर्जन्यमान 561 मि.मी.आहे. परंतु या वर्षी 477 मि.मी. पाऊस पडलेला आहे. याचा अर्थ सरासरीच्या मानाने सोलापूर जिल्हयामध्ये 85 टक्के पाऊस पडलेला आहे. करकंभ या गावाची लोकसंख्या 17,500 असून या गावाने अद्यापपर्यंत टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केलेली नाही. सदर गावाकडून टँकरने पाणी पुरवठा करण्याचा अर्ज केल्याबरोबर या गावाला टँकरने पाणी पुरवठा करण्यात येईल. टँकरने पाणी पुरवठा करण्याचे अधिकार आता जिल्हयाधिका-यांकडून तहसीलदारांना देण्यात आलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे...

सभापती महोदय, करकंभ गावातील कुंभार गल्लीतील एका मुलगा वस्तीपासून अर्धा कि.मी. अंतरावरील श्री. शिंदे यांच्या मालकीच्या विहिरीतून पाणी आणण्यासाठी गेला होता. परंतु पाणी काढत असतांना या मुलाचा पाय घसरल्यामुळे व त्याला पोहता येत नसल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या प्रश्नाच्या संदर्भात सविस्तर माहिती घेतली असतांना सरपंच,ग्रामसेवक व उपसरपंचाने माझ्याकडे लेखी निवेदन दिलेले आहे. या मुलाचा पारंपारिक पध्दतीने मडकी बनवण्याचा व्यवसाय होता. सदर तरुण 21 वर्षाचा होता. सदर कुटुंब आपल्या अंगणात गाडगे बनविण्याचा पारंपारिक व्यवसाय करीत असे. सदर तरुणाचा मृत्यू पाणी आणतांना झाला असे नसून या तरुणाला पोहता येत नसल्यामुळे विहिरीत बुडून या तरुण तरुणाचा मृत्यू झालेला आहे. घरातील कर्त्या तरुणाचा मृत्यू झालेला आहे. मृत्यूच्या अशा कारणाबाबत मदत मिळत नसते. सदर तरुणाच्या कुटुंबाला मुख्यमंत्री महोदयांच्या फंडातून मदत मिळावी याबाबतचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, करकंभ गावातील कुंभारवाडीत पिण्याचे पाणी नसल्यामुळे सदर तरुण पाणी आणण्यासाठी गेला असे नसून कुंभार गल्लीत दोन हात पंप असून या गावात पाण्याची पुरेशी सोय उपलब्ध आहे. कॅनॉलवर असलेल्या विहिरीतून तसेच पाणी पुरवठयाच्या एका जुन्या विहिरीतून या गावाला पाण्याचा पुरवठा केला जात असतो.

सभापती महोदय, या गावाने पाणी पुरवठयासाठी नवीन योजना सादर केली असून या योजनेच्या 10 टक्के लोकवर्गणी म्हणजे 1.25 कोटी लोकवर्गणी भरणे या गावाला अडचणीचे आहे. परंतु या योजनेची लोक वर्गणी या गावाने तातडीने भरली तर नेहमीच्या प्रचलित नियमाप्रमाणे ही योजना तातडीने सुरु करण्याबाबत अडचण असणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, केवळ नियमांच्या कक्षेत राहून या प्रश्नाकडे पहाता येणार नाही. कारण पाणी टंचाई हा अतिशय भीषण प्रश्न आहे. सध्या आपल्या महाराष्ट्रात एक प्रकारे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि त्यामध्ये जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न असेल, लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असेल तर याबाबतीत वेगळया दृष्टीने आणि गांभीर्याने पाहिले पाहिजे अशी माझी विनंती आहे. मला या विषयाच्या संबंधात दोन स्पेसिफीक प्रश्न विचारावयाचे आहेत. ज्या "क" वर्ग छोट्या नगरपालिका आहेत आहेत किंवा ज्या छोट्या ग्राम पंचायती आहेत त्यांची याबाबतीत बरीच अडचण होत आहे. म्हणून पाण्याच्या बाबतीत भूजल परीक्षण करावयाचे असेल किंवा त्याबाबतीत आणखी काही तांत्रिक अडचण असेल तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे सर्व नगर परिषदांना मदत करणार आहात काय तसेच अशा गावांना तांत्रिक मदत करण्याचेही आश्वासन देणार आहात काय? तसेच सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे साहेबांनी दुसरा महत्वाचा उल्लेख केला आहे. मात्र आपण आम्हाला कायद्याबाबतच सांगितले. परंतु ज्या गावाची लोकसंख्या 500 आहे, तेथे मागासवर्गीयांच्या अनेक वाड्या आहेत, गावे आहेत किंवा अल्पसंख्यांक गावे आहेत ज्यांची लोकसंख्या कमी आहे. अशा परिस्थितीमध्ये जर एखादा प्रकल्प करावयाचा असेल तर त्या गावाने काय करावयाचे आणि त्यासाठी तेथील सव्वा-सव्वा कोटी रुपये कुठून भरणार आहेत हा प्रश्न आहे. त्यामुळे मला माननीय मंत्री महोदयांना याबाबतीत असा स्पेसिफीक प्रश्न विचारावयाचा आहे की, कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, मागासवर्गीय लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, अल्पसंख्यांक असलेल्या गावां-साठी वेगळा विचार करणार आहात काय किंवा याबाबतीतील सदरहू निकष शिथिल करणार आहात काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय महत्वाच्या विषयाबाबत म्हणजे गावांना पाणी पुरवठा करीत असताना येणाऱ्या ज्या अडचणी आहेत त्यासंबंधात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. गेल्या दहा वर्षाच्या काळामध्ये जी योजना पाच लाख रुपया मध्ये होत होती, परंतु अलीकडच्या काळामध्ये सिमेंट व लोखंड याचे वाढलेले भाव लक्षात धेता त्या योजनांवरील खर्च आता 30 लाखाच्या वर जात असून यामध्ये जवळजवळ सहा पटीने भाववाढ झालेली आहे. जेव्हा एखादी योजना कमी किंमतीमध्ये होत होती, तेव्हा गावातील लोकांना आपल्या सहभागाची रक्कम देणे शक्य होत होते. परंतु आता जर लोकांच्या सहभागाची रक्कम जर सव्वा कोटी रुपयाच्या दरम्यान होत असेल तर अशा वेळी ही रक्कम भरणे शक्य होत नाही आणि बऱ्याच वेळेला दहा हजार, बारा हजार, पंधरा हजार लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये दहा ते पंधरा कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे . . . .

रुपयांच्या रकमा भरणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत माझ्या विभागाने असा मार्ग काढलेला आहे की, गावामध्ये कितीही मोठी योजना असली आणि तेथील लोकांना 10 टक्के पर्यंत सहभागाची रक्कम भरणे शक्य नसेल तर मग आम्ही गावाच्या वेशीपर्यंत किंवा त्या गावाच्या समोर हौदाचे किंवा पाण्याच्या टाकीचे काम करु आणि त्यानंतर गावाच्या अंतर्गत जी पाण्याची व्यवस्था करावयाची आहे, ती संबंधित गावाने ग्राम पंचायतीच्या सहभागातून करावी जेणेकरुन त्या गावाला पाणी सुलभपणे उपलब्ध होईल अशा पध्दतीने याबाबत विचार करण्यात आला आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे जमिनीला सोन्याचा भाव आलेला आहे. गाव पाणी पुरवठ्यासाठी हौदाकरता किंवा नदीच्या जवळ जागा उपलब्ध करुन दिली जाते. त्याची देखील बाजारातील किंमत धरुन लोक सहभागाच्या 10 टक्क्याच्या वर्गणीमध्ये ती रक्कम जमा करावी असाही विचार केलेला आहे. तिसरी बाब म्हणजे एखादे खेडे 100 मीटर पेक्षा अधिक अंतरावर असेल तर त्याची लोक सहभागाची वर्गणी कमी करावी असाही विचार केलेला आहे.तसेच 3 कि.मी.पेक्षा पाईप लाईन लांब असेल तर त्याबाबतीत देखील लोक सहभागाची वर्गणी कमी करावी अशा पध्दतीचा विचार याठिकाणी करण्यात आलेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी मघाशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधात मुद्दा मांडलेला आहे. त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. याविषयी सांगावयाचे तर ग्राम पंचायतीला तांत्रिकदृष्ट्या जो काही सल्ला आवश्यक आहे त्यासाठी अतिशय कमी म्हणजे 1 टक्का सुपरव्हीजनचे चार्जेस घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सल्ला देण्याबद्दल निश्चितपणे विचार केला जाईल.

यानंतर श्री.शिगम अ. .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले परंतु त्यांच्या संपूर्ण निवेदनामध्ये तोच तोच उल्लेख आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पाणी टंचाईच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे, सोलापूर जिल्ह्यातील तालुका पंढरपूर येथील करकंब येथे एका 21 वर्षीय तरुणाचा विहिरीतील पाणी काढताना मृत्यू झाला. माननीय मंत्री महोदयांनी त्या संदर्भात एक वाक्य उच्चारले ते आपण सर्वांनी ऐकले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, त्या मुलाला पोहता येत नसल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. पाणी टंचाईच्या काळात लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते त्यासाठी प्रत्येकाला पोहता आले पाहिजे असा फतवा शासन काढणार आहे काय ? पाणी काढताना विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू झाला हा एक अपघात होता असे ते म्हणाले असते तर ठीक होते. परंतु त्या तरुणाला पोहता येत नव्हते असे उत्तर योग्य वाटत नाही. तो एक संवेदनहीनतेचा मुद्दा वाटला. करकंब गावात पाण्याची टंचाई आहे असे सन्माननीय सदस्य सांगत असतील तर त्या ठिकाणी टँकरची सोय करण्यात येईल असे सकारात्मक उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, पाणी पुरवठा विभागाचा मंत्री म्हणून काम करीत असताना माझ्याकडे आलेल्या माहितीच्या आधारावर मी उत्तर दिलेले आहे. लक्षवेधी सूचनमध्ये असे म्हटलेले आहे की, विहिरीतील पाणी काढताना एका तरुणाचा मृत्यू झाला. परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही. गाडगे तयार करण्यासाठी पाणी लागते आणि ते आणण्यासाठी तो तरुण गेला होता. संवेदनतेची कोणती फूटपट्टी लावावयाची ते मला कळले नाही, हे मी मान्य करतो. मी एवढेच म्हणालो की, तो तरुण पिण्याचे पाणी काढण्यासाठी गेला नव्हता. परंतु त्या तरुणाचा मृत्यू झाला म्हणून माणुसकीच्या दृष्टीने त्याला मदत करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, यद्यपि यह प्रश्न सोलापुर जिले में पानी की कमी के बारे में है, लेकिन मैं आपको बताना चाहता हूँ कि विदर्भ के कुछ जिलों में पानी की कमी के बारे में गंभीर परिस्थिति पैदा हो गई है. इसका एक मुख्य कारण पानी का कम होना है और दूसरा कारण यह है कि नागपुर, चंद्रपुर, यवतमाल जिले के वणी तालुका और गडचिरोली जिले के कुछ भाग में माइनिंग की वजह से पानी का स्तर नीचे चला गया है. वहां पर पूरे साल पानी की

. . . T-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद जमा

समस्या रहती है. पानी की कमी का शार्ट टर्म सोल्यूशन यह है कि आप पानी के टँकर लगा देते हैं, लेकिन लाँग टर्म सोल्यूशन के लिए वहां के ग्राउण्ड वाटर का वैज्ञानिक अध्ययन और सर्वे होना बहुत आवश्यक है. इसलिए मंत्री महोदय से मेरा स्पेसिफिक प्रश्न यह है कि क्या आप अपनी अध्यक्षता में या पालक मंत्री की अध्यक्षता में पानी का स्तर किस वजह से कम हुआ है, क्या किसी जिऑलॉजिकल वजह से पानी का स्तर कम हुआ है, क्या माइनिंग की वजह से पानी का स्तर कम हुआ है, इस बारे में स्टडी करने के लिए नागपुर में मीटिंग लेंगे ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे मी स्वागत करतो. या संदर्भात बैठक घेण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आपण माणसासांठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली, परंतु जे पशुधन आहे त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय केली काय ? आज पशुधन कसायाच्या दिशेने धाव घेत आहे. तेव्हा या विषयी आपण दक्षता घेणार आहात काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, एखाद्या गावातील कोणा व्यक्तीने 40 लीटर ऐवजी 60 लीटर पाणी मागितले तर तेवढे पाणी गृहीत धरुन त्यास पाणी पुरविले जाते. मूक जनावर असो किंवा माणूस असो माणुसकीच्या दृष्टीने सर्वांना पाणी देणे हा आघाडीचा धर्म आहे आणि आम्ही त्याप्रमाणे निश्चितपणे प्रयत्न करु.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आपण जनावरांसाठी पाण्याची तरतूद केली असली तरी जनावरांना पाणी मिळत नाही अशी आमची माहिती आहे. मूक जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची तरतूद करणार आहात काय ?

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

पाण्याची जी टक्केवारी या ठिकाणी सांगण्यात आलेली आहे ती बरोबर नाही तसेच त्या संदर्भात तरतूद केलेली नाही ती करण्यात येणार आहे का?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : होय.

सभापती : मंत्री महोदय, 10 टक्के लोकवर्गणी म्हणजे सव्वा कोटी रुपये त्या करकंब गावाला द्यावे लागणार आहेत. या अनुषंगाने आता विभागाने काही तरतुदी करण्याचे ठरविलेले आहे. परंतु त्या ठिकाणी पाईपलाईनचे अंतर 3 कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर काय करावयाचे? म्हणून त्या ठिकाणी पाण्याची टाकी आणि पंप बसविण्यात येणार आहे त्या ठिकाणच्या जागेची बाजार भावाने किंमत धरुन हिशेब करण्यात यावा आणि ही लोकवर्गणी कमी करण्यात यावी. या संदर्भात मंत्री महोदयानी वेगवेगळे दोन ते चार प्रस्ताव सांगितलेले आहेत ते अत्यंत चांगले प्रस्ताव आहेत. परंतु एखाद्या गावाला सव्वा कोटी रुपये लोकवर्गणी भरावयास सांगितल्यानंतर ते गाव तेथेच हतबल होते. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारच्या अटी असताना सुध्दा अमरावती महानगरपालिकेला आणि अकोला महानगरपालिकेला शासनाने स्पेशल ग्रँट्स मंजूर केलेल्या आहेत. तेव्हा या ठिकाणीसुध्दा तशा प्रकारचा प्रयत्न करण्यात येणार आहे का, ज्यामुळे या ठिकाणच्या पाणी टंचाईचा प्रश्न सोडविणे सोईस्कर होईल.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना आणि आपले आदेश विचारात घेऊन या बद्दल हप्ते पाडून त्यांना मदत करता येईल काय याबाबत विचार करण्यात येईल....

सभापती : हप्ते पाडून नाही. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींसमोर हा प्रश्न आहे.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, लोकसहभागाची रक्कम जास्त होते ही आपली सूचना मान्य करुन माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या सल्याने ही रक्कम कमी करण्या बद्दल विचार करण्यात येईल.

श्री. दीपकराव साळुंखे : जनावरांच्या पिण्याच्या पाण्या बाबत माणुसकी हा धर्म पाळला जाईल असे सांगण्यात आलेले आहे. एका माणसाला 60 लिटर पाण्याची तरतूद केलेली आहे. माननीय मंत्री महोदय, दुष्काळी भागातील लोकप्रतिनिधी आहेत. पाणी नसल्यामुळे दर आठवडयाला हजारो जनावरे खाटीक बाजाराकडे जात आहेत. जनावरांच्या चाऱ्यासाठी शासन अधिकृतपणे तरतूद करणार आहे काय? माणशी पाणी देत असताना सन 2001 ची लोकसंख्या ग्राह्य धरलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिपकराव साळुंखे. . .

आहे. आता सन 2012 सुरु आहे. 20 टक्के लोकसंख्या वाढलेली आहे. माझ्या मतदारसंघात आता टँकरने पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. एक टँकर पाणी पुरवठा करुन परत गेल्यानंतर आठ-आठ दिवस तो परत येत नाही इतके निकृष्ट दर्जाचे टँकर पाणी पुरवठयासाठी वापरले जात आहेत. तेव्हा पाणी पुरवठयासाठी चांगली वाहने देण्यात येतील काय?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, परिपत्रक काढतानाच त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, सुस्थितीत असलेले शासकीय टँकर पहिल्यांदा उपलब्ध करुन द्यावेत आणि त्यानंतर जे खाजगी टँकर पाणी पुरवठयासाठी लावण्यात येतील ते टँकर त्या गावात पोहचले की नाही आणि पोहचल्यानंतर खात्री करण्यासाठी त्या गावच्या सरपंचाची देखील सही घ्यावी. त्याचबरोबर त्यावर एक लायझनिंग ऑफिसर नेमून त्याचे सुपरव्हिजन करण्याबद्दल देखील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मागासवर्गीयांना जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब

मु. शी. : मागासवर्गीयांना जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब यासंबंधी श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय समाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळणे, निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे, तसेच मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांचा लाभ मिळणे याकरिता आवश्यक असलेले जातपडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी राज्यात, जिल्हानिहाय स्थापन केलल्या जातपडताळणी समित्यांच्या मुख्यपदी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या अन्य ठिकाणी बदल्या/पद स्थापना झाल्यामुळे अनेक पदे रिक्त असणे, परिणामी मागासवर्गीय जनतेला जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्यामध्ये होत असलेला विलंब, जातपडताळणी समित्यांकडे असलेले हजारो अर्ज प्रलंबित असल्याने, मागासवर्गीय जनतेमध्ये पसरलेला असंतोष, या संदर्भात झालेली अनेक आंदोलन, शासनाने या संदर्भात केलेली कारवाई, शासनाची याबाबत प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्वप्रथम मला या ठिकाणी एक सूचना करावयाची आहे. सर्वच सन्माननीय सदस्य त्यांच्या भाषणात 'स्पेसिफिक' या शब्दाचा वापर करतात. तो शब्द चुकीचा आहे असे नाही, तो शब्द इंग्रजीमध्ये बरोबर आहे. पण 'मुद्देसूद उत्तर द्यावे' किंवा 'मुद्याला धरुन उत्तर द्यावे' असे म्हटले तर 'स्पेसिफिक' हा शब्द वापरण्याची आवश्यकता भासणार नाही. त्या शब्दासाठी 'मुद्याला धरुन उत्तर द्यावे' असा मराठीत चांगला शब्द आहे. अशी मी या ठिकाणी विनंतीवजा सूचना करीत आहे ती पाळणे अथवा न पाळणे हा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नियुक्त केलेली पदे रिक्त असण्याच्या संदर्भातील विषय या लक्षवेधी सूचनेमध्ये होता. परंतु कोणतेही पद रिक्त नाही अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. जात पडताळणी वेळेत व्हावी या करिता राज्य मंत्री मंडळाने 15 जिल्हाधिकाऱ्यांना पदोन्नती दिली होती हे खरे आहे काय तसेच या पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांपैकी श्री. अनिल कवडे, श्री. शेखर गायकवाड आणि श्री. सुमंत भांगे यांची पदोन्नती केलेली असताना त्यांना तिकडे न पाठविता जिल्हापरिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठविण्याचे प्रयोजन काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मंत्रिमंडळाने त्यावेळी दखल घेतली. जात पडताळणीच्या पध्दतीमध्ये राजकीय उमेदवारांची होणारी कोंडी आणि आताच्या निवडणुकीमध्ये जे काही झाले ते आपण पाहिले. एक आदेश निघाला आणि मुख्य सचिवांना साक्षीला जावे लागले. ही मुख्य सचिवांची चूक आहे की, मंत्रिमंडळाची चूक आहे ? या वेळच्या निवडणुकीमध्ये आपल्याला तो निर्णय बदलावा लागला. राज्य सरकारला आपला निर्णय बदलावा लागला की, आता जात पडताळणी प्रमाणपत्र अर्ज भरताना नसला तरी चालेल. एवढा मोठा घोळ निर्माण झाला आणि त्याची नोंद मंत्रिमंडळाने घेऊनच हे सर्व केले होते. हे तीन अधिकारी तसेच पदोन्नती झालेले मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील श्री. शेखर गायकवाड रुजू झाले नाहीत. आपल्या माननीय अध्यक्षांच्या कार्यालयातील श्री. निंबाळकर रुजू झालेले नाहीत. श्री. जयंत पाटील यांच्या कार्यालयातील श्री. विजय कळम-पाटील रुजू झालेले नाहीत. श्री. गणेश नाईक यांच्या कार्यालयात असलेले श्री. सतीश लोखंडे रुजू झालेले नाहीत. पुणे महानगरपालिकेमध्ये असलेले श्री. ठोंबरे यांनी पदोन्नती नाकारलेली आहे. या अधिकाऱ्यांची अशी भूमिका आहे की, आम्हाला आहे तिथेच ठेवा, पदोन्नती नसली तरी चालेल. एवढे त्या विभागामध्ये किंवा त्या त्या मंत्र्यांकडे किंवा इतर ठिकाणी गुळाला चिकटण्यासारखे काय राहिले आहे, हा एक मोठा प्रश्न आहे. पदोन्नती नाकारल्याचा परिणाम असा झाला आहे की, आज राज्यामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात कोंडी निर्माण झालेली आहे आणि राज्य सरकारला मान खाली घालण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदय ही जबाबदारी कोणावर टाकणार आहेत ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो बरोबर आहे. या कमिट्यांच्या निम्म्यापेक्षा जास्त जागा रिक्त होत्या म्हणून खास बाब म्हणून काही अधिकाऱ्यांना प्रमोशन देण्यात आले. ते प्रमोशन यासाठीच देण्यात आले की, त्यांना इकडे वर्ग करण्यात येईल परंतु राज्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसारखे पद किंवा वेगवेगळी पदे रिक्त असल्यामुळे तिकडे आवश्यक आहेत असे वाटले म्हणून त्यांना इकडे देऊ शकले नाहीत. परंतु 15

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ...

समित्यांपैकी फक्त 4 समित्या अशा आहेत की, ज्या समित्यांना ॲडिशनल चार्ज दिलेला आहे. आमचा माननीय मुख्यमंत्र्यांकडे सारखा प्रयत्न चालू आहे. मुख्य सचिवांना सुध्दा आम्ही कल्पना दिलेली आहे की ही पदे ताबडतोब भरली पाहिजेत. कारण हा सेन्सेटिव्ह विषय आहे. अडिशनल काम दिल्यामुळे फरक पडतो. त्या दृष्टीकोनातून प्रयत्न चालू आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा जो मुद्दा होता त्यामध्ये मी अधिकाऱ्यांची नावे वाचून दाखविली. मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर त्यांनी नियुक्तीवर जाण्याचे टाळले. हे मंत्रिमंडळाच्या शासकीय निर्णयाला आव्हान आहे. त्यांना आपण कोणता बडगा दाखविणार, त्यांना आपण कोणते शासन करणार ? ते त्या ठिकाणी गेले नाहीत. तीन अधिकाऱ्यांना आपण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पाठविले. इतर लोक आपली जागा सोडून गेलेले नाहीत त्यांच्यावर शासन कारवाई करणार की नाही ? सभापती महोदय, आपल्याच मान्यतेने मागच्या वेळी मी पोलीस अधिकाऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला होता आणि मला सांगण्यास आनंद वाटतो की, मी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केल्यानंतर अर्ध्या तासात त्यांची बदली करण्याचे आदेश दिले गेले होते. म्हणून हे जे अधिकारी आहेत त्यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा अवमान केलेला आहे त्या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार ? मी या ठिकाणी नावे वाचून दाखविलेली आहेत.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे 15 पैकी चारच कमिट्यांची पदे रिक्त आहेत आणि त्यांचा ॲडिशनल चार्ज इतरांना दिलेला आहे. त्या ठिकाणी काम बद नाही. त्या ठिकाणी काम चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, ते अधिकारी त्या ठिकाणी का रुजू झाले नाहीत ? राज्यामध्ये त्यांना इतर सेवा आवश्यक वाटली. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे पद रिक्त ठेवता येत नाही. त्यामुळे त्यांना त्या ठिकाणी पाठविण्यात आलेले आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, उमेदवारांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही म्हणून तो निर्णय मागे घेऊन त्यामधून त्यांना सूट देण्यात आली. परंतु काही मुले अशी आहेत की, त्यांचे शालेय वर्ष फुकट जाते की काय अशा प्रकारचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

चित्र आज महाराष्ट्रामध्ये आहे. मी आपल्याला एक उदाहरण देते. ठाणे जिल्ह्याचे जात पडताळणी कार्यालय कोकण भवनमध्ये आहे. तारापूरवरुन श्री. दर्जी नावाचे गृहस्थ गेले वर्षभर आपल्या मुलाला जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे म्हणून तारापूर ते कोकण भवन असे सारखे हेलपाटे मारत आहेत. त्या ठिकाणी श्री. भोसले नावाचे अधिकारी आहेत ते फक्त तारखा देण्याखेरीज काहीही काम करत नाहीत. या बाबतीत शासनाने काही तरी ठोस निर्णय घेऊन साधारणपणे त्यांना तीन महिन्यात तरी जात पडताळणी प्रमाणपत्र मिळावे अशी काही तजवीज शासनाने केली आहे का, जर ते केले नसेल तर केव्हा करणार ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, तीन महिन्यामध्ये ते द्यावे अशा प्रकारचा निर्णय आहे आणि त्या निर्णयावर आम्ही ठाम आहोत. परंतु यामध्ये जे लाभार्थी आहेत त्यांनी आपली आवश्यक कागदपत्रे वेळेवर दिली नाहीत किंवा जे संशयास्पद वाटतात त्यांच्या बाबतीत पोलीस चौकशी करावी लागते आणि त्याला थोडा वेळ लागतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

त्यांनी कागदपत्रे दिली तर 3 महिन्यामध्ये प्रमाणपत्र दिले जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी स्पेसिफिक उदाहरण दिले तर त्याबाबत कार्यवाही केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी नावासहित उदाहरण दिलेले आहे. मी सुध्दा नावासहित उदाहरण देतो. प्रशासनावर पकड ठेवण्याची सरकारची इच्छा दिसत नाही असे मी मघाशी म्हटले होते. ही पकड ठेवावयाची की नाही तो सरकारचा प्रश्न आहे, त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. सरकार कोणाचे आहे हे महत्वाचे नाही. सरकारचा प्रशासकीय यंत्रणेवर दबाव असलाच पाहिजे. ही माझी भूमिका आहे.

मी एक अधिकृत उदाहरण सांगत आहे. श्री.स्वप्नील भदाणे यांनी ज्ञानगंगा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. त्यांना सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर 3 वर्षांनी जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले. ते त्यांना कशा प्रकारे मिळाले ते सांगतो. त्यांनी महाविद्यालयाच्या जात पडताळणी समितीसमोर दिनांक 14.9.2010 रोजी अर्ज सादर केला. धुळे येथील दक्षता समितीसमोर तो अर्ज दिनांक 31.3.2011 रोजी आला. जात पडताळणी समिती,पुणे येथील कार्यालयात दि.14.7.2011 रोजी आला. त्या कार्यालयात श्रीमती मनिषा फुले ह्या संशोधन अधिकारी आहेत. संबंधित व्यक्तीकडे सर्व कागदपत्रे असली तरी पैसे घेतल्याशिवाय त्या प्रमाणपत्र देत नाहीत. श्रीमती वंदना राठोड, या लिपिकामार्फत त्यांच्याकडून मागणी आल्यानंतर शेवटी कंटाळून श्री.भदाणे यांनी 20 हजार रुपये दिल्यावर त्यांना दाखला दिला आहे. तो दाखला कार्यालयात सहा महिने पडून होता. श्री.भदाणे हे सातत्याने पाठपुरावा करीत होते.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एका महिला अधिकाऱ्याचे नाव घेऊन त्यांनी पैसे घेतल्याचा उल्लेख केला आहे. (अडथळा) यापूर्वी माझ्याकडे तक्रार आलेली नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, राज्यातील लाखो युवक किंवा अन्य लोक असे आहेत की, त्यांच्या दृष्टीने जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविणे म्हणजे जीवनमरणाचा प्रश्न झाला आहे. एखाद्या व्यक्तीला नोकरीची ऑर्डर मिळाल्यानंतर वर्ष दीड वर्षे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नाही अशी परिस्थिती आहे. या संदर्भातील एक प्रकरण माझ्याकडेही आले होते. एका मुलीची अधिकारी म्हणून निवड झाली होती. यासंबंधी असे समजले की, कोल्हापूरहून 3 दाखले पाठविण्यात आले आहेत. परंतु नेमका त्या मुलीचाच दाखला गहाळ झालेला आहे. नंतर त्या मुलीला असे कळविण्यात आले की, तुम्ही मूळ जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले तरच तुम्हाला नोकरीवर हजर करुन घेण्यात येईल. दुर्दैवाने एखाद्याचे प्रमाणपत्र ट्रान्झिटमध्ये गहाळ झाले असेल तर शासनाला डुप्लीकडे दाखला देता येतो. त्या मुलीला 5 महिने दाखलाच मिळाला नाही. ज्या विभागामध्ये ती मुलगी नोकरीला लागणार होती, त्यांनी तिचे नाव कमी केले. ही बाब माझ्या लक्षात आल्यानंतर मी त्यांना सांगितले की, ही पध्दत बरोबर नाही. मंत्री महोदय, हे गंभीर प्रकरण आहे, त्याबाबतची संपूर्ण माहिती मी आपल्याकडे देईन. या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत.

या लक्षवेधी सूचनेवर आपण फॉर्मल चर्चा करु. पण या विषयावर किमान दीड तासाची चर्चा केली पाहिजे असे मला वाटते. कारण राज्यात अनेक उमेदवारांची जात पडताळणी प्रमाणपत्राच्या बाबतीत क्रूर चेष्टा होत आहे. सन्माननीय मंत्री महोदय, आपण जरी फोन केला तरी कोल्हापूरचे बहाद्दर अधिकारी आपलाही फोन घेणार नाहीत. आपल्या विभागाचे सचिव सुध्दा गंभीरपणे दखल घेत नाहीत असा माझा अनुभव आहे. म्हणून या विषयावर 90 मिनिटांची चर्चा पुढील आठवड्यामध्ये घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे उदाहरण दिलेले आहे. त्या प्रकरणाचीही शासनाने गंभीरपणे चौकशी करावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले आहे त्याबाबत शासनाकडे लेखी तक्रार आलेली नाही. शासनाकडे ज्या प्रकरणांबाबत लेखी स्वरुपात तक्रार आलेली आहे त्या तक्रारींची गृह विभागामार्फत चौकशी.....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

यानंतर श्री.शिगम....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये या प्रश्नाचे जेवढे गांभीर्य आहे तेवढेच ते माझ्याही मनामध्ये आहे. या बाबतीत एकंदरीतच विद्यार्थ्यांना ज्या ज्या अडचणी निर्माण होतात त्या माझ्या लक्षात आलेल्या आहेत. म्हणून मी या विषयाच्या संदर्भात 90 मिनिटांची चर्चा पुढील आठवड्यामध्ये सभागृहामध्ये घेण्याबाबत सांगितलेले आहे. या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित राहिले तर अधिक चांगले होईल. मी त्यांना त्याबाबतीत विनंती करणार आहे. सन्माननीय मंत्री महोदय या प्रश्नाच्या बाबतीत अतिशय प्रामाणिक असले तरी त्यांचा विभाग या बाबतीत दुर्दैवाने काही करु शकत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत</u>

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षकांना रोजंदारीवर अत्यल्प वेतन दिले जात असल्याबाबत डॉ.सुधीर तांबे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक रोजंदारीवर (घड्याळी तासिकेप्रमाणे) नेमलेले आहेत. असे शिक्षक अनेक वर्षे काम करीत आहेत. त्यांचे वय वाढत चाललेले आहे. अशा शिक्षकांना नियमित सेवेत घेण्याविषयी शासनाचे नेमके धोरण काय ? अशा शिक्षकांना सध्या 12 रुपये व 15 रुपये तासिकेप्रमाणे वेतन दिले जाते. हे वेतन अत्यल्प आहे. शासन निर्णयानुसार अनुक्रमे 72 रु. व 54 रु. उच्च माध्यमिक व माध्यमिक शिक्षकांना तासिकेचे मानधन ठरविलेले आहे. परंतु त्याची आजतागायत अंमलबजावणी झालेली नाही. याबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, "राज्यामध्ये 600 शासकीय आदिवासी आश्रमशाळा आहेत. या आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे हे शासनाचे धोरण आहे. आज परिस्थिती अशी आहे की, राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. तसेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक हे रोजंदारीने तासिका पध्दतीवर घेतलेले आहेत. त्यांना प्रति तासिका 12 ते 15 रुपये इतके कमी मानधन दिले जाते. अन्य कोणत्याही सुविधा या शिक्षकांना मिळत नाहीत. याचा परिणाम आदिवासी मुलांच्या शिक्षणावर होतो. तेव्हा जे वर्षानुवर्षे रोजंदारीवर तासिकेप्रमाणे अध्यापनाचे काम करीत आहेत त्यांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत घेऊन शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरावित अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

--

19-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X-4
MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

पृ. शी./मु. शी. : राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अफूची शेती होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"गेल्या काही महिन्यात राज्याच्या विविध जिल्ह्यामध्ये अफूचे पीक होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. अफू पासून खसखस तयार करण्यात येते. परंतु त्याऐवजी नाही त्या पदार्थांसाठी त्याचा वापर करण्या-या व्यापा-यांचे जाळे तयार झाल्याचे आढळून आले आहे. शेतक-याला चांगले उत्पन्न देऊ शकणा-या ह्या पिकाच्या लागवडीबाबत राज्याच्या कृषी खात्याने योग्य धोरण तयार करुन देखरेख यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. याबाबत अनेक शेतक-यांना अटक झालेली आहे. ठिकठिकाणी छापे घालण्यात आलेले आहेत. या संदर्भात कृषी तसेच पोलीस खात्याने एकत्रितपणे योग्य ते मार्गदर्शन करण्याची अतिशय आवश्यकता आहे. शासनाने या बाबतीत गांभीर्याने विचार करावा."

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील विना अनुदानित व अनुदानित अध्यापक (डी.एड्.) विद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षात

शिकणा-या विद्यार्थ्यांना मिळणा-या शिष्यवृत्तीत तफावत असल्याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"राज्यातील समाज कल्याण विभागाअंतर्गत वाटप होणा-या विना अनुदानित व अनुदानित अध्यापक (डी.एड्.) विद्यालयातील प्रथम वर्ष व द्वितीय वर्षात शिकणा-या विद्यार्थ्यांना मिळणा-या शिष्यवृत्तीत मोठी तफावत असणे, याबाबत वर्धा येथील शिव वैभव अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांनी समाज कल्याण अधिकारी, यवतमाळ, नागपूर, अमरावती, मुंबई यांच्याकडून माहितीच्या अधिकारात माहिती मागविणे, त्यात मोठी प्रवर्गनिहाय तफावत दिसून येणे, राज्यात अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीचे एकच परिपत्रक असताना तफावतीचे कारण न समजणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, यात होत असलेला घोळ, विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : रोहा (जि.रायगड) तालुक्यातील मौजे तांबडी येथील मृत व्यक्तीच्या नावे खरेदीखत केल्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, रोहा (जि.रायगड) तालुक्यातील मौजे तांबडी येथील श्रीमती लक्ष्मीबाई गणपत गायकर व दामोदर जानू गायकर या दोन्ही व्यक्ती मयत असून लक्ष्मीबाई गणपत गायकर हया दिनांक 29.5.2004 रोजी मयत झाल्याची नोंद दप्तरी आहे, असे असूनही तांबडी येथील गट नं.412/2 या जागेची खरेदी दस्त 1995/2007 अन्वये दिनांक 26.6.2007 रोजी श्री. आंबेगावकर, राहणार मुंबई यांनी खरेदी केली आहे. मयत लक्ष्मीबाई गणपत गायकर व दामोदर जानू गायकर हे यापूर्वीच मयत असताना खरेदी खतावर सहया करणे शक्य नाही. सबब या बोगस व्यवहाराची चौकशी करुन या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांवर कठोर कारवाई होण्यासाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधीत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या खाजगी बस मालकांच्या सेवेचा समावेश "अत्यावश्यक सेवेत" करण्यात येण्याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या खाजगी बस मालकांनी नुकताच संप केला होता. बस मालकांच्या संपामुळे ऐन परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. विद्यार्थ्यांचे व पालकांचे अतोनात हाल झाले. बस मालकांनी आपल्या मागण्या मंजूर करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांना व पालकांना वेठीस धरले, ऐन परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांची गैरसोय करणे हे नियमबाहय आहे.

खाजगी बस मालकांवर कोणाचाही अंकुश नसल्याने व शासनाचेही कडक बंधन नसल्याने हा सगळा प्रकार झाला. यापुढे विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये व त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बस मालकांच्या सेवेचा समावेश "अत्यावश्यक सेवेत" करण्यात यावा यासाठी शासनाने कार्यवाही करावी ही विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : पुणे येथील शनिवारवाडयात रेन फॉरेस्ट कंपनीने पुरातत्व विभागाची परवानगी न घेता केलेले चित्रीकरण याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, दिनांक 28.2.2012 रोजी पुणे येथील शनिवारवाडयात चित्रीकरणासाठी रेन फॉरेस्ट जाहिरात कंपनीने पुरातत्व विभाग, तसेच महापालिकेची परवानगी न घेता केलेले चित्रीकरण, या चित्रीकरणासाठी शनिवारवाडयाचे रुपांतर करुन संरक्षण भिंतीबाहेर कारागृहाना जशा जाळया असतात तशा जाळया बसविण्यात येणे, पूर्ण दरवाजावर "पालम जेल" अशी पाटी लावण्यात येणे, तसेच दरवाजाजवळ पोलीस चौकी उभारुन विना परवाना शनिवारवाडयाचे विद्रुपीकरण करण्यात येणे, विना परवानगी चित्रीकरणाकरिता संबंधित कंपनीच्या मालकाविरुध्द भारतीय पुरातत्व संरक्षण कायदा 1958 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून आपणामार्फत शासनास विनंती करीत आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : पुणे शहरात अंमली पदार्थांची वाढती तस्करी आणि वापर याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, पुणे शहरात अंमली पदार्थांची वाढती तस्करी आणि वापर यांचे प्रमाण अत्यंत जास्त असणे, पोलिसांनी वेळोवेळी जप्त केलेले कोकेन, ब्राऊन शुगर, अफू, गांजा यासारखे अंमली पदार्थ गेल्या आठ वर्षापासून त्यांच्याकडेच पडून असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, सदरहू अंमली पदार्थ नष्ट करण्यासाठी आवश्यक असलेली समिती अद्याप नेमण्यात आलेली नसणे, पुणे येथे सन 2009 पासून अंमली पदार्थांच्या गुन्हयांची व आरोपांची संख्या वाढत असणे जप्त केलेले अंमली पदार्थ पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल खोलीत ठेवले जातात, त्यासाठी अधिकारी असलेली समिती 2003 नंतर नेमण्यात आलेली नसणे, जप्त केलेल्या अंमली पदार्थाकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्याचे नार्कोटीक्स ब्युरोचे संकेत असतानाही अद्याप यावर अंमलबजावणी झालेली नसणे, संपूर्ण तरुण पिढी नष्ट करणाऱ्या अंमली पदार्थांच्या बाबतीत शासन उदासीन असल्यामुळे शासनाप्रती पुणे परिसरातील नागरिकांच्या मनात निर्माण झालेली नाराजीची भावना व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, पोलिसांकडून जप्त केलेले अंमली पदार्थ पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल खोलीत ठेवले जातात, त्यासाठी अधिकारी असलेली समिती 2003 नंतर नेमण्यात आलेली नाही, ती समिती तत्काळ नेमण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 1 वाजून 40 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(1.05 ते 1.40 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

उप सभापती : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी मांडला असून सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिलेले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज सोमवार दिनांक 19 मार्च व उद्या मंगळवार दिनांक 20 मार्च, 2012 अशी एकूण दोन दिवस होणार असून या दोन्ही दिवसांचे सभागृहाचे कामकाज लक्षात घेता राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सर्वसाधारणपणे एकूण 5 तासांचा कालावधी उपलब्ध आहे व त्यातील मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासाठी 1 तासाचा कालावधी गृहित धरल्यास उर्वरित 4 तास चर्चेसाठी उपलब्ध होतील. त्यातील प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणासाठी 20 ते 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या प्रतोदांमार्फत 10 मिनिटांत पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेच्या बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

आता प्रस्ताव मांडणारे सदस्य श्री. उल्हास पवार हे भाषण करतील. तद्नंतर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सदस्य श्री. हेमंत टकले भाषण करतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेवरील कामकाजाच्या क्रमाबाबत</u>

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु करण्याच्या बाबतीतच माझी हरकत आहे. कामकाज नियमितपणे पार पडण्यासाठी या सभागृहाच्या काही प्रथा व परंपरा आहेत. त्यानुसार आम्ही अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी नियम 289 अन्वये सूचना दिली होती. त्या सूचनेच्या अनुषंगाने माननीय सभापतींना त्या प्रस्तावाची चर्चा घ्यावी अशी देखील आम्ही विनंती केली होती. पण माननीय सभापतींनी महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या संदर्भात सभागृहात नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घ्यावी अशी आम्हाला सूचना केली व ती आम्ही मान्य केली. त्यानुसार सभागृहात चर्चा सुरु होण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी आग्रहाने सांगितले होते की या चर्चेला मी उत्तर देणार आहे. वास्तविक या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे आहेत. अशा प्रकारच्या प्रस्तावावरील चर्चेला सहसा माननीय उप मुख्यमंत्री हे सभागृहाचे नेते म्हणून उत्तर देत असतात. पण माननीय मुख्यमंत्र्यांनीच तसा आग्रह धरला होता व त्यांना दि. 16 मार्च, 2012 रोजी बाहेर जायचे असल्याने ती चर्चा अर्धवट ठेवली गेली. तसेच या चर्चेसाठी कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज सूध्दा बाजूला ठेवण्यात आले, पुढे ढकलण्यात आले. त्या दिवशी मात्र माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ नसल्याने ही चर्चा अर्धवट राहून गेली होती. या प्रस्तावाला उत्तर कोणी द्यावे हा आमचा प्रश्न नसून तो शासनाचा प्रश्न आहे. आज मात्र कामकाज पत्रिकेवर राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा प्रथम दाखविण्यात आलेली आहे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकावरील नियम 97 ची चर्चा त्यानंतर ठेवण्यात आली आहे. खरे तर हा आपल्या महाराष्ट्राचा, राज्यातील जनतेच्या अस्मितेचा प्रश्न आहे त्याला प्राधान्य न देता आपण त्या जागी दुसरा विषय चर्चेला घेत आहात.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा दोन दिवस असते. त्यात आजचा पहिला दिवस आहे. पण ही महत्वाची चर्चा नंतर ठेवल्यामुळे एक प्रकारे संशयाचे वातावरण तयार होण्याची शक्यता आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या संदभार्त सर्वच नेत्यांचे बोलणे संपलेले आहे व फक्त मी आणि उत्तर देणारे मंत्री एवढाच वेळ यासाठी लागणार असल्याने अगोदर ही चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

इतर कोणता विषय असता तर आम्ही एवढा आग्रह धरला नसता. यासंदर्भात मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगितले तर त्यांनी सांगितले की, शासनाने नियमाप्रमाणे कामकाज पत्रिका तयार केली आहे. नियम 97 अन्वयची चर्चा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकामाच्या संदर्भातील आहे त्यामुळे त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाच्या सर्व सदस्यांनी तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. हा विषय केवळ विरोधी पक्षाचा नसून संपूर्ण सभागृहाचा हा आहे त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या चर्चेला प्राधान्य द्यावे अशी मी आपल्यापुढे नम्रपणे विनंती करतो.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सन्माननीय उप सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शुक्रवार दिनांक 16 मार्च, 2012 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक बांधण्याचा राज्य सरकारने जो निर्णय घेतलेला होता व त्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केल्यामुळे राज्य शासनाने या सभागृहात तातडीने चर्चा करण्याचा निर्णय घेतला होता.

आजच्या कामकाजामध्ये माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर चर्चा होणार आहे. सदर कामकाज 3-4 तास सुरु राहू शकेल. त्यानंतर यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका बाबतच्या चर्चेला उत्तर देणार आहेत. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला आता सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाची चर्चा मध्येच तहकूब करुन त्यानंतर माननीय छत्रपती शिवाजी महाराजांच्या चर्चेला सुरुवात करण्यात यावी व ही चर्चा पूर्ण झाल्यानंतर मग माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला पुन्हा सुरुवात करावी.

उप सभापती : माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चा आज 3.00 वाजेपर्यंत करण्यात यावी असे माननीय सभापती महोदयांनी मला सांगितले आहे. 3.00 वाजता नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. सदर चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. हेमंत टकले, विनायक मेटे तसेच श्री. दिवाकर रावते आपले विचार व्यक्त करणार आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शुक्रवारी सभागृहामध्ये मी 6.00 वाजेपर्यंत उपस्थित होतो. त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचे नाव पुकारण्यात आले होते त्यावेळेस ते सभागृहात हजर नव्हते. त्यादिवशी या चर्चेमध्ये माझे भाषण व माझ्या भाषणानंतर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर राहील असे ठरले होते.

उप सभापती : माननीय सभापती महोदयांनी नियम 97 अन्वयेच्या चर्चेवर 3 सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांची दुपारी फ्लाईट असल्यामुळे सोमवारी विचार मांडण्याची संधी मिळावी अशी त्यांनी माझ्याकडे लेखी विनंती केली होती व त्या प्रमाणे मी त्यांना परवानगी दिलेली होती.

आता माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या प्रस्तावाला सुरुवात करण्यात येईल व प्रथम वक्ते म्हणून ज्यांनी प्रस्ताव दिला ते सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार भाषण करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु...

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महामहिम राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्दे व आशय पाहिला तर आपल्या सर्वांच्या लक्षात येईल की, ग्रामविकास, शेतक-यांना सहकार्य, बेरोजगारी दूर करण्याचा प्रयत्न, विकास तसेच संकटात सापडलेल्या शेतक-यांना संकटमुक्त करणे, तरुणांना रोजगाराची उत्तम संधी देणे, गुंतवणुकीसाठी व उद्योगाला प्रोत्साहन देणे अशा विविध मुद्यांना माननीय राज्यपाल महोदयांनी स्पर्श केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

मला येथे विशेष उल्लेख केला पाहिजे की, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. गत वर्षाचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, या देशातील विशेषत: महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे जनक आणि या सदनाचे 18 वर्षे सभापती असलेले स्वातंत्र्यसेनानी स्व.वि.स.पागे यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष गेल्या वर्षी साजरे केले. हे दोन्ही महान नेते महाराष्ट्राचे सुपुत्र होते. या देशाला, राज्याला नवीन दिशा देणारे हे दोन्ही महान नेते होते म्हणूनच स्व.वि.स.पागे यांच्या रोजगार हमी योजनेचे मुक्त कंठाने स्वागत,अभिनंदन व गौरव या देशाच्या माजी पंतप्रधान स्व.इंदिराजी गांधी यांनी जाहीरपणे केला आणि रोजगार हमी योजना देशामध्ये लागू केली पाहिजे अशी इच्छा त्यावेळी प्रकर्षाने व्यक्त केली. ती आज साकार झाली आहे. आज आपण पाहतो की, महात्मा गांधी यांच्या नावाने ग्रामीण रोजगार हमी योजना देशभर राबविण्यात येत आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांचा कल सत्तेच्या विकेंद्रीकरणाकडे होता. लोकशाही अधिक प्रगल्भ व निकोप होण्यासाठी, ग्रामीण भागातील शेवटच्या माणासापर्यंत योजना पोहचावी याकडे त्यांचा कल होता. त्यामुळेच राष्ट्रपिता म.गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पना साकार करण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचा प्रयोग देशामध्ये अत्यंत यशस्वीपणे राबविणारे आणि पंचायती राज्याचा खऱ्या अर्थाने चांगला आराखडा तयार करणारे स्व.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी आपण साजरी करीत आहोत.

माननीय राज्यपालांचे अभिनंदन करीत असताना मला जाणीवपूर्वक उल्लेख केला पाहिजे की, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये सुरूवातीलाच स्व.यशवतंराव चव्हाणांचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

स्व.यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असलेली पंचायत राज्याची संकल्पना, उद्योग विकासाची कल्पना, कृषी औद्योगिक क्रांतीची कल्पना, ग्रामीण भागातील सहकार, सहकारी कृषी संस्था, साहित्य, कला, संस्कृती, या सर्वांचा आढावा स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने घेणे आवश्यक आहे. आगामी महाराष्ट्रात त्या ध्येय धोरणाने नवीन संकल्पना आपण राबविल्या पाहिजेत, असा आशावाद त्यांनी आपल्या भाषणामध्ये सुरूवातीलाच व्यक्त केला आहे. त्यांनी स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांचा अत्यंत गौरवपूर्व उल्लेख केलेला आहे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

माननीय राज्यपाल महोदयांनी पहिलाच मुद्दा असा मांडला आहे की, सन 2012 हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग, आणि विशेषत: सहकार हा अत्यंत अडचणीत आलेला आहे. जागतिक रेट्यामध्ये, खाजगी उद्योजकांच्या स्पर्धेमध्ये सहकार टिकणे हे मोठे अवघड झालेले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकाराची जपणूक करण्याकरिता, सहकारी संस्था अधिक प्रगल्भ होण्याकरिता अनेक पावले उचलली आहेत. उदा.कापड आणि कापूस सूत गिरण्या अडचणीत आलेल्या असताना केंद्र सरकारच्या मदतीने जवळ जवळ 160 कोटी रूपये अनुदानाच्या रूपात मदत देऊन त्या गिरण्या पुनरूज्जीवित करण्यासाठी किंवा त्या सबल करण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय वर्षाच्या निमित्ताने केलेला आहे. महाराष्ट्रातील सहकार अधिक चांगला, निकोप व प्रगतिशील व्हावा म्हणून स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील यांच्यासह स्व.वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात कृषी औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ अतिशय उत्तम प्रकारे रोवली आहे म्हणूनच स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने विविध सहकारी संस्थांमध्ये उत्तम काम करणारी, निष्ठेने, प्रामाणिकपणे काम करणारी जी जी मंडळी आहेत.....

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना त्यांच्या नावाने पुरस्कार देण्याचा निर्णय या राज्य शासनाने घेतलेला आहे आणि त्यानुसार सहकाराच्या चळवळीमध्ये विविध स्तरावरील व्यक्तींना सहकार महर्षी आणि सहकार निष्ठ आणि सहकार भूषण अशा प्रकारचे तीन पुरस्कार स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावाने देण्याच्या बाबत शासनाने निर्णय घेतल्याबद्दल आणि त्याचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये देखील उल्लेख इ ालेला आहे, त्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करतो. जेणेकरुन या प्रोत्साहनामुळे अडचणीमध्ये आलेला सहकार ज्याच्यावर खरे म्हणजे महाराष्ट्राची कृषी आणि औद्योगिक क्रांती अवलंबून आहे, तो अधिक सबल, निकोप होईल असा आशावाद या भाषणाच्या निमित्ताने मला व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, दुसरी अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे याठिकाणी दारिद्र्य निर्मूलन आणि दलितांसाठी अधिक सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने तसेच गरीब विद्यार्थ्यांना विशेषत: दलित विद्यार्थ्यांना परदेशामध्ये शिक्षण घेण्यासाठी योजना सुरु झालेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या काळामध्ये दलितांना, आदिवासींना सवलती दिल्या, जे गरीब किंवा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय लोक होते, त्यांना सवलती देण्यासाठी 1200 रुपये उत्पन्नाची मर्यादा सुरु केली, नंतर ती 2400 त्यानंतर 4800 असे करीत-करीत काळानुरुप ती मर्यादा बदलत गेली. खरे म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची सोय या शासनाच्या वतीने उपलब्ध करुन देणारे, दलितोध्दाराचा वसा घेतलेले स्व.यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची आठवण ठेऊन दलित विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना शासनाने सुरु केली आणि गेल्या तीन-चार वर्षामध्ये 172 दलित विद्यार्थी परदेशामध्ये राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून उत्तम प्रकारे शिक्षण घेत आहेत. म्हणून त्या दृष्टीकोनातून गरीब, उपेक्षित, शोषित वर्गाला शिक्षणाची संधी देण्याची बाब परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती,त्यानुसार संधी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सभापती महोदय,अशाच प्रकारच्या अनेक विविध योजना आहेत म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता या राज्यामध्ये 10 नवीन वसतीगृहे निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.एवढेच नव्हेतर विशेषत: मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरता जी वसतीगृहे आहेत आणि त्या प्रत्येक वसतीगृहामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीमागे त्यांच्या आहारासाठी किंवा त्यांच्या दैनंदिन भत्त्यासाठी जो निधी दिलेला होता किंवा मासिक पैसे दिलेले होते, त्यामध्ये शासनाने .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सातत्याने वाढ केलेली आहे.तसेच मला एक गोष्ट आठवते की, मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. त्यावेळी श्री.जयदेव गायकवाड हे दलित पँथरमध्ये काम करीत होते. या सगळया मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचा मासिक भत्ता वाढावा म्हणून प्रयत्न केला आणि आम्ही देखील त्या आंदोलनामध्ये उतरलो होतो. आज आपल्या देशाच्या महामहिम राष्ट्रपती आदरणीय श्रीमती प्रतिभाताई पाटील या त्यावेळी महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण मंत्री होत्या आणि त्यांनी या भत्त्यामध्ये भरीव वाढ केली होती. परंतु आज त्यामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे.आपल्याला आश्चर्य वाटेल की, आज आपण ग्रामीण भागामध्ये ही वाढ 50 रुपयावरुन 500 रुपयापर्यंत नेलेली आहे.तसेच 200 रुपयांची वाढ 600 रुपयापर्यंत नेलेली आहे याचा अर्थ असा आहे की,ग्रामीण भागातील मागासवर्गीय आहेत,त्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचावी याचाही उल्लेख माननीय महामहिम राज्यपाल यांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, हे सांगत असताना मी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करतो की, महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणाच्या निमित्ताने अनेक योजना मांडलेल्या आहेत आणि त्याबाबतीत आम्ही राज्य शासनाला एक विनंती देखील केलेली आहे आणि याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करीत असताना मी येथे या विनंतीचा पुनरुच्चार करतो की, भारताच्या घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राज्य शासनाच्या खर्चाने कोलंबिया विद्यापीठामध्ये एक अध्यासन सुरु करण्यात यावे अशी आम्ही मागणी केली. त्यानुसार आपल्या शासनाचे धोरण जाहीर झाले आणि केंद्र शासनाने देखील दुसऱ्याच दिवशी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कोलंबिया विद्यापीठामध्ये अध्यासन जाहीर केले, त्याबद्दल केंद्र शासनाचे देखील अभिनंदन केले पाहिजे. हा योगायोगाचा प्रश्न आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, सर्वांच्या अगोदर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितोद्धाराची चळवळ ही अत्यंत प्रखरपणे लढविलेली आहे. एवढेच नव्हेतर 1917 सालामध्ये त्यावेळी झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनामध्ये श्रीमती ॲनी बेझंट या अध्यक्ष असताना, त्याठिकाणी जाऊन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी तेथे प्रस्ताव मांडला आणि दलितांच्या उद्धाराकरता, विद्यार्थ्यांकरता व त्यांच्या संपूर्ण हक्कासाठी हे राज्य कटीबध्द आहे असा प्रस्ताव झाला पाहिजे, तसा निर्णय झाला पाहिजे आणि स्वतंत्र भारतामध्ये तशा प्रकारचा न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी केली.आम्ही त्या सांस्कृतिक धोरणामध्ये आणखी एक मागणी केलेली आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

महर्षी अण्णासाहेब शिंदे म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावाने राज्य शासनाच्या वतीने आपण कोलंबिया विद्यापीठामध्ये एक अध्यासन सुरु करावे आणि तशी मी शासनाला भाषणाच्या माध्यमातून विनंती करतो.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषणाबद्दल अभिनंदन करतो कारण त्यामध्ये अनेक गोष्टींचा उल्लेख झालेला आहे. त्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींकरिता 10 वसतिगृहे शासन बांधणार आहे. दलित विद्यार्थ्यांकरिता अधिक सोयी उपलब्ध करणार आहे. एवढेच नव्हे तर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी काही योजना आखलेल्या आहेत. मौलाना आझाद महामंडळास आणखी आर्थिक निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे त्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये झालेला आहे. अल्पसंख्याकाकरिता आयोग नेमलेला आहे. या आयोगाला दिवाणी न्यायालयाचा अधिकार देण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे अल्पसंख्याकाच्या मनातील भीतीची भावना नष्ट होण्यास मदत होणार आहे. तो समाज मुख्य प्रवाहात एकरुप होण्याच्या दृष्टीने या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते

सभापती महोदय, स्थानिक लोकांसह शासनाचे प्रतिनिधी आणि दक्षता समितीचे सदस्य यांच्या उपस्थितीत रास्त भावाची दुकाने किंवा चावडी या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील पात्र शिधापत्रिका लाभार्थ्यांना एकाच वेळी तीन महिन्यांचे अन्नधान्य देण्याचे शासनाने ठरविले आहे असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. याचा अर्थ असा की, सातत्याने उपेक्षित असलेल्या गरीब माणसाला, उपेक्षित माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न या अभिभाषणाच्या माध्यमातून झालेला आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेकविध उपक्रम जाहीर केलेले आहेत ज्यामध्ये जवळपास 23 लाख पेक्षा अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सातत्याने सांगितले जाते की,महाराष्ट्र औद्योगिक विकासामध्ये आणि गुंतवणुकीमध्ये खूप मागे पडलेला आहे. शेजारची राज्ये आपल्यापुढे गेलेली आहेत. परंतु मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, गेल्या दहा वर्षात गुंतवणुकीमध्ये आणि उद्योग विकासामध्ये महाराष्ट्र एक क्रमांकावर राहिलेला आहे आणि हे मी सांगत नसून केंद्र शासनाच्या अहवालामध्ये तसा उल्लेख आहे. याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये गौरवपूर्ण केलेला आहे. गुंतवणुकीसाठी अधिकाधिक योजना आखणे, त्यांच्यासाठी अधिकाधिक कक्ष उभारणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

त्यांना लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर पुरविणे अशा अनेक योजना आखलेल्या आहेत. तेव्हा महाराष्ट्र गुंतवणुकीमध्ये मागे पडला हा आरोप करीत असताना त्यांना नेमके भान राहिलेले नाही किंवा चुकीच्या माहितीच्या आधारे ते उल्लेख करीत आहेत असे मला वाटते. उद्योग आणि गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. त्याशिवाय ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न, दलितांचे प्रश्न, मुलींचे प्रश्न,अल्पसंख्यकाच्या प्रश्नांबाबत तसेच ग्राम स्वराज्य, पंचायत राज, उद्योग, रोजगार यासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सूतोवाच केलेले आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्राचा अर्थसंकल्प देखील तुम्हा आम्हाला पहायला मिळेल अशा प्रकारचा आशावाद मी या ठिकाणी व्यक्त करतो. सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या आभार प्रदर्शनास अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी हा ठराव मांडलेला आहे. हा अतिशय महत्वाचा दस्तावेज आहे. त्याला ऐतिहासिक महत्व आहे. या सर्व अभिभाषणात माननीय राज्यपाल "माझ्या सरकारने" "माझ्या शासनाने" अशा स्वरुपाचा उल्लेख करतात. एकूणच राज्यपाल म्हणून या राज्याची जी जबाबदारी शासनावर, शासनकर्त्यांवर दिलेली आहे, त्याबद्दलचे एक अतिशय चांगले मार्गदर्शन या निमित्ताने आपल्यासमोर ठेवले जाते.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले. . .

पुढील वर्षाच्या एकूण योजनांचा आढावा घेऊन मागच्या वर्षात काय केले याचा लेखाजोखासुध्दा या अभिभाषणात दिला जातो म्हणून माननीय राज्यपालांचे हे भाषण आपल्या संसदीय परंपरेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे असे मी मानतो.

सभापती महोदय, मी सहज म्हणून माननीय राज्यपालांच्या भाषणांचा मागोवा घेण्याच्या दृष्टिकोनातून वेगवेगळया दशकामध्ये झालेल्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील उतारे पाहण्याचा प्रयत्न केला त्यावेळी माझ्या हाती महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरच्या पहिल्या राज्यपाल महोदयांचे श्री. श्रीप्रकाश यांनी केलेले दिनांक 06 जुलै, 1960 रोजीचे भाषण सापडले. या भाषणाचा मी मुद्दाम अशासाठी उल्लेख करतो की, त्यावेळी 1960 साली श्री. श्रीप्रकाश यांच्या काळात याला फक्त भाषण असे म्हणत होते ते आज अभिभाषण का झालेले आहे याचा मराठी भाषा विभागाने विचार करावा मी त्या बद्दल बोलणार नाही. परंतु गेल्या वर्षीचे अभिभाषण आणि या वर्षाचे अभिभाषण पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा अभिभाषणाच्या शेवटच्या मुद्यामध्ये असतो. तो शेवटी का येतो? या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांची तर अशी समजूत झालेली आहे की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख झाला की, हेड फोन काढून ठेवावयाचे आणि आता माननीय राज्यपाल यांचे भाषण संपणार अशा पध्दतीचे एक वातावरण तयार होते. माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषाणात महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख जरी शेवटच्या मुद्यात करण्यात आला असला तरी शासन या विषयाकडे अग्रक्रमाने लक्ष देईल अशी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, त्यावेळच्या राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्येही सीमा प्रश्नाचा उल्लेख होता. त्यावेळी राज्यपाल महोदयांनी असे म्हटले होते की,"महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांच्या (म्हणजे त्यावेळी म्हैसूर राज्य होते.) मुख्यमंत्र्यांनी परस्पर संमतीने महाराष्ट्र-म्हैसूर सीमा प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी व तदनंतर त्याबाबतीतील मतऐक्याच्या व मतभेदाच्या मुद्यांबद्दल आपला अभिप्राय सरकारांना सादर करण्यासाठी चार सदस्यांची एक समिती नेमण्याचा जो निर्णय नुकताच घेतला आहे त्याकडे मी सन्माननीय सदस्यांचे लक्ष वेधू इच्छितो. ज्याबाबत कोंडी निर्माण झाली आहे असा हा दीर्घकालीन वादग्रस्त प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने हे एक खरोखरच प्रगतीपर पाऊल आहे. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले. . .

दोन राज्यांमध्ये सींमा संबंधीचा वाद अस्तित्वात आहे हे म्हैसूर सरकारने प्रथमत:च मान्य केले आहे असा याचा अर्थ आहे." इतका जुना इतिहास असलेल्या या प्रश्नाचा प्राधान्यक्रम थोडा बदलला तर या निमित्ताने सभागृहाच्या भावना शासनाकडे पोहोचतील.

सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी या ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे हे वर्ष कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दीचे वर्ष साजरे करण्यात येत आहे. अतिशय सुसंस्कृत असे नेतृत्व या राज्याला लाभलेले आहे. ज्या राज्याचे नावच मुळात 'महाराष्ट्र' असे आहे या महानतेला समर्थपणे दिशा देण्याचे काम ज्या शिल्पकाराने केलेले आहे त्या कै. यशवंतराव चव्हाणांसंबंधी चर्चासत्रे, व्याख्यानमाला, प्रदर्शने असे उपक्रम वर्षभर चालणार आहेत ही खरोखरच अभिमानास्पद गोष्ट आहे. पण यापेक्षासुध्दा या वर्षभरात काही तरी शाश्वत योजना हाती घेता आली तर त्याचा अधिक चांगला उपयोग आपल्याला करुन घेता येईल.

सभापती महोदय, या राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू केल्यानंतर या वर्षी प्रथमच झालेल्या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त महिला उमेदवांराना निवडणुकीत सहभागी होण्याची व निवडून येण्याची प्रत्यक्ष संधी मिळाली. मला वाटते त्या दृष्टीनेसुध्दा महिलांच्या संदर्भातील मुद्दा अतिशय महत्वाचा आहे आणि त्याचा जरुर उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे म्हणून तो उल्लेख अभिनंदनास शंभर टक्के पात्र आहे. त्याचबरोबर एक छोटा मुद्दा देखील अधिक महत्वाचा आहे. या राज्यात महिलांवरील वाढत चाललेल्या हिंसाचार व अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी या राज्याच्या गृह खात्याने अतिशय सतर्क होण्याची सूचना राज्यपाल महोदयांच्या भाषणात करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

सभापती महोदय, संकटात सापडलेल्या महिलांकरिता विशेष हेल्पलाईन क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधण्याची सुविधा आता संपूर्ण राज्यात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्याबद्दल खरोखर शासनाचे मनापासून आभारच मानले पाहिजेत. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने यशवंत पंचायती राज अभियान सुरु झालेले आहे. खरे म्हणजे जिल्हा परिषदा आणि या सर्व संस्थांच्या स्थापनेमागे स्व. यशवंतराव चव्हाण यांचे मार्गदर्शन किंवा त्यांचा जो विचार आहे तो अतिशय महत्वाचा आहे. आता अशी गोष्ट कानावर यावयास लागली आहे की, केंद्र सरकार या जिल्हा परिषदांच्या बाबतीत कोठे तरी वेगळी भूमिका घेऊ इच्छिते. मला असे वाटते की, त्या बाबतीत आपल्या राज्यातील राज्यकर्त्यांनी अधिक सतर्क राहून या संस्था अधिक बळकट कशा होतील या दृष्टीने या भाषणामध्ये जे संकेत दिलेले आहेत ती बाब अतिशय अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, आज पर्यावरण हा राज्यापुढील सगळ्यात भीषण प्रश्न आहे. वाढत्या शहरीकरणामुळे होणारे पर्यावरणाचे सगळे परिणाम आणि एकूणच आपला जीवनस्तर पाहता हे परिणाम आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक पातळीपर्यंत जाण्याची वाढली असलेली शक्यता अशा सगळ्या दृष्टीने विचार केला तर शासनाची पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना हे या भाषणाचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. त्यासाठी 'पर्यावरण विकास रत्न' या पुरस्काराची केलेली तरतूद आणि आतापर्यंत शासनाने जो 389 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे ही सुध्दा अतिशय समाधान देणारी गोष्ट आहे. राज्यातील प्रामुख्याने गडचिरोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सोलापूर, ठाणे, वर्धा आणि यवतमाळ या 9 जिल्ह्यांमध्ये मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी केलेली विशेष तरतूद ही सुध्दा महत्वाची बाब या भाषणामध्ये दिसून येते.

सभापती महोदय, निर्मल ग्राम पुरस्कार पटकावण्यात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. आणखी 442 ग्रामपंचायतींना हा पुरस्कार मिळालेला आहे. ही निर्मल ग्राम योजना अधिकाधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्नशील राहील. उद्योगधंदे आणि इतर अनेक क्षेत्रात जसा महाराष्ट्र अग्रेसर आहे तसा या क्षेत्रात सुध्दा तो अग्रेसरच राहील ही मोठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

जबाबदारी या निमित्ताने शासनावर आलेली आहे. प्रतिकूल हवामानामुळे द्राक्ष, केळी, संत्री, मोसंबी, डाळीब, आंबा, काजू या पिकांसाठी हवामानावर आधारित पीक विमा योजना ही या राज्याच्या विविध क्षेत्रात ही पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार मोठा दिलासा देणारी बाब या भाषणामधून आपल्याला पहावयास मिळते.

सभापती महोदय, राज्य सरकारच्या एक अतिशय महत्वाच्या कामगिरीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये आलेला आहे. भारत सरकारने अन्नधान्याच्या उत्पादनात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या राज्यांना 2010-2011 या वर्षापासून कृषी कर्मण पुरस्कार देण्याचे घोषित केले आहे. 2010-2011 या वर्षात महाराष्ट्राने देशात कडधान्याचे विक्रमी उत्पादन घेतले आहे म्हणून कडधान्य उत्पादनातील उत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्राला प्रथम क्रमांकाचा कृषी कर्मण पुरस्कार देण्यात आलेला आहे. या राज्यातील आणखी एका महत्वाच्या प्रश्नाची दखल माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये आपल्याला आढळून येते. राज्यातील सगळ्या योजनांची सांगड घालून 2012 ते 2014 या वर्षाच्या कालावधीत 100 कोटी वृक्ष लागवड करण्याचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे वनक्षेत्रात 19 टक्क्यावरुन 33 टक्क्यापर्यंत वाढ अपेक्षित आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी इतकी मोठी योजना राज्याच्या दृष्टीने फार महत्वाची आहे.

सभापती महोदय, राज्य नदी संवर्धन योजना ही सुध्दा चांगली योजना आहे आणि त्यादृष्टीने शासन किती चांगल्या प्रकारे हे करु शकेल यासाठीचे मार्गदर्शन या अभिभाषणामध्ये आपल्याला मिळते. आरोग्य सुविधांच्या बाबतीत अधिकाधिक सामान्य माणसांपर्यंत पोहोचणारी अतिशय योग्य पध्दतीची आरोग्याची योजना म्हणजे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना या निमित्ताने सुरु झालेली आहे. या योजनेचे अपेक्षित परिणाम निश्चितपणे पुढच्या काळामध्ये दिसून येतील. हा भाग सुध्दा मला अतिशय महत्वाचा वाटतो. अलीकडे आमच्या नाशिक जिल्ह्यातील भगर या एका उत्पादनाबद्दल फारच ऊहापोह झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

या भगरीवर सर्व प्रक्रिया करावी लागते. अन्न सुरक्षा प्रभावी मानके सत्वर अन्न चाचणी याची निश्चिती करण्यासाठी राज्यात 5 नवीन अन्न चाचणी प्रयोगशाळा उभारण्यात येत आहेत. ही चांगली योजना आहे असे मला वाटते. त्याचे चांगले परिणाम पुढील काळामध्ये पहावयास मिळतील.

सभापती महोदय, शासन सर्व क्षेत्रात काम करीत आहे. मग ते शिक्षण असेल, आरोग्य असेल, रस्ते बांधणी असेल, हॉस्पिटल्स उभारणी असेल या बरोबरीनेच कला शिक्षणाला चालना देण्यासाठी शासनाने अमरावती, नाशिक व पुणे येथे 3 शासकीय कला केंद्र सुरु करण्याचे ठरविले आहे, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. सभापती महोदय, अनेक विषय आहेत, परंतु वेळेअभावी त्या सगळया विषयांचा मी परामर्श घेत नाही. परंतु एक वचन मला आठवते, राम गणेश गडकरी यांच्या एका नाटकात "संकल्प आणि सिध्दी यामध्ये परमेश्वराची इच्छा असत" असे म्हटलेले आहे. पण परमेश्वरापेक्षा राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर हा संकल्प निश्चितपणे सिध्दीला जाईल असे मला वाटते. म्हणून मी सभागृहाच्या वतीने मी राज्यपालांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि त्यांचे अभिनंदनही करतो. सभापती महोदय, मी आपलेही आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या प्रथेप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादांचेही अभिनंदन करणारा हा प्रस्ताव आहे. त्यांच्यासारख्या संवेदनशील राजकीय कार्यकर्त्याला हे काम करण्यासाठी का सांगितले जाते ? उद्या लोक असे म्हणतील की, त्यांनी व्हिसलिंग वूडस् या प्रकरणी हायकोर्टाने शासनावर ताशेरे ओढले त्याबाबत त्यांनी शासनाचे अभिनंदन केले, श्री.कृपाशंकरसिंह यांनी ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक जमा केलेल्या मालमत्तेसंबंधी हायकोर्टाने जे म्हटले त्याबाबत अभिनंदन केले, हिरानंदानी यांच्याविरुध्द हायकोर्टाने जे म्हटले, राज्य सहकारी बँकेबाबत हायकोर्टाने शासनाविरुध्द ताशेरे ओढले त्याबाबत अभिनंदन केले आहे. शिर्डी संस्थांविषयी हायकोर्टाने जे आदेश दिले त्याबाबत अभिनंदन केले. समाजकल्याण खात्याच्या सचिवांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अडवून ठेवली होती त्याबाबत अभिनंदन केले.

राज्यपालांनी प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंबंधी उल्लेख केलेला आहे. राज्यपाल महोदय, हे राज्याचे प्रमुख आहेत. त्यामुळे त्यांच्या विषयी कोणाच्या मनात अनादर असूच शकत नाही. परंतु मला खेद करावासा वाटतो. त्यांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाच्या प्रस्तावावर बोलत असताना कोणत्या गोष्टीबाबत अभिनंदन केले पाहिजे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. एक राजकीय नेता ज्ञात उत्पन्नापेक्षा भरमसाठ पैसा कमवितो त्याबाबत अभिनंदन करावे की, ठाकूर नावाचे एक अधिकारी भरमसाठ पैसा कमवितात त्याबाबत अभिनंदन करावे, कशाच्या आधारे कशाचे अभिनंदन करावयाचे ? सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार आणि सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले या सज्जन माणसांवर राज्यपालांचे अभिनंदन करण्याची जबाबदारी सोपविली जाते. त्यांनी तरी किमान हे काम करु नये.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचा उल्लेख केला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकाराचे सर्वदूर असे कर्तृत्व सर्वांनीच मान्य केलेले आहे. त्यांना चांद्यापासून बांद्यापर्यंत म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाची दृष्टी होती. त्यानंतर कै.वसंतराव नाईक असतील, कै.वसंतदादा पाटील असतील,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे....

माननीय श्री.शरदराव पवार असे अनेक नेते महाराष्ट्रात झाले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतील, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे असतील असे सर्वदूर नेतृत्व समोर आले त्या त्यावेळी महाराष्ट्र राज्य विकासाची पावले टाकू लागले. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात विचार केला तर या राज्यात ज्याला महाराष्ट्राच्या विकासाची दृष्टी आहे असा एकही नेता दिसत नाही. असे दुर्दैवाने म्हणावे लागते. राज्यात अनेक लोक आहेत, उदाहरणच द्यावयाचे झाल्यास ठाणे जिल्ह्यात श्री.गणेश नाईक यांची सुभेदारी आहे, नवी मुंबईत श्री.सुनील तटकरे यांची सुभेदारी आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात श्री.नारायण राणे यांचे सुभेदारी आहे, नाशिकमध्ये श्री.छगन भुजबळ यांची सुभेदारी आहे, पश्चिम महाराष्ट्रात श्री.अजितदादा पवार यांची सुभेदारी असेल, कोठे देशमुखांची असेल. परंतु संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी एक नेतृत्व पहावयास मिळत नाही.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना महाराष्ट्राचे नेतृत्व करण्यासाठी दिल्लीहून पाठविण्यात आले. महाराष्ट्राला हे एक नेतृत्व मिळेल असे वाटले होते. महाराष्ट्रातील कोणीही नेता दिल्लीला गेला की तो कधी शुक्रवार उजाडतोय आणि महाराष्ट्र गाठतोय हे पहात असतो. आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत असे होते की, शुक्रवार उजाडला की ते दिल्ली गाठतात. आता मुख्यमंत्री पद स्वीकारुन वर्ष-दीड वर्ष झाले आहे. अजून त्यांनी रेसकोर्सवरचा बंगला सोडलेला नाही. जो पर्यन्त दोर कापले जात नाहीत तो पर्यन्त कोंडाणा सर करता येत नाही हा इतिहास आहे. मी या निमित्ताने हे सांगू इच्छितो की, "मुंबई की लोकल ट्रेन में बहुत भीड़ होती है और 3 व्यक्तियों की सीट पर 4 व्यक्ति बैठते हैं. अगर उनमें से कोई व्यक्ति सामान उठाने के लिए अपनी सीट से उठता है तो वहां पर दूसरा व्यक्ति बैठ जाता है". ही परिस्थिती माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना सांगितली पाहिजे. त्यांच्या बाजूला मंत्री महोदय श्री. नारायण राणे आहेत, डॉ. पतंगराव कदम आहेत, श्री. हर्षवर्धन पाटील आहेत. माननीय मुख्यमंत्री जर कुठे इकडे तिकडे गेले तर त्यांच्या जागेवर कोणी पटकन बसेल हे त्यांना कळणार नाही. राज्याचा गाडा हाकायचा असेल तर त्यावर मजबूत मांड ठोकून बसले पाहिजे. अशा प्रकारचे नेतृत्व राज्याला मिळाले पाहिजे. आज गावोगावी सुभेदारी निर्माण झालेली आहे. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना नाशिकच्या बाबतीत काही निर्णय करावयाचा असेल तर तो ते माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांना विचारल्या शिवाय करु शकत नाहीत हे वास्तव आहे. आपल्या राज्यात सुभेदारी निर्माण झालेली आहे. यामुळे आपल्या राज्याचा विकास होत नाही.

सभापती महोदय, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधी पक्षाला चहापान देण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. त्या कार्यक्रमाच्या वेळी मी सांगितले की, टाटा समूहाचे उद्योजक श्री. रतन टाटा यांनी श्री. सायरस मिस्त्री यांना त्यांचे वारसदार नेमून त्यांना ते दिल्लीला घेऊन गेले आणि माननीय पंतप्रधानांना भेटले. त्यानंतर ते गुजराथचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांना भेटले. आता मंत्रालयापासून बॉम्बे हाऊस तसे हाकेच्या अंतरावर असताना श्री. रतन टाटा हे महाराष्ट्र राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले नाहीत. याचे कारण आपण आपली पत गमावलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आहे. श्री. सायरस मिस्त्री जे पुढील 20-25 वर्षे टाटा उद्योगसमूह चालविणार आहेत त्यांना महाराष्ट्र राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटवावे असे श्री. रतन टाटा यांना का वाटले नाही याचे राज्याच्या प्रमुखानी आत्मचिंतन करण्याची खरी गरज आहे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर बोलते हुए माननीय विरोधी पक्ष नेता को महाराष्ट्र सरकार की नीतियों, व्यवस्था और एडमिनिस्ट्रेशन के बारे में बोलने का पूरा अधिकार है. उनको माननीय मुख्यमंत्री और माननीय उप मुख्यमंत्री के ऊपर टीका करने का भी अधिकार है. लेकिन उनका यह कहना कि रतन टाटा माननीय प्रधानमंत्री और गुजरात के माननीय मुख्यमंत्री से तो मिलने गए, लेकिन महाराष्ट्र के माननीय मुख्यमंत्री और माननीय उप मुख्यमंत्री से नहीं मिले, मुझे लगता है कि यह व्यक्तिगत आक्षेप है और उनको व्यक्तिगत स्तर तक नहीं जाना चाहिए. बाद में वे उनसे कहीं मिले भी होंगे. लेकिन इस प्रकार से परसनल केपेसिटी में किसी की क्षमता के ऊपर शंका करना उचित नहीं है.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. जमा यांना मराठी कळते..

....नंतर श्री. गिते....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सन्माननीय सदस्य श्री.जमा यांना सांगू इच्छितो की, टाटा हा असा उद्योग समूह आहे की, ज्याचा उल्लेख माननीय पंतप्रधान यांनी अनेक वेळा केलेला आहे. प्री बजेटरी मिटींगला केवळ वित्त मंत्र्यांबरोबरच नव्हे तर माननीय पंतप्रधान हे वन-टू-वन चर्चा रतन टाटा समुहाबरोबर करतात. त्यांचा व्यवहार हा आपल्या दृष्टीने एक आरसा असतो. यात कोणाला झोंबण्याचे कारण नाही. मी एक सांगू इच्छितो की, ते माननीय नरेंद्र मोदी यांना भेटावयास गेले तर त्याचा आम्हाला आनंद होत नाही. सांगली, मिरज येथील एम.आय.डी.सी.मधील उद्योजक कर्नाटकात भेटायला जातात, त्याचा आम्हाला आनंद होत नाही, आम्हाला त्याचे दु:ख होते. कर्नाटक राज्यात भाजपचे सरकार सत्तेवर असेल. परंतु पर राज्यात उद्योजकांना ज्या सोयी-सुविधा दिल्या जातात, त्या आपण का देऊ शकत नाही ? मी टाटा समुहाचे उदाहरण एक आरसा म्हणून या ठिकाणी दिले आहे. राज्याचा सर्वंकष विचार करण्याचे नेतृत्व या राज्यास जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यास खऱ्या अर्थाने आपण योग्य आहोत की नाही याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मानव विकास निर्देशांकाचा उल्लेख केला आहे. प्रत्येक जिल्हयाचा मानव विकास निर्देशांकाचा विकास अहवाल 2002 मध्ये प्रकाशित केला होता. दुसऱ्यांच्या हातात वारंवार कोलीत देणे फारच भानगडीचे आहे असे सदर अहवाल पाहिल्यानंतर शासनाच्या लक्षात आले. त्यानंतर आपण मानव विकास निर्देशांकाचा अहवाल काढला नाही. मानव विकास निर्देशांक योग्य असेल तर या राज्याचा सर्वार्थाने विकास बऱ्यापैकी चालला आहे असे आपण समजतो. पण नंतर मानव विकास निर्देशांक अहवाल काढला नाही. त्यानंतर आपण 2006 मध्ये मानव विकास मिशनची घोषणा केली. ही घोषणा करीत असताना आपण 12 मागासलेल्या जिल्हयातील 25 तालुक्यांची निवड केली व त्यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केली. या बाबतीत 500 कोटी रुपयांची तरतूद झाल्याबरोबरच विकसित जिल्हयाच्या लोकांनी त्या तरतुदीवर झडप घातली आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील 172 तालुक्यांचा त्यात समावेश केला गेला. या 25 तालुक्यांचा मानव विकास मिशन नीटपणे यशस्वी करु शकला नाहीत याची सर्वांना कल्पना आहे. आता 172 तालुक्यात मानव विकास मिशन राबवावयास निघाला आहात. आज मानव विकास मिशनची अवस्था काय आहे, याचा उहापोह झाला तर आपले राज्य खरोखर विकासाच्या दिशेने

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

जात आहे की अधोगतीकडे जात आहे याची माहिती मिळू शकेल. शासनाने याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केला आहे की, उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र क्रमांक एक वर आहे. मुंबईच्या सगळया वृत्तपत्रात वेगवेगळया हेडलाईन्स होत्या. परंतु प्रहार वृत्तपत्राच्या हेडलाईनमध्ये उद्योगाच्या बाबतीत "उद्योग नं.1" असे छापून आले. जसे कुली नं-1 तसेच उद्योग नं.1 अशा प्रकारची हेडलाईन प्रहार या वृत्तपत्रात छापून आलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला एक वास्तव सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात घोषणा केली की, महाराष्ट्राचा निर्यातीचा वाटा भारताच्या एकूण निर्यातीच्या 25 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. परंतु गेल्या दोन, तीन वर्षामध्ये महाराष्ट्राचा निर्यातीचा विकास दर काय आहे? यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक यांनी त्यांच्या काळात काय पुण्य केले आहे, त्याबाबतची माहिती न सांगता या सरकारने आतापर्यंत काय केले, पुढे काय करणार आहे, याची माहिती सभागृहासमोर ठेवली पाहिजे. महाराष्ट्राचा विकास दर 24.1 टक्के, गुजरात 59 टक्के, तामिळनाडू 45 टक्के, कर्नाटक 49 टक्के, आंध्रप्रदेश 46 टक्के, उत्तरप्रदेश 48 टक्के हा निर्यातीचा विकास दर आहे. महाराष्ट्राचा विकास दर 24 टक्के एवढाच असताना महाराष्ट्र क्रमांक 1 वर कसा काय आहे याचा आपण सर्वांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, परकीय गुंतवणुकीपैकी एक तृतीयांश इतक्या थेट गुंतवणुकीत महाराष्ट्राने पहिले स्थान राखले आहे असाही अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात केंद्राचा अहवाल आपण पहावा. महाराष्ट्र बरोबर दीव, दमण, सिल्वासा यांची जोडून आकडेवारी दिलेली असते. माननीय राज्यपालांचे अभिभाषण कोणत्याअधिकाऱ्यांने तयार केले याची मला माहिती नाही. दमण, दिव, सिल्वासा येथील गुंतवणूक किती आहे याची खरी आकडेवारी जाहीर करावी. यासंबंधी आपल्याकडे आकडेवारी उपलब्ध नसेल तर ती माझ्याकडे उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील गुंतवणूक किती आहे आणि दीव,दमण,सिल्वासा येथील गुंतवणूक किती आहे याची खरी माहिती आपण प्राप्त करुन घ्यावी. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात या बाबतचा जो उल्लेख केलेला आहे तो खरा आहे काय? ही आकडेवारी पाहिल्यानंतर महाराष्ट्र क्रमांक एक वर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आहे असे म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? या गोष्टीचा देखील गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, समतोल प्रादेशिक विकास साधण्यावर अधिक लक्ष केंद्रित करुन एकूण विशाल प्रकल्पांपैकी 63 टक्के प्रकल्प मागास भागात राबविण्यात येत आहेत असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले् आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते... 14:30

श्री.विनोद तावडे.....

सरकारने नमूद केलेल्या 2.63 लाख कोटींपैकी अमरावती, औरंगाबाद, नागपूर आणि कोकण या भागात 1.13 लाख कोटी गुंतवणूक असणाऱ्या उद्योगांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली. याचा अर्थ राज्यातील एकूण मंजूर प्रकल्पाच्या 6.43 टक्के प्रकल्पांची अंमलबजावणी मागास भागात सुरु झाली. घोषणा मात्र 63 टक्क्याची केली आहे. ही उद्योग खात्याची आकडेवारी आहे. निश्चित आकडेवारी काय आहे हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे. कोणकोणते मेगा प्रोजेक्ट अमरावती, औरंगाबाद, नागपूर आणि कोकण विभागात सुरु झाले हे सभागृहाला कळले पाहिजे. माननीय राज्यपालांच्या तोंडी ही आकडेवारी कशासाठी?

सभापती महोदय, फोर्ड कंपनी ही जागतिक वाहन निर्मितीमध्ये एक आघाडीची कंपनी आहे. या कंपनीने 400 एकर जागेची मागणी केली होती. 4000 कोटी रुपये गुंतवणूक करण्याचे आश्वासन या कंपनीने राज्य शासनाला दिले होते. या आश्वासनामुळे एमआयडीसीने जागा देण्याच्या संदर्भात प्रस्ताव ताबडतोब तयार केला. परंतु या प्रस्तावावर तीन महिने निर्णय घेतला गेला नाही. तयार झालेला प्रस्ताव का थांबवून ठेवतात? काही तोडपाणी होते का याची वाट पाहण्यासाठी? तीन महिने त्या जागा मंजूर करण्याच्या प्रस्तावावर निर्णय झाला नाही. शेवटी या कंपनीच्या माध्यमातून चालून आलेली सुवर्णसंधी गुजराथ राज्याकडे निघून गेली. तरी आपण म्हणायचे की, महाराष्ट्र उद्योगाच्या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर आहे.

सभापती महोदय, स्पेअर पार्ट तयार करणारी बॉस्को ही आघाडीची कंपनी आहे. 6000 कोटी रुपयांची गुंतवणूक या कंपनीच्या माध्यमातून येणार होती. नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियाने हायवेच्या बाजूला 60 मीटर जागा सोडण्यास सांगितल्यामुळे बॉस्को कंपनीने मंजूर केलेल्या जागेऐवजी दुसरीकडे जागा मिळावी अशी मागणी केली. त्या बाबतीत सुध्दा टाळाटाळ करण्यात आली. अमुक करा, तमुक करा असे सांगितले गेले. त्या कंपनीने अगोदरच 350 कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली होती. त्यामुळे त्या कंपनीने सांगितले की, आम्हाला महाराष्ट्रातून निघून जायचे होते परंतु आम्ही काही प्रमाणात गुंतवणूक केल्यामुळे आम्हाला जाता येत नाही.

सभापती महोदय, जनरल इलेक्ट्रिक ही फॉर्च्यून 500 मधील एक आघाडीची कंपनी आहे. या कंपनीने एमआयडीसीकडे जागेची मागणी केली. जागा मंजूर करणारे ऑफर लेटर देण्यास चार महिन्यांचा कालावधी लागला. साधारणपणे 7 ते 8 दिवसात जागा मंजूर करणारे ऑफर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

लेटर दिले जाते. परंतु निर्णय घेण्यास चार महिने का लागले हे माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी कधीतरी कॅबिनेटमध्ये दरडावून विचारावे अशी मी त्यांना विनंती करतो. शेवटी ही जनरल इलेक्ट्रिक कंपनी गुजराथ राज्यात निघून गेली. या सर्वासाठी या सरकारमध्ये सामील असलेली जी मंडळी आहेत तीच कारणीभूत आहेत. तरी उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे असे म्हणता येईल का याचा सत्ताधारी बाकावर बसलेल्या मंडळींनी विचार करावा.

सभापती महोदय, विजेचे भारनियमन हा विषय गेली अनेक वर्षे गाजतो आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये हा विषय अंतर्भूत आहे. प्रत्येक वेळी निर्धार आहे, मनोदय आहे, हमी घेतो असे वेगवेगळे शब्द वाक्यात वापरल्याचे आपल्याला वाचावयास मिळते. शुंगलू समितीने काय म्हटले याची माहिती घ्यावी. हा विषय सातत्याने आपल्यासमोर मांडला जातो. विजेच्या वहन आणि वितरणामधील तूट 30 टक्के आहे, परंतु तुटीचा दर ग्राहकांकडून वसूल करणे योग्य नाही असे म्हटले आहे. तरी देखील तुटीचा दर ग्राहकांकडून वसूल केला जात आहे. ॲसेट जास्त निर्माण केल्याचा देखावा केला जातो असे शासनानेच नेमलेली समिती म्हणते. तरी आम्ही आपले अभिनंदन करायचे? कारण देखावा उभा करणे आपल्याला नीट जमते. विजेच्या क्षेत्रात कृषि पंप धारकांनी जास्त वीज वापरल्याचे सांगण्यात येते. शुंगलू समितीने नमूद केलेल्या ऊर्जा खात्याबाबतच्या गोष्टी विचारात घेतल्या नंतर आपले अभिनंदन का करायचे हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सिंचनाखाली आलेल्या जमिनीची आकडेवारी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिली जाते. माझी माननीय राज्यपालांना विनंती आहे की, त्यांनी स्वत: एकदा या संदर्भात श्वेतपत्रिका काढावी. नक्की काय आहे हेच कळत नाही. 14 मार्च, 2011 रोजी असे म्हटले होते की, 1.85 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी 7.39 कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगितले. 15 मार्च, 2012 रोजी जुलै 2010 ते जून 2011 या कालावधीत 4.21 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आल्याचा उल्लेख आहे. हे कसे शक्य आहे? मी राज्यातील पाचही सिंचन विकास महामंडळांकडून माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती. मला उपलब्ध झालेल्या माहितीनुसार राज्यातील 78,864 एकर जमीन सिंचनाखाली असल्याचे म्हटले आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्यामुळे खरेच सिंचनाखाली किती जमीन आली आणि "कौन कितने पानी में" हे राज्यपालांनीच सांगितले पाहिजे. राज्यपालांच्या अभिभाषणात याहूनही कडी म्हणजे "विदर्भातील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे 50 टक्के दराने अर्थसहाय्य देऊन वितरित केल्यामुळे या भागातील सोयाबीन, कापूस आणि तूर इ. च्या उत्पादनात वाढ झाली" असे म्हटले आहे. विदर्भात हे उत्पादन झाले नाही म्हणूनच सरकारने याच वर्षी 2 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना मदत म्हणून दिले. मग दर्जेदार उत्पन्न झाले म्हणून ही 2 हजार कोटीची शाबासकी दिली की काय असा त्याचा अर्थ होतो. अशा प्रकारे शासन राज्यपालांच्या तोंडात सुध्दा खोटी आकडेवारी घालून राज्यातील जनतेला फसवित आहे. मग एक तर 2 हजार कोटी रुपये दिले हे तरी चूक असेल किंवा राज्यपालांनी जे सांगितले ते तरी चूक असेल यापैकी एक काही तरी चुकीचे आहे. विदर्भातील 6 आत्महत्याग्रस्त जिल्ह्यामध्ये कापूस, सोयाबीन आणि तुरीच्या पिकाची परिस्थिती वाईट झाली असताना अशा प्रकारचे वक्तव्य केले जाते. या निमित्ताने मला कवि सुरेश भट यांची कविता आठवते. ते म्हणतात की,

"इतकेच मला जातांना सरणावर कळले होते,
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते,
ही दुनिया पाषाणांची बोलून बदलली नाही,
मी बहर इथे शब्दांचे नुसतेच उधळले होते"

अशा प्रकारे राज्यपालांच्या तोंडात चुकीची आकडेवारी कशी जाते याचा विचार करणे आवश्यक आहे.

पीक कर्जाच्या बाबतीत शासनाने घोषणा केली होती की, 1 लाखापर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने पुरविण्यात येईल तेव्हा सत्तारुढ पक्षातील सर्वच सदस्यांनी बाके वाजवून स्वागत केले होते. तसेच त्यापुढे अत्यल्प दराने 3 लाखापर्यंतचे कर्ज देण्याची घोषणाही सरकारने केली. प्रत्यक्षात हे राज्यातील शेतकऱ्यांना मिळत असेल तर शासनाचे मी अभिनंदनच करीन. पण खरोखरच याचा फायदा राज्यातील किती शेतकऱ्यांना मिळतो ही माहिती जाणून घेण्याची प्रामाणिक इच्छा आहे. म्हणजे गेल्या वर्षी किती शेतकऱ्यांनी 50 हजारापर्यंत पीक कर्ज घेतले होते व किती

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज दिले याची आकडेवारी समजणे आवश्यक आहे. तसेच बँकेच्या व्याजाच्या दरातील फरक शेतकऱ्याच्या खात्यात कोणत्या तारखेला जमा झाला याचे उत्तर सुध्दा मिळाले पाहिजे. शेवटी मी जे बोलत आहे त्यात काही तरी तथ्य आहे म्हणूनच बोलत आहे.

महोदय, शिक्षण विभागाने राज्यात पट पडताळणी केली व त्यात काही प्रकार उघडकीस आले आहेत. पण नंतर मंत्री महोदयांनी कुठे पळ काढला हेच कळत नाही. पट पडताळणीवर आतापर्यंत 1100 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनीच एकदा सांगितले असल्याचे मी वाचलेले आठवते. नंतर त्याचे काय झाले याचा खुलासा सभागृहात होणे आवश्यक आहे. यात संस्थांनी पैसे खाल्ले हे खरेच आहे पण त्यात अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्या मुलांची पटावर नावे खोटी दाखविण्यात आली होती ती खोटी नसून ती मुले त्या गावातीलच असतात पण शाळेत येत नाहीत. ही मुले ड्रॉप आऊट आहेत. अशा प्रकारे 60 टक्के ड्रॉप आऊट असतील तर मग सर्व शिक्षा अभियानाचा जो गाभा आहे तोच साध्य होत नाही. त्याच गावात राहणारी ही मुले शाळेत का येत नाहीत याचाही कुठे तरी विचार करणे गरजेचे आहे.

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मला कधी कधी तर हसायलाच येते. कारण राज्याचा समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी माझे शासन कटिबध्द आहे, असे राज्यपाल म्हणतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

तिन्ही प्रदेशामध्ये निधीच्या नियम वाटपांची मूलभूत तत्वे सुचवण्यासाठी शासनाने प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली असून या समितीच्या अहवालातून समतोल प्रादेशिक विकासाची रूपरेषा मिळेल असे म्हटले होते. माननीय राज्यपालांनी सन 2012 च्या अभिभाषणात असे म्हटले होते की, "राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. अनुशेष व विकास खर्चाच्या समान वितरणाच्या समस्येचा नव्या दृष्टीने पुनर्विचार करण्यासाठी तसेच साधन संपत्तीचे समान वाटप होण्यासाठी निश्चित असे पर्यायी मार्ग शोधण्यासाठी तज्ज्ञाची एक समिती करण्यात येत आहे."

सभापती महोदय, या शासनाला डॉ. केळकरांचे नाव सुचवण्यासाठी 365 दिवस लागल्यामुळे आपण ख-या अर्थाने शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. डॉ. केळकरांची समिती आल्यामुळे ती काही दिवसानंतर अहवाल देईल व त्यावर पुन्हा चर्चा होईल पुन्हा सन 2013 च्या राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख येईल की, "आता काम अर्धे झालेले आहे त्यांच्या 36 जागा मान्य केल्या आहेत. परंतु एमपीएसीच्या मुलाखती होत नाही त्यामुळे ते रुजू झाले नाही." असे काही तरी कारण करुन अजून पुढचे वर्ष तुम्ही काढाल. आपल्या सरकारने जी कार्यतत्परता दाखवलेली आहे तीचे खरे म्हणजे माननीय उल्हास पवार यांनी नक्कीच अभिनंदनच केले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशाचे पालन होते की, नाही याबाबत त्यांनी सरकारला विचारले पाहिजे. अविकसित भागाकडे शासनाने कायमच दुर्लक्ष केल्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांना अविकसित भागाकडे निधी वळता करण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या दोन तीन वर्षात विदर्भाचा अनुशेष संपल्याशिवाय नवीन प्रकल्प सुरु केले जाणार नाही अशा आशयाच्या घोषणा देखील करण्यात आल्या. विदर्भामध्ये सन 2009-2010 मध्ये 14,415 हेक्टर जमीन सिंचनाखाली आली होती. परंतु पश्चिम महाराष्ट्रात 24 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली होती. सन 2010-11 मध्ये विदर्भात 23 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली तर पश्चिम महाराष्ट्रात मागच्याच पध्दतीने जास्त प्रमाणात ती आली होती. माननीय राज्यपाल महोदय, जे निर्देश देत असतात ते निर्देश हे शासन पाळते काय हे पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, महामहिम राज्यपाल महोदय हे राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत. राज्यपाल महोदयांच्या भाषणाला एक पावित्र्य आहे, एक वेगळे महत्व आहे. निवडणुकीपूर्वी केलेल्या घोषणांची हे शासन कधीच अंमलबजावणी करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु किमान माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात ज्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे त्या विकास कामांची आपण किमान अंमलबजावणी करतो काय ? याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन 2010-2011 व सन 2011-2012 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची माहितीच मी जमा केलेली आहे.

सभापती महोदय, सन 2010-2011 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये "पोलिसांचे आधुनिकीकरण" या विषयामध्ये आधुनिक शस्त्रास्त्रे व चिलखती वाहने पुरविण्याचे काम माझ्या सरकारने केले आहे असे म्हटले होते. परंतु प्रत्यक्षात काहीच झालेले नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी सन 2012 च्या अभिभाषणात सांगितले होते की, "पोलिसांना चिलखती वाहने पुरवून संगणकीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे". परंतु प्रत्यक्षात काहीच कामे झाली नाहीत. सन 2010 च्या माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात "नक्षलवादी कारवाया हाताळण्यासाठी पोलिसांना प्रशिक्षण व प्रशासकीय सेवेत सुधारणा करण्यात येईल" असे सांगितले होते. सन 2011 मध्ये "नक्षलवादी कारवाया सक्षमतेने हाताळण्यात येतील" असे सांगण्यात आले होते. तसेच सन 2012 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात "गडचिरोली व गोंदिया जिल्हयात केंद्रशासनाचा कार्यक्रम राबविण्यात येईल" असे सांगितले होते. परंतु यासंदर्भात सुध्दा काहीच कार्यवाही झाली नाही. हे सरकार केवळ शब्दांची यादी तयार करण्याचेच काम करीत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी सन 2010 च्या अभिभाषणात सांगितले होते "डिसेंबर, 2012 मध्ये राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी शासन कटिबद्ध राहील". माननीय राज्यपाल महोदयांनी सन 2011 च्या अभिभाषणात पुन्हा सांगितले होते की, "डिसेंबर, 2012 पर्यंत राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी माझे शासन विविध पाऊले उचलीत आहे".

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सन 2012 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात सांगितले आहे की, "डिसेंबर, 2012 पर्यंत राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, भुसावळ येथील वीज निर्मिती संच लवकरच कार्यान्वित होतील" असे सांगितले होते. आता माननीय राज्यपाल महोदयांनी मेट्रो रेल्वेचा विषय उपस्थित केलेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी सन 2010 च्या अभिभाषणात सांगितले होते की, "वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो सन 2011 पर्यंत सेवेत रुजू होईल तसेच चारकोप-मानखुर्द प्रकल्पाचे काम लवकरच सुरु करण्यात येईल व ही सेवा सन 2013 पर्यंत कार्यान्वित होईल". परंतु सन 2012 च्या अभिभाषणात माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले की, "वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर प्रकल्पाचे काम लवकरच पूर्ण होईल".

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांची काय प्रगती झालेली आहे त्याची माहिती माननीय राज्यपाल महोदयांनी मागवण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सन 2011 मध्ये काय सांगितले, चारकोप मानखुर्द प्रकल्पाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल. शासन वर्सोवा-घाटकोपरचे काम विसरलेच. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपरचे काम लवकरच पूर्ण होईल असे परवाच सांगितले. आपण राज्यपालांना काय देतो, आपण काय प्रगती केली आहे, हे पाहता की नाही ? वस्त्रोद्योग धोरणासह आपल्या एक-एक योजनांची मी माहिती वाचायला लागलो तर ती सर्वांना कळून येईल. त्यामुळेच हे सरकार पुढे गेले आहे की नाही, पुढे पाऊल टाकते आहे की नाही, हेच कळत नाही. या सरकारला विकास जमतच नाही.

या राज्यात भावनिक विषय देखील आहेत. मराठी भाषेचा विषय देखील भावनिक आहे. श्री.चपळगावकर साहेबांनी राजीनामा दिल्यानंतर आज पर्यंत आपण अध्यक्ष नेमलेला नाही. आम्ही 35 पदे निर्माण केली असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. श्री.चपळगावकरांचा विषय गेल्या अधिवेशनात निघाला होता. अजून पर्यंत ती पदे भरली गेली नाहीत. तुमच्याने विकास जमत नाही हे समजू शकतो. श्री.उल्हास पवार आपण मराठीप्रेमी साहित्यिक आहात त्यामुळे आपण याचा पाठपुरावा कराल काय ? श्री.चपळगावकर यांनी नाराजीतून राजीनामा दिला. ते सोडून गेले. त्यांची नाराजी काय आहे याची विचारणा शासनाने केलेली नाही. ते गेले तर आम्ही दुसरे आणू अशी भूमिका शासनाने घेतली. पण दुसरे नवीन अध्यक्ष देखील आले नाहीत. 35 जागा आपण भरल्या का ? आपण त्या जागा निर्माण केल्या तर मग त्या भरणार कधी ? श्री.अजित पवार यांनी देखील घोषणा केली होती. मराठीच्या संवर्धनासाठी वाटेल तितका पैसा देऊ, असे त्यांनी मागील वर्षी जोरदार खणखणीत आवाजात सांगितले होते. अगदी दादा स्टाईलमध्ये. त्यापैकी किती निधी दिला ?

श्री.अजित पवार (बसून) : जेवढे मागितले तेवढे दिले.

श्री.विनोद तावडे : याचा अर्थ काँग्रेसवाल्यांना निधी मागायचा नव्हता. त्यांना मराठीचे पडले नाही, असे राष्ट्रवादीला सांगायचे आहे. आम्हाला कळले, लोकांना कळले. श्री.उल्हासदादा पवार आपण समजून घ्यावे. तुम्ही पैसे मागितले नाहीत, मी द्यायला तयार होतो, मराठीसाठी काँग्रेसला पैसा घ्यायचा नाही, असे सभागृहात साक्षात उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, शासनकर्त्यांच्या भ्रष्टाचाराबाबत मुख्यंमंत्र्यांनी कबुली दिली आहे. अलीकडे झालेल्या जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या निवडणुकींमध्ये काँग्रेसला पराभव सहन करावा लागला. याबाबत मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, राष्ट्रकूल स्पर्धेचे आयोजन करणारे श्री.सुरेश कलमाडी, आदर्शमधील श्री.अशोक चव्हाण, व्हिसलिंग वूडस साठी श्री.विलासराव देशमुख यांनी दिलेली जमीन, बेहिशोबी माया जमिविल्याबद्दल श्री.कृपाशंकर सिंह....

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी असे सांगितले, असा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेते करीत आहेत. वर्तमानपत्रातील बातमी तशी नाही. आपण अनेकांचा येथे उल्लेख करीत आहात पण ते आज येथे उपस्थित नाहीत. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना सांगितले असा उल्लेख येथे माननीय विरोधी पक्ष नेते करीत आहेत, ते अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे असा उल्लेख करणे योग्य होणार नाही.

उप सभापती : ठीक आहे. हे मी रेकॉर्डवरून काढून टाकतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राष्ट्रकूल स्पर्धेचे आयोजन करणारे श्री.सुरेश कलमाडी, आदर्श प्रकरणातील श्री.अशोक चव्हाण, व्हिसलिंग वूड जमीन प्रकरणातील श्री.विलासराव देशमुख, बेहिशोबी माया जमविणारे श्री.कृपाशंकर सिंह यांच्या डागळलेल्या प्रतिमेमुळे काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आहे, असे सांगितले. हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. हायकोर्ट देखील हेच सांगत आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम....

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, असे चुकीचे त्यांच्या तोंडी घालणे बरोबर नाही. असे त्यांनी कुठे म्हटले आहे ते मला दाखवावे.

श्री.विनोद तावडे : माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. त्यांना येऊ द्यावे मग मी कुठे सांगितले ते सांगतो.

श्री.उल्हास पवार : असे नाही. असा उल्लेख त्यांच्या तोंडी घालणे बरोबर नाही. माननीय विरोधी पक्ष नेते वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे बोलत आहेत. मग आम्हाला देखील अनेक गोष्टींचा उल्लेख करावा लागेल. तसा उल्लेख मी करू का ? ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : वर्तमानपत्रातील सगळ्याच बातम्या खऱ्या असतात असे नाही. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी आक्षेपार्ह मुद्दा उपस्थित केला आहे.

श्री.विनोद तावडे : मी काँग्रेसचे नेते आणि मंत्री खाजगीत काय सांगतात ते सांगितले तर ते अजून महागात पडेल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना पुरावा हवा असेल तर मी दहा मिनिटांमध्ये श्री.कृपाशंकर सिंह यांच्या मुलाची पार्टनरशिप आहे. ...(अडथळा) .... आता कृपा करून माझे ऐकून घ्यावे. मी माननीय सभापतींच्या अनुमतीनेच बोलण्यास उभा आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. श्री.कृपाशंकर सिंह यांच्या मुलाच्या संबंधातील नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय. पण याबाबतीत त्यांचे जर आव्हान असेल तर मी ते स्वीकारत आहे आणि श्री.कृपाशंकर सिंह यांचा मुलगा देखील पार्टनर आहे आणि मी त्या संबंधातील सर्व कागदपत्रे एक तासाच्या आत आपल्या हातामध्ये देण्यास तयार आहे.

उप सभापती : आपण कागदपत्रे दिली तरी मी काय करणार ? कारण मी त्या पार्टनरशीप मध्ये नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, यासंदर्भात श्री.कृपाशंकर सिंह यांची सर्व प्रॉपर्टी जप्त करण्याचे हाय कार्टाने आदेश दिलेले आहेत. मग माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगण्याची आवश्यकता काय ? हाय कोर्टापेक्षा माननीय मुख्यमंत्री मोठे आहेत काय ? मी आपल्याकडे या संबंधातील सर्व कागदपत्रे देतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्याबद्दल असे वक्तव्य करणे योग्य नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याला सर्व कागदपत्रे देतो.

उप सभापती : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी म्हटल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भातील जो आक्षेपार्ह मुद्दा आहे, तो या चर्चेतून काढून टाकण्यात येत आहे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.विनोद तावडे : यानंतर मी याबाबतीत हाय कोर्टाने काय म्हटलेले आहे, ते याठिकाणी सांगू काय ? हाय कोर्टाच्या जज्जमेंट मधील काही उतारे वाचून दाखवितो. सन्माननीय सदस्य श्री.कृपाशंकर सिंह यांच्या बाबतीत चौकशी करावी असे ॲन्टी करप्शन ब्युरोला सांगण्यात आले आणि त्यांनी अहवाल दिला असून त्यामध्ये जे म्हटलेले आहे, ते येथे वाचून दाखवितो. "We may mention that by no arithmetical calculation can any reasonable or prudent investigator or calculator come to the conclusion that is reflected in the official report of ACB. We outright reject this erroneous calculation of the percentage of disproportion of the assets of Respondent Nos. 9 to 14." यामध्ये श्री.कृपाशंकर सिंह, त्यांच्या पत्नी, मुलगा, सून, जावई इ.सर्वजण आहेत. त्यामध्ये पुढे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हटलेले आहे, "We also reject the various entries showing expenses without documentary evidence."

उप सभापती : ही बाब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाशी संबंधित आहे काय ?

श्री.विनोद तावडे : होय.

उप सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाशी याचा काहीही संबंध नाही. हा दुसरा विषय आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी याबाबतीत दहा खेद व्यक्त केले आहेत, त्यातील खेद नंबर 9 पहावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय राज्यपाल यांनी याबाबत उल्लेख करावयास हवा होता, पण तो केलेला नाही याचा खेद होत आहे.

उप सभापती : याठिकाणी आपण माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केलेले आहे, त्या आधारे बोलत आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हाय कोर्टाने बेहिशोबी संपत्ती प्रकरणाबाबत जे ताशेरे मारलेले आहेत. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Such calculation would beat our arithmetic as much as conscience." म्हणजे कांदे-बटाटे विकून इतकी प्रॉपर्टी कशी होते आणि ते कोणत्या पध्दतीने आणि कॉन्सायन्सने कसे होऊ शकते, तसेच हिरानंदानी यांच्या प्रकरणामध्ये मुंबई उच्च न्यायालयाने असे म्हटलेले आहे की,"We see the specific intent of wholly ignoring the most vital, and perhaps the only, condition in tri-partite agreement. It appears that the State sought to make amends on behalf of the developer and in the words of the Petitioners sought to shield the developer." त्यामध्ये पुढे म्हटलेले आहे, "We are suprised to note that all the parties - the Government, the MMRDA and the developer have strictly construed and complied with the Clause 8(iii); they have totally ignored Clause 8(ii)." त्यामध्ये ज्या अटींवर घेण्यात आले होते ते विसरले. त्यामध्ये पुढे म्हटलेले आहे, "A glance at such construction easily shows that it is more than required 15% of the total FSI. We do not require to make accurate arithmetical .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

calculations. We do not find a lot of substance in the Petitioner's contention that the State Government Officers in collusion with the developer have turned a Nelson's Eye to the gross violations of the tri-partite agreement by the developer." तसेच व्हिसलींग वुड्स प्रकरणात माननीय उच्च न्यायालयाने असे ताशेरे ओढले आहेत की,"The second Resolution of the Respondent No.1 Board clearly shows that the Chief Minister was taking keen interest in the entire project and it is, therefore, difficult to accept defence of innocence." यावेळी माननीय मुख्यमंत्री कोण होते हे सर्वांना माहिती आहे. "Having reached the conclusion that the entire transaction is illegal and also reached the conclusion that the role played by the then Chief Minister, Respondent No.7, was quite unusual, the next question which arises is how the relief is to be moulded." हे सर्व पेपरमध्ये आलेले नाही तर हाय कोर्टाच्या जज्जमेंटमध्ये म्हटलेले आहे.

श्री.उल्हास पवार : सुप्रीम कोर्टामध्ये दोघांची केस पेंडींग आहे. तसेच तुमचे खासदार हे दुसऱ्या बाईला स्वत:ची बायको म्हणून घेऊन जातात हे देखील आम्ही बोलावयाचे काय ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या अनुषंगाने भाषण करीत असताना सन्माननीय सदस्यांनी भान राखून बोलावे अशी विनंती आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना आपण या ठिकाणी एकमेकांबद्दल जो उल्लेख करावयास नको तो आपण करीत आहात आणि हे अत्यंत अयोग्य आहे. माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, आपण अभिभाषणावर चर्चा करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाचे जजमेंट असंसदीय आहे असे आम्ही मानायचे काय ? "The Respondent No.7 has clearly misused his official position as a Chief Minister of the State and it is certainly not acceptable that a Chief Minister of a State will personally sign an agreement as a witness though such agreement is completely illegal and does not have any support or authority even in the form of Resolution of the Respondent No.1 Corporation. It is clear that the Respondent No.7 has extended undue favours to Respondent No.4." आपण देवस्थान देखील सोडले नाही. त्या संदर्भात देखील माननीय उच्च न्यायालयाने असेच म्हटले आहे.

सभापती महोदय, हे सर्व होत असताना आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन कसे करायचे ? कोणता संवेदनशील माणूस अभिनंदन करील ? हा सर्व कारभार दुरुस्त करण्यासाठी माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे "पृथ्वी मिसाईल" आले. आम्हाला वाटले की आता हे सर्व दुरुस्त होईल. परंतु त्यांच्या विभागामध्ये सुध्दा सर्व काही सुरळीत आहे असे नाही. अखिल भारतीय माथाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेने महसूल विभागाकडे माथाडी कामगारांसाठी तीन एकर भूखंड मागितला. परंतु सदर भूखंड गोल्फ मैदानासाठी राखीव असल्यामुळे सिडकोने तो देण्यास असमर्थता दर्शविली. परंतु माथाडी कामगार युनियनला सिडकोकडे भूखंड मागण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्यानंतर दिनांक 13 सप्टेंबर 2011 रोजी नगर विकास विभागाच्या परिपत्रकानुसार घणसोली सेक्टर-एक मधील जागा काही अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात आली. माथाडी कामगार स्थलांतरित असावा, बोर्डाकडे नोंदणीकृत असावा इत्यादी अटी होत्या. या युनियनचे अध्यक्ष श्री.पोपट पाटील हे कराड येथील आहेत असे उपलब्ध

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

कागदपत्रांवरुन दिसते. त्यांच्या युनियनचे सदस्य किराणा बाजार व दुकाने मंडळ 16 सदस्य, मुंबई लोखंड पोलादचे - 2 सदस्य , रेल्वे गुडसचे- 4 सदस्य, मुंबई भाजीपाला -11 सदस्य इतके सदस्य असताना त्यांना दोन हजार घरांसाठी जमीन का दिली ? आतापर्यंत माथाडी कामगारांना 12 हजार घरे दिली, नंतर आणखी वाढवून दिली. या युनियनची सभासद संख्या 16, 2, 4, 11 इतकी असताना नगर विकास विभागाने दोन हजार घरांची जमीन का दिली व कशी दिली हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार उपस्थित आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, आजकाल असे म्हटले जाते की, मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर कोणतरी एक दुवा आहे. म्हणजे कामाच्या आणि व्यक्तीमधील दुवा आहे. त्याचा आशिष मिळाल्याशिवाय फाईल पुढे सरकत नाही. तेव्हा हे आशिष दुवा कोण आहेत ? ते जयंत शाह, भोसले व काकडे यांच्या सारखे आहेत काय अशी शंका आमच्या मनात यायला लागली आहे. ही चर्चा मी करीत नाही. ही चर्चा आय.ए.एस. अधिकारी करीत आहेत. तेव्हा हा आशिष दुवा कोण आहे? ज्यास मंत्रालयात रेड कार्पेटची ट्रीटमेंट मिळते. त्याचा दुवा साधल्याशिवाय काम होत नाही अशी माझ्या मनात शंका आहे.

सभापती महोदय, स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत असताना आपण उद्योग विभागात काय चालले आहे ते दाखविले, सिंचन विभागात काय चालले आहे ते दाखविले. सातारा येथे शिधावाटपामध्ये झालेल्या गडबडीचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला. सर्वोच्च न्यायालयाच्या वर आणखी कोणते न्यायालय नाही. ज्यावेळी आम्ही हा विषय येथे काढला होता तेव्हा प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे असे सांगण्यात आले. परंतु आता तो विषय सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेला आहे की सातारा येथे शिधापत्रिका वाटपामध्ये गोंधळ झालेला आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या विंदा करंदीकरांच्या ओळी आठवतात.

यानंतर कु.थोरात...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे. . .

जनतेच्या पोटामध्ये आग आहे, आग आहे ।
जनतेच्या डोळयामध्ये शंकराचा राग आहे ॥
जनतेच्या ऐक्यामध्ये लाव्हाची लाट आहे ।
जनतेच्या पायांपुढे प्रकाशाची वाट आहे ॥
जनतेच्या हृदयामध्ये अन्यायाची कळ आहे ।
जनतेच्या बाहूंमध्ये सागराचे बळ आहे ॥
जनतेच्या मुक्तीसाठी अजून एक समर आहे ।
पण जिचा आत्मा आहे ती जनता अमर आहे ॥

तुम्ही केलेली सगळी पापे जनता विसणार नाही एवढेच लक्षात ठेवा. त्यामुळे राज्यपाल महोदयांच्या भाषणाबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 97 अन्वयेच्या चर्चेबाबत

उप सभापती : आता नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, 4.00 वाजेपर्यंत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु ठेवावी. 4.00 वाजता माननीय मुख्यमंत्री या सभागृहात येतील त्यावेळी नियम 97 अन्वयेच्या अल्पकालीन चर्चेला सुरुवात करावी.

उप सभापती : माननीय सभापती यांनी मला कळविल्याप्रमाणे मी कामकाज पुकारलेले आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील भाषण सुरु ठेवावे तोपर्यंत माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी येतील.

उप सभापती : छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका बाबतच्या अल्पकालीन चर्चेमध्ये आता सर्वश्री श्री दिवाकर रावते, विनायक मेटे आणि हेमंत टकले हे तीन सन्माननीय सदस्य भाग घेणार आहेत.

श्री. दिवाकर रावते : प्रथम सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना बोलू द्यावे त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले बोलतील त्यानंतर मी माझ्या भाषणाला सुरुवात करीन तोपर्यंत माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील.

उप सभापती : ठीक आहे. या ठिकाणी जी तीन सन्माननीय सदस्यांची नावे घेण्यात अलेली आहेत त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे

मु.शी.: अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी न देणे या विषयावर सर्वश्री विनाद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते,सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील, विनायक मेटे,रमेश शेंडगे, हेमंत टकले वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु). . . .

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भातील नियम 97 अन्वयेच्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी दिली उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी सुरुवातीलाच आपले मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, माझ्याबद्दल या सभागृहात जी चर्चा झाली आणि जी वक्तव्ये करण्यात आली त्याबद्दल आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो. छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि स्मारकाचा विषय असल्यानंतर श्री. विनायक मेटे हे कधीही सभागृहात गैरहजर असू शकत नाहीत ही वस्तुस्थिती सर्वांना माहीत आहे. परंतु माझी स्वत:ची काही घरगुती अडचण असल्यामुळे मी त्याबाबत सभापती महोदय, आपल्याला पूर्व कल्पना दिली होती तसेच त्याबाबत मी आपल्याला लेखी पत्र दिले होते आणि आपली परवानगी घेऊनच मी सभागृहात गैरहजर होतो. परंतु त्या एका गोष्टीचा आधार घेऊन माझ्याबद्दल गैरसमज पसरविण्याचे काम सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे.

उप सभापती : तसे काहीही झालेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या सभागृहात काल माझ्याबद्दल जे बोलले गेले त्याबद्दलचे सर्व रेकॉर्ड माझ्याकडे आहे. परंतु त्याबद्दल मी जास्त बोलणार नाही. सर्व सन्माननीय सदस्यांना मी या ठिकाणी अतिशय नम्रपणे विनंती करु इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत. ते कोणत्या एका जातीचे, कोणत्या एका धर्माचे, कोणत्या एका वर्गाचे किंवा कोणत्या एका पंथाचे एवढयापुरतेच मर्यादित नाही.

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ...

त्यांच्या जीवनकाळामध्ये सुध्दा या गोष्टीचा स्पर्श होईल अशा पध्दतीची कोणतीही घटना केलेली नाही. हे कोणीही सांगेल. कोणीही वाचले तरी त्यांना माहीत होईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करीत असताना त्यामध्ये कोणाचाही विरोध असण्याचे काही कारण असता कामा नये आणि कोणी करुही नये. कारण आपली काही जी प्रतिके असतात, काही अस्मितेच्या गोष्टी असतात त्यामध्ये भेदाभेद असण्याचे कारण असू नये असे माझे वैयक्तिक मत आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक या राज्यामध्ये व्हावे यासाठी गेली अनेक वर्षे आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. या बाबतीत अनेक लोकांचा गैरसमज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करावयाचे म्हणजे समुद्रामध्ये किंवा अन्य ठिकाणी एखादा पुतळा उभारावयाचा म्हणजे आपले इतिकर्तव्य संपले, असा अनेकांचा समज आहे. असे अनेक लोक बोलून दाखवितात, हे दुर्दैव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आपण अनेक ठिकाणी पाहतो. या राज्यामध्ये तर गावोगावी त्यांचे पुतळे पहावयास मिळतील शहरामध्ये त्यांचे पुतळे पहावयास मिळतील. राज्याच्या बाहेर सुध्दा त्यांचे पुतळे पहावयास मिळतात. परदेशामध्ये सुध्दा अनेक ठिकाणी त्यांचे पुतळे पहावयास मिळतात. पण त्यांचे स्मारक कोठेही नाही. आपल्या राज्यामध्ये तर अजिबात नाही. हे कोणाचे राज्य आहे, कोणत्या पक्षाचे राज्य आहे, याला महत्व नाही. त्यांचे स्मारक नसणे ही गोष्ट या राज्याला खाली बघावयास लावणारी, नामुष्कीची किंवा लांछनास्पद गोष्ट आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

सभापती महोदय, मी गेल्या वेळी सुध्दा एका गोष्टीचा उल्लेख केला होता म्हणून आज त्या गोष्टीचा जास्त उल्लेख करणार नाही. आम्ही व्हिएतनामला गेलो असताना आम्ही पाहिले की, त्या राष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आहे. परंतु आपल्या राज्यामध्ये त्यांचे स्मारक अजिबात होऊ शकलेले नाही. आपण ऊठता बसता छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेत राहतो त्यामुळे याचा विचार केला पाहिजे. आंध्र प्रदेशमध्ये सेलमला सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आहे. आपल्या सिंधुदुर्ग किल्ल्यामध्ये शिवाजी महाराजांचे मंदिर आहे. आंध्र प्रदेशच्या लोकांनी त्या ठिकाणी मंदिर बांधले. आपल्या राज्याच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी जाऊन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

भेटी दिल्या. अनेक लोकांनी भेटी दिल्या. त्या ठिकाणी मंदिर आहे पण आपल्या महाराष्ट्रामध्ये मात्र अलीकडच्या काळात असे मंदिर किंवा स्मारक आपण कधीही करु शकलो नाही. सिंधुदुर्ग किल्ल्यामध्ये मंदिर आहे. त्याचा उल्लेख मी केला. परंतु ते मंदिर त्यांनी बांधले. आपण काही केलेले नाही. आपले कर्तृत्व शून्य आहे. त्यामुळे तो प्रश्न नाही. कर्नाटकमध्ये शहाजी महाराजांचे मंदिर आहे. आपण आणखी काहीही करु शकलो नाही. वेरुळला आपण छोटीशी शहाजी गढी केली. आपल्याला अतिशय लाज वाटेल अशा पध्दतीचे ते केले आहे. आपण काहीही करु शकत नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो. आपण त्याची दखल घ्यावी. श्रीमती ममता बॅनर्जी नुकत्याच पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आल्यानंतर त्या आपल्याच नावाने म्हणजे दिवाकरजी जोशी या नावाने कलकत्यामध्ये महाराष्ट्र मंडळ चालवितात. त्या ठिकाणच्या मराठी मंडळींनी श्रीमती ममता बॅनर्जी यांना पाठिंबा दिला. त्याचा त्यांना उपयोग झाला आणि त्या निवडून आल्या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

त्याबाबत आभार मानण्यासाठी गणपती उत्सवाच्या वेळी महाराष्ट्र मंडळामध्ये श्रीमती ममता बॅनर्जी गेल्या होत्या. त्यांनी अगदी मोठेपणाने सांगितले की, तुम्ही मला फार मदत केलेली आहे. मराठी माणूस शब्दांचा पक्का असतो. हे आम्हाला दाखवून दिले आहे. तुम्ही कोणत्याही गोष्टीची मागणी करावी. आमच्या राज्य सरकारला सांगावे. मी तुमच्यासाठी काय करु शकते तेवढे सांगा. तेव्हा तेथील महाराष्ट्र मंडळातील लोकांनी स्वत:च्या स्वार्थासाठी काही मागितले नाही. त्यांनी कलकत्त्यामध्ये छत्रपतींच्या स्मारकाची, पुतळ्याची आणि अन्य गोष्टींची मागणी केली. श्रीमती ममता बॅनर्जी यांनी मागेपुढे न पाहता या मागणीसंबंधी ताबडतोब होकार दिला. त्यांनी केवळ होकार दिला नाही तर शासकीय जागा मिळविणे व कागदपत्रांची पूर्तता करण्याची कार्यवाही लगेच सुरु केली आहे. श्रीमती ममता बॅनर्जी नुकत्याच सत्तेवर आल्या आहेत. त्या इतक्या कमी कालावधीत त्या हे काम करु शकतात, मग हे राज्य निर्माण होऊन 50 वर्षे झाली आहेत. तरीही आपल्याला त्याचे काही वाटत नाही. निदान जनाची नाही तर मनाची तरी वाटली पाहिजे. मी कोणत्याही पक्षाबाबत बोलत नाही. मी एका पक्षाचा सदस्य म्हणूनही बोलत नाही. मग राष्ट्रवादी काँग्रेस असेल, काँग्रेस असेल, शिवसेना पक्ष असेल, भाजपा असेल, कोणताही पक्ष असेल. उठता बसता छत्रपतींचे नाव घेत असतो आणि त्यांच्यासाठी करण्याची वेळ येते तेव्हा कोणी फार गांभीर्याने पुढे जात नाही. म्हणून अनेक वर्षांपासून आम्ही ही मागणी करीत आहोत, परंतु या मागणीला कोणीही गांभीर्याने घेत नाही. मी गेल्या वेळी सुध्दा बोललो होतो. शिवसेना-भाजप यांचे सरकार राज्यात आले त्यावेळी माननीय श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री होते, माननीय श्री.सुधीरभाऊ जोशी हे महसूल मंत्री होते. त्यावेळी वचननाम्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मारक होण्याचा आम्ही आग्रह धरला होता. त्यांनीही या स्मारकांचा वचननाम्यामध्ये समावेश केला होता. परंतु समिती नेमण्याच्या पलीकडे काहीही झाले नाही. त्याबाबत श्री.सुधीरभाऊ जोशी यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. पण दुर्दैवाने त्यांचा अपघात झाला, नंतर त्यांच्याकडून महसूल खाते गेले. त्यानंतर हा विषय बाजूला गेला. परंतु बाकीच्या लोकांनी काहीही केले नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनायक मेटे....

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी परवा भाषण केले होते. त्यावेळी त्यांनी माझ्याबद्दलही उल्लेख केला होता. त्याबाबत मी बोलणार नाही. पण त्यांनी आपल्या भाषणातून काय दाखवून दिले ? मी त्यांच्या पक्षाबाबत बोलत नाही. मी भावनात्मक राजकारण करतो असे ते म्हणाले होते. भावनात्मक राजकारण कोण कोण करतो ते आम्ही सांगू. राम मंदिराचा मुद्दा कसा सुरु करण्यात आला, त्याला किती वर्षे झाली, त्यानंतर तुमच्या पक्षाला तेथे एक विट तरी बसविता आली का ? त्यानंतर केंद्रात भारतीय जनता पक्षाची सत्ता आली होती. राज्यातही तुमच्या पक्षाची सत्ता आली होती. त्यावेळी जे राजकारण करण्यात आले ते भावनात्मक नव्हते काय, त्यावेळी तुम्हाला कळत नव्हते काय ? माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना या राज्यातील शांतता बिघडवावयाची आहे असा त्यांनी आरोप केला होता. मी तर या निमित्ताने माननीय श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करीन. या राज्यातील प्रत्येक पक्ष छत्रपतींच्या स्मारकाविषयी बोटचेपीपणाची भूमिका घेत होता. आज 'सामना' या वृत्तपत्रात या विषयी अग्रलेख आलेला आहे. या विषयावर जेव्हा जेव्हा चर्चा केली जाते त्या त्यावेळी याबाबत त्यातून भूमिका मांडली जाते. परंतु हे स्मारक होण्यासाठी कोणीही पाठीशी उभे राहत नाही. मी हे अतिशय जबाबदारीने बोलतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आम्ही राजकारण करीत आहोत, सरकारला राज्यातील शांतता बिघडवायची आहे असा भाषणातून उल्लेख केला होता. शांतता आम्ही बिघडवित नाही, तुम्ही बिघडवित आहात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनायक मेटे...

हजारो लोकांचे बळी घेता आणि त्यानंतर तुम्ही राजकारण करता ! आम्ही ते करीत नाही.

काल या ठिकाणी झालेली भाषणे मी ऐकली. त्या भाषणामध्ये जेम्स लेन विषयी अधिक उल्लेख होता. स्मारकाच्या संदर्भातील उल्लेख कमी प्रमाणात होता...(अडथळा)... मी कोणत्याही पक्षाबद्दल बोलत नाही. माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आला म्हणून त्याबाबतीत स्पष्टीकरण देणे माझे काम आहे. मला हे सांगावयाचे आहे की, त्यांना छत्रपती शिवरायांच्या स्मारका बद्दल कोणताही कळवळा नाही. त्यांच्या भाषणाची जेवढी पाने झाली असतील त्यातील अर्धीअधिक पाने जेम्स लेन आणि आरक्षणाच्या विषयासंबंधीची असतील. या विषयासाठी त्यांना वेगळी व्यासपीठे उपलब्ध आहेत.

सभापती महोदय, काही प्रश्नाच्या बाबतीत जेव्हा तुम्ही आम्ही सोबत जाऊ असे म्हणतो त्यावेळी तुम्ही तोंड गप्प करुन बसता, शहाजोगपणाच्या गोष्टी करता. कोणाला हे सांगता ? छत्रपती शिवरायांच्या स्मारकाच्या बाबतीत पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून, राजकारणाच्या पलीकडे जाऊन गांभीयाने विचार करण्याची गरज आहे. आम्ही या बाबतीत 1990 पासून सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. याबाबतीत 2004 सालापर्यन्त काहीही हालचाल झालेली नाही. स्मारक करावयाचे हे निश्चित झाले होते. पण ते कोठे करायचे हे निश्चित झालेले नव्हते. हे काम तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या काळात झाले. दिनांक 14 फेब्रुवारी 2005मध्ये हे स्मारक, ज्याची आम्ही गेली अनेक वर्षे मागणी करीत होतो ते अरबी समुद्रामध्ये उभारण्याचा निर्णय झाला. त्यानंतर त्याबाबतीत काही बैठका झाल्या, उच्चस्तरीय समित्या नेमण्यात आल्या. सन 2008मध्ये जागाही अंतिम झाली. त्यावर शिक्कामोर्तब झाले. नोव्हेंबरमध्ये आर्किटेक्चरसाठी निविदा मागविण्याचे ठरले. त्यानंतर नोव्हेंबर 2008 ते मार्च 2012 या 4 वर्षाच्या काळात कोणतीही पावले उचलण्यात आलेली नाहीत. संकल्पचित्र, आर्किटेक्चरच्या बाबतीत ॲग्रीमेंट करार देखील शासनाला करता आला नाही. एवढी कार्यतत्परता, कळकळ आणि तळमळ या शासनाने दाखविलेली आहे.

त्यानंतर या स्मारकाच्या बाबतीत केन्द्रीय पर्यावरण खात्याने विरोध केला असे सांगितले गेले. परंतु प्रत्यक्षात तसे काही नाही. योग्य त-हेने प्रस्ताव पाठविला तर कोणती अडचण येईल असे मला वाटत नाही, आणि समजा अडचणी येत असल्या तरी शेवटी महाराष्ट्र कुणाचा आहे ? छत्रपती शिवरायांचा हा महाराष्ट्र आहे, हा महाराष्ट्र तुमचा-आमचा आहे. या मध्ये अडचणी येत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

असतील तर त्या मोडून काढल्या पाहिजेत. त्यासाठी अनेक पर्याय आणि मार्ग आपल्याकडे आहेत, त्याचा अवलंब तुम्ही करा. तुम्ही सर्व पक्षाच्या लोकांना दिल्लीला घेऊन जा. सर्वांना सोबत घ्या आणि ठामपणे सांगा की हे स्मारक व्हायलाच पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहे. त्याच्या स्मारकाच्या बाबतीत कोणी आड येत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. या आमच्या भावना तुम्ही दिल्लीला जाऊन सांगा. पण तुम्ही त्या सांगत नाही. साधे आर्किटेक्चरचे ॲग्रीमेंट करायला 4 वर्षे लागत असतील तर स्मारक उभे राहाण्यासाठी यापुढे आणखी किती वर्षे लागतील याची कल्पनाच न केलेली बरी.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

विशेष म्हणजे महाराष्ट्रात कॉंग्रेस-राष्ट्रवादी पक्षाचे आघाडीचे सरकार आहे आणि केंद्रात देखील आघाडीचे राज्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यास कोठे अडचण येत आहे, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याकामी आपण मागे पुढे का पाहतो आहोत? डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे स्मारक उभारण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळ नेले, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकासंदर्भात जी भूमिका घेतली त्याबाबतीत महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेला आनंद वाटला. परंतु आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी दिल्ली येथे जाऊ शकत नाही, तुम्हाला कोणी अडविले आहे काय, याबाबतीत तुम्हाला कोण थांबवित आहे, तुम्ही कशासाठी थांबता आहात? आमच्या मनात प्रश्न निर्माण होतो आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यास खरोखर अडचण आहे की आपल्याच मनात ती गोष्ट करावयाची नाही, या गोष्टीचा विचार सगळयांना पडावयास लागला आहे. म्हणून काही गोष्टी मात्र निश्चितपणाने ठरविण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना मांडल्या आहेत. त्या सूचनांचे स्वागत केले पाहिजे, त्या सूचनांचा विचार केला गेला पाहिजे. जेट्टी बांधता येतील, पोर्ट बांधता येईल, सी-लिंक बांधता येतील, रस्ते बांधता येतील अशा अनेक गोष्टी करता येतील. फक्त त्या ठिकाणी कमर्शियल उपयोग करता येणार नाही. कर्मर्शियल पर्पजसाठी पर्यावरण विभागाची आडकाठी आहे. एवढाच त्यात महत्वाचा भाग आहे. पूर्वी पर्यावरण विभागाचे नोटिफिकेशन होते, परंतु 2011 मध्ये पर्यावरण विभागाने जे नोटिफिकेशन काढलेले आहे. त्यात नवीन अट टाकलेली आहे. पर्यावरण विभागाने 2011 मध्ये जे नोटिफिकेशन काढलेले आहे, त्यातून काही तरी मार्ग निघू शकतो.

महोदय, याबाबतीत आपली एवढी अनास्था आहे की, आपल्याला नक्की काय करावयाचे आहे याचीच माहिती नाही. हे कोण करीत आहे याचा देखील ताळमेळ लागत नाही. हे काम सामान्य प्रशासन विभाग करीत आहे, सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे की पर्यावरण विभाग करीत आहे, याचा तरी निश्चितपणे ताळमेळ लागला पाहिजे. तो ताळमेळ अजूनही लागत नाही.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी.)

श्री.विनायक मेटे...

आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधीचा आराखडा किती दिवसात पूर्ण करणार आहात, याबाबतचे आपण काही नियोजन केलेले आहे काय? आपणाकडून तसे नियोजन केले गेलेले दिसून येत नाही. मी या निमित्ताने किमान माननीय मुख्यमंत्र्यांकडून आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा व्यक्त करतो की, आपण सभागृहात या विषयाच्या बाबतीत काय बोलणार आहात याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील जनता आपल्याकडे आकांक्षेने बघते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या बाबतीत न्याय देणार आहात की, पूर्वीप्रमाणेच अन्याय करणारी भूमिका घेणार आहात या गोष्टीकडे महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या बाबतीत ठोस निर्णय घेऊन कार्यक्रम तयार करावा अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. हे स्मारक उभे करण्यासाठी ज्या ज्या परवानग्या आवश्यक आहेत, त्याबाबतची माहिती अधिकारी आपल्याला सांगतील. हे स्मारक उभे करण्यासाठी कोणकोणत्या परवानग्या मिळालेल्या आहेत, कोणकोणत्या परवानग्या मिळविणे आवश्यक आहे,

श्री.दिवाकर रावते : छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे अशी शासकीय अधिकाऱ्यांची इच्छा नाही..

श्री. विनायक मेटे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, अधिकाऱ्यांना व्यवस्थितपणे काम सांगितले तर ते निश्चितपणे करतात. परंतु प्रश्न इच्छाशक्तीचा आहे. आपल्यामध्ये सदर काम करण्याविषयी इच्छाशक्ती नाही. या कामाच्या बाबतीत शासनाची इच्छाशक्ती काय आहे याबाबतची माहिती जाणून घ्यावयाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे रहावे याबद्दल कोणाचेच दुमत नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी नम्रपणे विनंती आहे की, कृतीशील कार्यक्रम जाहीर करावा....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

तरच तुम्हाला महाराष्ट्र मानेल. अन्यथा महाराष्ट्र तुम्हाला मानणार नाही, माफ सुध्दा करणार नाही. तुम्ही कशासाठी भिता? छत्रपती हे कोणत्या जातीचे, धर्माचे, वर्गाचे नव्हते. कोणीतरी काही चुकीचे बोलले असेल तर त्याची आपण पर्वा करण्याचे कारण नाही. या संदर्भात कृतीशील कार्यक्रम जाहीर झालाच पाहिजे. या स्मारकासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या केव्हा मिळविणार आहात? या अर्थसंकल्पामध्ये या स्मारकासाठी किती तरतूद करणार आहात?

सभापती महोदय, या स्मारकासाठी आर्किटेक्ट नेमले गेले आहेत त्यांच्याकडून जे संकल्पचित्र तयार करण्यात आले आहे ते अगदी मॉडर्न स्वरुपाचे आहे. आपण काय बनवित आहोत याचे भान त्यांनी बाळगलेले नाही. ज्यांनी हे मॉडेल मंजूर केले त्यांना सुध्दा याचे भान नाही. मी यापूर्वी सुध्दा स्पष्टपणे सांगितले होते की, मॉडर्नायझेशन करण्याची गरज नाही. ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे जे ऑपेराहाऊस बांधण्यात आले आहे तशा पध्दतीने तुम्ही छत्रपतींना दाखविणार आहात का? फिरते रेस्टॉरन्ट, वॉटर स्पोर्ट आदी सुविधा निर्माण करणे म्हणजे स्मारक होत नाही. ज्यांना लिहिता येत नाही, ज्यांना वाचता येत नाही अशा माणसाने बघितले तरी त्यांना छत्रपती कळून येतील असे स्मारक उभे राहिले पाहिजे. स्मारक म्हणजे केवळ पुतळा उभारणे नाही. छत्रपतींच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन चित्र त्या ठिकाणी असले पाहिजे. त्यांच्या जीवनातील काही महत्वाचे प्रसंग त्या ठिकाणी असले पाहिजेत. गड, किल्ले, दूर्ग तेथे पाहता आले पाहिजेत. तरच ते स्मारक आहे असे म्हणता येईल. नाही तर तुम्ही काय सहलीचे ठिकाण दाखविणार आहात?

सभापती महोदय, मला आठवते, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी लंडनमधील शेक्सपिअरच्या संदर्भातील एक मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला होता. शेक्सपिअरचे लंडनमधील घर जपण्याचे काम केले गेले आहे. एवढेच नव्हे तर त्या घरासमोरील झाडाची देखील उत्कृष्टपणे निगा राखली जात आहे. परंतु आपण काय करतो? मी यापूर्वी अनेकदा लेखी स्वरुपात मागणी केली आहे. गड, किल्ले आणि दूर्ग यांचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन बांधण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. केंद्र सरकारकडून करोडो रुपयांचा निधी राज्य शासनांना उपलब्ध होतो. राजस्थान सरकार प्रत्येक वर्षी मोठया प्रमाणात केंद्राचा निधी उपलब्ध करुन घेत असते. गड आणि किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्राला किती निधी प्राप्त होतो? आपल्या राज्यात गड आणि किल्ल्यांचे जतन करण्यामध्ये फार मोठी अनास्था दिसून येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

सभापती महोदय, या सगळया गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली पाहिजे. सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांकडे मोठया प्रमाणात कामाचा भार असल्यामुळे स्वतंत्र अधिकारी नेमण्याची आवश्यकता आहे. ज्यांना छत्रपती माहिती आहेत, ज्यांना छत्रपतींबद्दल आस्था आहे, प्रेम आणि जिव्हाळा आहे अशाच अधिकाऱ्याकडे या स्मारकाचे काम सोपविले पाहिजे. त्यांनीच सर्व परवानग्या मिळविण्याचे काम केले पाहिजे. संकल्पचित्राचा पाठपुरावा करणे, ॲग्रीमेंट करणे, केंद्राकडे पाठपुरावा करणे असेल, शासनाला वा कॅबिनेटला माहिती देणे असेल या सर्व गोष्टी करण्यासाठी दोन-तीन स्वतंत्र अधिकारी नेमण्यात यावेत. आपण एखादा प्रकल्प करण्यासाठी काही जणांची टीम नेमतो.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

पण येथे तर टीमच नाही आणि टीम वर्क सुध्दा नाही. या स्मारकाची फाईल एक-एक महिना आणि दोन-दोन व तीन-तीन महिने एका एका विभागाकडे पडून असते, त्याचे कोणालाच काही पडलेले नाही. यासंदर्भात मी अनेक वेळा शासनाला पत्रे सुध्दा दिलेली आहेत व विनंती केली की यासंदर्भात एखादी बैठक घेऊन निर्णय घ्यावा पण तसे कधीच झाले नाही म्हणून मला अत्यंत खेद वाटतो. आपल्या राज्याच्या दैवताबद्दल शासनाला इतकी अनास्था असावी याचेच दु:ख वाटते. खरे तर शासनच हे करु शकते, दुसरे कोणीच करु शकत नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या सभागृहाच्या माध्यमातून राज्याला एक कृतीशील कार्यक्रम जाहीर करुन छत्रपतींबद्दल प्रेम असणाऱ्या राज्यातील सर्व शिवप्रेमींचे आशीर्वाद घ्या, तरच आपण निश्चितपणे पुढे जाल अन्यथा काळ कठीण आहे एवढे या निमित्ताने सांगतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल पुन्हा आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, शिवस्मारकासंबंधीच्या चर्चेच्या संदर्भात विधिमंडळाच्या दोन्ही सदनांच्या माध्यमातून राज्यभरातील शिवप्रेमींच्या एकवटलेल्या भावनांचे मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने मी या चर्चेकडे पाहत आहे. या चर्चेच्या निमित्ताने कोणावरही मला दोषारोप करावयाचे नाहीत तर आपण सर्वांनी मिळून हे स्मारक झाले पाहिजे या विचाराचा मी आहे. आम्ही काय केले आणि तुम्ही काय केले ही अवास्तव चर्चा सुध्दा या सभागृहात झाली. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देणार आहे, कारण त्यांनी समुद्र उसळल्याप्रमाणे या शिवस्मारकाबद्दलच्या भावनांना संधी दिली. यात चूक काय आणि बरोबर काय हा विषय नाही. पण एका वर्तमानपत्राच्या वार्तालापात माननीय मुख्यमंत्री उपस्थित असताना कोणत्या तरी वर्तमानपत्राच्या शिवप्रेमी पत्रकाराने अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला हा प्रश्न त्यांना विचारला होता. त्या प्रश्नाला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे हे सांगण्याचा, उत्तर देण्याचा प्रयत्न केला की, पर्यावरण खात्याच्या अधिकाऱ्यांनी शिवस्मारकाची नस्ती बंद करुन ठेवलेली आहे. तेथूनच हा विषय सुरु झालेला आहे. त्यांच्या शेजारीच माननीय मुख्य मंत्री सुध्दा उपस्थित होते. वास्तविक त्यांना जर ही गोष्ट माहिती होती तर त्यांनीच सांगायला हवे होते पण त्यांनी सांगितले नाही.

अधिवेशनाच्या सुरुवातीला संपूर्ण राज्यासंबंधी कोणत्या मुद्यावर उभे रहावयाचे याबाबतची रणनिती आखत असताना शासनाच्या संदर्भातच शिवस्मारकाबाबत असा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे आता काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. पर्यावरण खात्याच्या प्रशासकीय कार्य पध्दतीवर शिवस्मारक अडकलेले आहे ही बाब जनतेसमोर आली म्हणून संधीचा फायदा घेऊन एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढण्याचा प्रयत्न केला जातो आणि या चर्चेला गालबोट लावून मिळालेल्या या संधीमुळे आपण हे दाखवितो की, छत्रपती कोण होते आणि आपण किती खुजे आहोत ? सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी आपले भाषण थोडक्यात आटोपते घेतले. वास्तविक शिवस्मारक व्हावे यासाठी त्यांनी जेवढे प्रयत्न केले तेवढा वेळ जर त्यांनी अधिक भाषण केले असते तर अधिक बरे झाले असते. कारण त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी शिवस्मारकासंबंधीचे होर्डिंग्ज लावलेले आहेत. आम्हाला प्रश्न पडत होता की, स्मारक तर समुद्रात होणार आहे आणि मेटे साहेब या ठिकाणी होर्डिंग्ज का लावत आहेत .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक उभे रहावे यासाठी आमच्यातलाच एक कार्यकर्ता झपाटल्यासारखे काम करतो हा कौतुकाचा भाग आहे. आम्ही आमच्या भावना मांडत असतांना या विषयाच्या संदर्भातील टीकेचा रोख निश्चितपणे सरकारवर राहणारच आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी एक सुंदर वाक्य वापरले आहे त्याचा मी उल्लेख करणार आहे. आपण असे वाक्य वापरले होते की, "शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी सरकारला खरोखरच अडचण आहे की, स्मारक उभे करण्याचा आपला विचार नाही." सरकारच्या इच्छाशक्तीवर शंका निर्माण व्हावी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करावयाचे आहे की, नाही हे आता सरकारनेच सांगावयाचे आहे हा आजच्या चर्चेचा खरा विषय आहे. आपण आपल्या भाषणात या सरकारवर शापवाणी देखील उच्चारलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी "सामना" वृत्तपत्राच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. स्मारकाचे काम तुम्ही आम्ही करु शकत नाही तर शिवाजी महाराजांचे स्मारक सरकारच उभारु शकते. स्मारकाच्या संदर्भात आपण सरकारच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. सरकारने इतर 10 कामे बंद केली आणि शिवस्मारकासाठी निधी वापरला तर जी कामे निधी अभावी बंद पडली त्याला निधी मिळावा अशी मागणी आम्ही करणार नाही.

सभापती महोदय, प्रत्येक वेळेला शिवाजी महाराज हे सर्वधर्मसमभाव मानणारे होते हे सांगण्याची काही गरज आहे काय ? शिवाजी महाराजांनी आपले पूर्ण आयुष्य मोगली सम्राटांशी, विजापूरच्या सम्राटांशी तसेच या देशावर चाल करुन आलेल्यांविरुध्द लढण्यात खर्ची घातले होते. त्यांनी आपले आयुष्य मुसलमानांच्या विरुध्द खर्ची घातले नाही परंतु त्यावेळेस परकीय आक्रमण करणारे मुस्लीम होते त्याला तुम्ही आम्ही काय करणार आहोत ? शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये सर्व समाजाचे सैनिक होते हा त्यांच्या चारीत्र्याचा उंचीचा विषय आहे.

सभापती महोदय, आजच्या सामन्यातील अग्रलेखामध्ये कवीराज भूषण यांनी शिवाजी महाराजांबद्ल जे काव्य लिहिले आहे त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कवीराज भूषण यांनी म्हटले आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

"कासी हुकी कला जाती
मथुरा मसीत होती ।
सिवाजी न होतो
सुनति होत सबकी" ॥

सभापती महोदय, आपण शिवाजी महाराजांच्या संदर्भात शिवाजी महाराज सर्वधर्म समभाव मानणारे होते असे म्हणतो परंतु सर्व धर्म समभाव हा त्या वेळचा विषय नव्हता तर स्वातंत्र्यानंतर आपल्या घटने प्रमाणे हा शब्द आलेला आहे. आजच्या सामना वृत्तपत्राने आपल्या रोख ठोक पध्दतीने म्हटले आहे की, शिवस्मारकाच्या नावाखाली काँग्रेस-राष्ट्रवादीच्या मंत्र्या-संत्र्यांनी जीवाची मुंबई केली व आता शिवस्मारक होणार म्हणजे होणारच अशा गर्जना केल्या असल्या तरी नेहमी प्रमाणे केंद्रीय पर्यावरण खात्याने शिवस्मारकाच्या वाटेत कोलदांडा घातला आहे. महाराष्ट्रातील शिवरायांच्या स्मारकास अडथळे निर्माण करण्याची हिंमत होतेच कशी ? आणि कोणते ते तुमचे पर्यावरण खाते ? अरबी समुद्र त्यांच्या बापाचा आहे काय ? पण महाराष्ट्राचे काँग्रेसी राज्यकर्ते पडले पुचाट आणि शेळपट..... समुद्रात शिवरायांचे स्मारक झाल्याने पर्यावरणास असे कोणते धोके निर्माण होणार आहेत हे त्या बिनमेंदूच्या पर्यावरणवाल्यांनाच माहीत. जगभरात अशा थोर पुरुषांची स्मारके समुद्रात उभी राहिलीच आहेत. अमेरिकेच्या समुद्रात स्वातंत्र्यदेवतेचे अतिविराट स्मारक उभे आहे व तिचे दर्शन घेण्यासाठी जगभरातील पर्यटक तेथे येतच असतात. केरळ, तामीळनाडूच्या समुद्रातही स्मारके उभी झाली आहेत. मग मुंबईच्या अरबी समुद्रात शिवस्मारक उभे राहिल्याने हा समुद्र मागे हटणार आहे की समुद्रच आटणार आहे ? याच समुद्रात भराव टाकून, समुद्र बुजवून जे सर्व "बॅकबे"चे भूखंड काँग्रेसवाल्यानी लुटले तेव्हा कुठे गेला होता पर्यावरणवाल्यांचा धर्म ? पण शिवस्मारकाची घोषणा करुन ते असे अपमानास्पद रित्या लटकून राहणे हा महाराष्ट्रच्या अस्मितेवरचा घाला आहे व त्यास विरोध करणे गरजेचे आहे. शिवस्मारकाचा घोळ घालून ते रखडवत ठेवणे ही बाब असह्य आहे. जर पर्यावरण खाते असे आडवे येणारच होते तर मग घोषणा करण्याआधी सर्व परवानग्या घेणे गरजेचे होते.....विधिमंडळात शिवस्मारकासाठी मावळयांनी "हरहर महादेव"चा गजर करीत हाती थर्माकोलच्या तलवारी

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

उगारल्या, पण पर्यावरण खात्याला थर्माकोलच्या तलवारीची भाषा कळत नसेल तर महाराष्ट्राच्या म्यानात भवानी तलवार आहेच हे त्यांना दाखून द्यावे लागेल."

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अधिकाऱ्यांना दटावून सांगणारा सामनातील अग्रलेख आहे.

श्री.अजितदादा पवार काय म्हणाले ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. त्यांच्याकडे जी काही माहिती असेल त्या प्रमाणे ते म्हणाले असतील. दोन्ही सदनामध्ये सीआरझेड-बी, सीआरझेड-2 संबंधी चर्चा झाली. त्यावर तांत्रिक चर्चा केली. आपण कशाला त्यासंबंधी चर्चा करायची. शिव स्मारक अरबी समुद्रात झाले पाहिजे. ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. तुमचे कोणतेही कायदे आडवे येता कामा नयेत असे तुम्ही आणि आम्ही सर्वांनी ठणकावून सांगितले पाहिजे. यासाठी दिल्लीला जाण्याची काहीही गरज नाही. मला तर असे वाटते की, यासंबंधी सदनाने ठराव केला पाहिजे. हे सदन माननीय मुख्यमंत्र्यांच्या पाठीमागे एकमुखाने उभे आहे. या शिव स्मारकाला मान्यता मिळाली नाही तर दोन्ही सदनातील सर्व सन्माननीय सदस्य राजीनामे देतील असा कडवट पवित्रा घेऊन आपण उभे राहिलो पाहिजे. येथे कशासाठी एकमेकांची उणीदुणी काढायची ? शिव स्मारकाची टिंगल-टवाळी करण्याची भूमिका आपण घेता कामा नये.

काल सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर म्हणाले त्याबद्दल वाईट वाटले. प्रत्येकाचे शिवप्रेम किती आहे हे फूटपट्टीने मोजता येत नाही. छत्रपतींबद्दल ज्याला प्रेम आहे, ते शिवाजी महाराजांच्या स्मृतीसाठी, आठवणीसाठी, रगारगामध्ये छत्रपती खेळतो आहे हे दाखविण्यासाठी रायगडाची परिक्रमा करतात. हे काम फार कठीण असते. यासाठी 200-400 लोक जातात. म्हणजे तेवढेच शिवप्रेमी आहेत. असे कधी नसते. रायगड चढणे कठीण आहे. मी एका महिन्यात सहा वेळा रायगड चढलो. त्यावेळी मला कळले की रायगड चढणे किती कठीण आहे. रायगडावर वयोवृद्ध जाऊ शकत नव्हते. अनेकांची इच्छा असून देखील त्यांना जाता येत नव्हते. आता तेथे रोप-वे ची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे आता अबालवृद्ध रायगड पाहू शकतात. त्यावेळी देखील बोंब झाली. टीका झाली. ज्यांना चालणेही मुश्कील आहेत असे वृद्ध त्या गडावर जाऊन शिवरायांचा रायगड पाहू शकतात. महाराजांची राजधानी पाहू शकतात. हा गौरवाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विचार मांडलेत ते बरे केले. त्या निमित्ताने काही गोष्ट सांगता येतात. आपण असे म्हणालात "श्री.रावते साहेब आपण मराठीवर भरपूर वेळ बोलता, श्री शिवाजी महाराजांवर आत्मियतेने बोलता म्हणून मी आपल्याला विनंती करणार आहे. विमानतळावर ज्या पुतळ्याचे अनावरण दोन दिग्गजांच्या हस्ते करण्यात आले त्या

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी माननीय सभापती)

श्री.दिवाकर रावते...

पुतळ्याची सध्याची स्थिती, श्री.रावते साहेब आपण बघून यावी. झोपडपट्टीतील मुले आपल्या सकळाच्या क्रिया-कर्मासाठी जातात तेथे एकीकडे तो पुतळा ठेवण्यात आला आहे. जीव्हीके कंपनीनीला दोन एअर स्टे बांधायचे होते म्हणून तो पुतळा हलविण्याबाबतचा प्रस्ताव आला होता."

श्री.किरण पावसकर, आपण तेथे वर्षानुवर्षे काम करीत होता. तेथूनच तुमचे कर्तृत्व निर्माण झाले. ते निश्चित कौतुकाचे आहे. त्यामुळे आपल्याला तेथील इंचन - इंच माहिती आहे. तेवढी माहिती मला नाही. शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्यात येणार आहे असे समजल्यानंतर आंदोलन करण्यात आले. त्यावेळी आम्ही रस्त्यावर उतरलो तेव्हा मोजून 37 पोलिसांच्या गराड्यात एकटा दिवाकर रावते सापडला होता. हा फोटो देखील आहे. आम्हाला आंदोलन करायचे होते ते केले. त्यामुळे स्मारक उभे राहिले. त्याचे श्रेय घेण्याचा प्रश्नच येत नाही. शिवसेनाप्रमुखांनी आदेश दिल्यानंतर त्यावेळच्या आंदोलनात तुम्ही आम्ही सर्वजण होतो. तेव्हा आपण शिवसैनिक होता. तुम्ही आपल्या भाषणात पुढे असे म्हटले आहे की, "जीव्हीके कंपनीनीला दोन एअर स्टे बांधायचे होते म्हणून तो पुतळा हलविण्याबाबतचा प्रस्ताव आला होता. मी तेथे असताना युनियनच्या माध्यमातून सांगितले होते की, ज्यावेळी आपण हा पुतळा हलवाल त्यावेळी संपूर्ण एअरपोर्ट बंद ठेवण्यात येईल. माझा प्रश्न एवढाच आहे की, आपण एवढे आत्मीयतेने, पोटतिडकीने बोलत आहात. आज अशा ठिकाणी पुतळा गेला आहे की,..... आज जीव्हीके कंपनीने तोंडात काय कोंबून ठेवले आहे..... शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घातल्याशिवाय ज्यांच्या भाषणाला सुरूवात होत नाही, असे लोक आज तो पुतळा एका कोपऱ्यात उभा असताना त्यावर काहीच का बोलत नाही ? जीव्हीके सारख्या एका मोठ्या कंपनीने असे काय तोंडात कोंबले आहे, त्यामुळे आपल्याला काहीच बोलता येत नाही ?

यानंतर सौ.रणदिवे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मला आवाहन केले, बरे वाटले. आम्ही ते पाहून येऊ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची जर अशा प्रकारे अवहेलना होत असेल तर आपण तेथे जाऊन पाहून येऊ. काल मी तेथे गेलो होतो. त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिमाखामध्ये सुंदर पध्दतीने उभा आहे आणि त्याचे हे छायाचित्र असून ते मी मुद्दाम सभागृहाला दाखवित आहे.

(यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सदरहू छायाचित्र सभागृहामध्ये दाखविले.)

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून हे छायाचित्र .....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझी याला हरकत आहे.याठिकाणी माझ्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे म्हणून मी सांगत आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जे भाषण केले तेच मी सांगितले आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हा पुतळा सहार पोलीस स्टेशनच्या समोरच्या भागामध्ये दिमाखाने उभा होता आणि या पुतळ्याचे अनावरण माजी माननीय पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी आणि माननीय शिवसेना प्रमुख यांच्या हस्ते झाले होते. तसेच त्यावेळी मुंबई विमानतळाला शिवछत्रपतींचे नाव देण्यात आले होते तो हा पुतळा आहे. आता ते फोटोग्राफ दाखविण्यात आले. मात्र मी काल या पुतळ्याच्या सध्याच्या परिस्थितीबाबत सदनामध्ये जे बोललो, ती सत्य परिस्थिती आहे. तसेच त्याठिकाणी एक ब्रिज असून त्याच्या बाजूला तो ठेवलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे फोटोच्या माध्यमातून जो पुतळा दाखवित आहेत, तो कदाचित जुहू येथील पामग्रोव्ह हॉटेलच्या बाजूचा असेल.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तसे काही नाही. हा पुतळा तोच आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी. सन्माननीय सदस्य पुतळ्याचे फोटो दाखवित आहेत. पण मी ज्या पुतळ्याबाबत बोललो होतो त्याबाबत सांगावयाचे तर ज्या एअर पोर्टला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आलेले आहे, तेथे भव्य दिव्य अशा प्रकारचा पुतळा बसविण्यात आला होता. परंतु आता तो पुतळा जेथे ठेवण्यात आलेला आहे त्याबाबत सांगावयाचे तर एअरपोर्ट उजव्या बाजूला असून मध्ये एक रस्ता आहे आणि त्यावर एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

ब्रिज आहे आणि त्याच्या पलीकडे सदरहू पुतळा नेण्यात आलेला असून तो एका कोपऱ्यामध्ये आहे. तसेच मी पुन्हा सांगत आहे की, ज्याठिकाणी सकाळी लहान मुले किंवा झोपडपट्टीतील मुले विधीसाठी जातात त्या बाजूला पुतळा आहे. हा पुतळा हलविताना आपल्या सरकारला आणि तेथील युनियनला जी.व्ही.के.ने सांगितले होते की, सध्या तेथे जो पुतळा आहे त्याच्यापेक्षा चांगल्या पध्दतीचा, मोठ्या स्वरुपामध्ये पुतळा उभारण्यात येईल, जेणेकरुन ते एक चांगल्या प्रकारचे स्मारक ठरेल. तसेच आम्ही त्याठिकाणी शिवाजी महाराजांवरील असंख्य पुस्तके देखील ठेवणार आहोत अशा प्रकारच्या वल्गना करण्यात आल्या होत्या आणि प्रत्यक्षात तसे न करता तेथे सदरहू पुतळा अत्यंत वाईट पध्दतीने ठेवण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तेथील पुतळ्याबाबत बोलले. पण मी याच्या पुढचे बोलत आहे. त्यामुळे आता मला पुढे बोलावयास द्यावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, ज्या प्रकारे . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पुढे बोलत आहे, त्यामुळे आता मला बोलू द्यावे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंबंधातील त्यांचे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी येथे शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या संबंधात फोटो आणले आहेत म्हणून मी सांगत आहे. ज्या पक्षाने, ज्या युनियनने असे सांगितले होते की, आम्ही काहीही झाले तरी हा पुतळा हलवू देणार नाही. पण प्रत्यक्षात हा पुतळा हलवला गेला असून तो वाईट ठिकाणी ठेवण्यात आला आहे आणि त्याठिकाणी सध्या पुतळ्याची जी परिस्थिती आहे ती अत्यंत वाईट आहे आणि मी ही बाब या सदनासमोर आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे, नजरेसमोर आणलेली आहे.

सभापती : याठिकाणी जी हरकत घेण्यात आली आहे, त्या बाबतीत मी संबंधित रेकॉर्ड पहातो, तसेच याबाबत माहितीही घेतो आणि त्या नंतर याबाबतीत निर्णय देतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, धन्यवाद.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचा आदरानेच उल्लेख केला. तसेच तुम्ही सांगितले ते बरे केले, त्यामुळे खुलासा करावयास मिळाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे मी म्हणालो. मी तेथे गेलो होतो आणि याठिकाणी जे फोटो आणलेले आहेत ते त्याच पुतळ्याचे आहेत. तेथे जी.व्ही.के.नावाची कंपनी आहे. तेथे त्यांचे 3 वॉचमन आहेत आणि तेथे कायम दोन पोलीस बसलेले असतात. मी त्यांना देखील विचारले. तसेच हे फोटो पाहिल्यानंतर कळेल की, आता पुतळ्याची जी जागा आहे त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी जे वर्णन केले, तसे काही नाही. प्रश्न असा आहे की, हा पुतळा तेथे नेण्यात आला आणि यासंदर्भात कोणी कोणाच्या तोंडात काय कोंबले हा कृपा करुन माझा विषय नाही.

श्री.किरण पावसकर (खाली बसून) : त्यामध्ये आपण नव्हता.

श्री.दिवाकर रावते : तो माझा विषयच नाही.

श्री.किरण पावसकर (खाली बसून) : त्याबाबत देखील मी पुढे बोललो.

श्री.दिवाकर रावते : आपण काय बोलला ते मी सांगितले. सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे सांगतो की, माननीय तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोकरावजी चव्हाण यांनी एक बैठक बोलविली होती आणि ती बैठक आदरणीय तत्कालीन केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांच्या आग्रहावरुन बोलाविली होती. कारण त्यांचा आग्रह होता. पण आता मी तेथे जाऊन पाहिले तर जेथे पुतळा होता, तेथे विमानतळाचे मोठे स्ट्रक्चरच उभे राहिलेले आहे आणि काल ते पहाण्यासाठी मी गेलो होतो नाहीतर माझा तेथे जाण्याचा काही संबंधच येत नाही. कारण आम्ही इंटरनॅशनल हवाई विमानतळाच्या ठिकाणी कशासाठी जाणार? जर कुठे जावयाचे झाले तर डोमेस्टीक विमानतळावर जातो. त्या विषयाबाबत झालेल्या बैठकीमध्ये सर्व पक्षांना बोलाविले होते आणि त्यावेळी राष्ट्रवादी पक्ष, काँग्रेस पक्ष, शिवसेना पक्ष आणि भाजप इ.सर्व पक्षांच्या बरोबर बैठक झाली. त्यावेळी सदरहू पुतळा हलविण्याच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. मग त्यासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी आदरणीय श्री.सुभाष देसाई हे पक्षाच्यावतीने सदरहू बैठकीला उपस्थित होते.

यानंतर श्री.अ.शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्यास आमचा विरोध आहे असे त्यांनी सांगितले. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहणार अशी कल्पना देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तेथून हलविल्यानंतर एक हेक्टरवर शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक कसे होणार याची माहिती त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना दिली. आदरणीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना देखील ती माहिती दिली.

आता जे भव्य स्मारक होणार आहे त्याठिकाणी हा पुतळा बसविणार नसून रायगडावर शिवाजी महाराजांचा सिंहासनाधिष्ठीत पुतळा आहे त्या धर्तीवर येथे पुतळा बसविणार असून तेथे शिवाजी महाराजांचे चरित्र दाखविणारे संग्रहालय करणार आहे असे सांगण्यात आले. भव्य स्मारक होईल आणि पुतळ्याचेही जतन होईल अशा प्रकारची चर्चा होती. सभापती महोदय, माझ्याकडे अवर सचिव, महाराष्ट्र शासन आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी काढलेले आदेश आहेत. त्यानुसार या पुतळ्याची व्यवस्था बघायची आहे. तेव्हा आमच्यामुळे पुतळ्याची अवहेलना होत आहे अशाप्रकारचा तो विषय होता. आम्ही विरोध केला नसता तर असे झाले नसते. सर्व पक्षीय बैठकीमध्ये जे दाखविले, शिवसेना प्रमुखांना जे दाखविले ते स्मारक आणि एक हेक्टरवर शिवाजी महाराजांचा अश्वारुढ नव्हे तर सिंहासनाधिष्ठीत पुतळा आणि शिवाजी महाराजांचे पूर्ण चरित्र दाखविणारे संग्रहालय अशा प्रकारची संकल्पना त्यांनी सांगितलेली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे वारंवार एक हेक्टरचा उल्लेख करीत आहेत. एक हेक्टरचा अर्थ अडीच एकर जागा होते. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जो आक्षेप घेतला आणि मी माझ्या भाषणात देखील उल्लेख केला होता की, त्यावेळी एक पक्ष म्हणून आपण जी भूमिका घेतली होती त्या भूमिकेचे पुढे काय झाले असा आमचा सवाल होता. आपला उद्देश पुतळा हलवून तेथे शिवस्मारक होणे आहे किंवा तो पुतळा बसविणे आहे तर जागा हा महत्वाचा विषय नसून स्मारक होणे हे महत्वाचे आहे आणि ही बाब दोन्ही बाजूला लागू होते. तेथे सुध्दा लागू होते आणि अरबी समुद्रात पुतळा उभारण्याच्या बाबतीत सुध्दा लागू होते याचा आम्ही उल्लेख केला होता.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार असेल तर ते आपणास नको आहे काय ? ही बैठक दिनांक 24 ऑगस्ट 2010 रोजी झाली होती. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण, केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल, सर्व पक्षाचे गट नेते यांची सह्याद्री येथे बैठक झाली होती. त्यामध्ये भव्य स्मारकाबाबत सांगण्यात आले होते. शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा हा वेगळा विषय आहे त्या पुतळ्याची देखभाल ते करणार आहेच. तेव्हा कोणी कोणाच्या तोडांत काय कोंबले हा विषय वेगळा आहे.

सभापती महोदय, या संदर्भात अनेकवेळा सदनामध्ये प्रश्न विचारले गेले त्यावेळी सांगितले गेले की आम्ही करीत आहोत. कोणती ती कोरीयन कंपनी माहीत नाही. आमचे विनायक मेटे अश्रू गाळायचे बाकी राहिले होते. आपण जे करुन आणलेले आहे ते शिवाजी महाराजांचे स्मारक वाटत नाही, ते आता मॉर्डनाईज झाले, शिवाजी महाराज मॉर्डनाईज कसे दाखवावयाचे असे ते सर्व सांगत होते. त्यावेळी दादा आपण उपस्थित नव्हता. आपण भलतेच काही तरी करुन आणले असे ते सांगत होते. तेव्हा नक्की स्मारक कसे होणार आहे ते आपण सायंकाळी त्यांना समजवावे. अन्यथा पुढील दोन वर्षे ते आपणास असेच सतावत राहतील. विरोधी पक्षाने पाठपुरावा करणे एवढेच विरोधी पक्षाच्या हातात आहे आणि ते काम आम्ही येथे सातत्याने केलेले आहे. सर्व सदस्यांनी ते केलेले आहे. खासकरुन सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी जाहीर धन्यवाद दिले. आमच्या पक्षाच्या भावना दैनिक "सामना"मध्ये अग्रलेखातून आलेल्याच आहेत. त्यातील उल्लेख मी वाचूनही दाखविला.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . .

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यामध्ये जे अधिकारी अडथळे निर्माण करीत असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाविषयी आम्हाला या ठिकाणी चर्चा करावयाला लागणे ही आंनदाची बाब आहे अशातला भाग नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आहे की नाही याबाबत या सदनात चर्चा करावी लागणे हे भूषणावह नाही. म्हणून ही परिस्थिती ज्यांनी निर्माण केली त्यांच्या संदर्भात शासन नक्की कोणती कारवाई करणार आहे हा प्रश्न आहे. ती नस्ती बंद केलेली आहे अशा प्रकारचे भाष्य विधानसभेमध्ये करण्यात आलेले आहे असे मी वाचलेले आहे म्हणून मला माहीत आहे अन्यथा माननीय मुख्यमंत्री या संदर्भात खुलासा करतील. दादा, आम्ही तुमचे अभिनंदन केले. समुद्र जसा उसळून वर यावा तशा प्रकारच्या शिवस्मारका प्रतीच्या महाराष्ट्राच्या आणि या सदनाच्या भावना उसळून वर आलेल्या आहेत. मी आपले अभिनंदन केलेले आहे. माझे ते अभिनंदन वाया जाऊ देऊ नका. हे स्मारक उभे करण्याच्या संदर्भातील अटी आणि शर्ती सगळया पूर्ण झालेल्या असून या कामाला सुरुवात करण्यात येत आहे अशा प्रकारचे निवेदन आपण या महाराष्ट्राला आणि या महाराष्ट्रातील शिवप्रेमी जनतेला कधी सांगणार आहात? हे वेळेच्या मर्यादेत सांगितले तर या चर्चेला अर्थ आहे नाही तर परत "नेमेची येतो मग पावसाळा," मग आम्ही छत्र्या घेऊन तुम्हाला शोधत फिरायचे अशी आमची अवस्था करु नका.

सभापती महोदय, काल विजयोत्सव साजरा करीत असताना त्या ठिकाणी निर्मिती सावंत आणि पॅडी यांनी एक हास्यनाटय सादर केले त्यातील एक वाक्य फार भयानक होते ते वाक्य मी या ठिकाणी सांगणार आहे. ते वाक्य असे होते की, "दिल्लीचे नाक कापून महाराजांनी जलदूर्ग निर्माण केले आणि महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकासाठी आम्हाला मात्र दिल्लीपुढे नाक घासावे लागत आहे" असे ते ज्यावेळी बोलले त्यावेळी तुम्ही काय आणि आम्ही काय, महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस शिवप्रेमी आहे ते आपल्याला लौकिकास्पद आहे असे वाटत नाही. शेवटी जाता जाता मी एक सांगू इच्छितो. अण्णा म्हणजे आमचे श्री. नवले साहेब. आपण सर्व शिवसैनिक जय भवानी, जय शिवाजी करत वाढलो. हरहर महादेव हा छत्रपतींचा मंत्र होता. जय भवानी, जय शिवाजी हा शिवसैनिकांचा लढण्याचा मंत्र होता, अन्यायाला तोंड देण्याचा मंत्र होता तो आजही आहे. छत्रपतींच्या काळामध्ये हरहर महादेवाच्या घोषणा करत गनिमी काव्याने छत्रपतींनी अनेकांना

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . .

जेरीस आणले पण आपलेच आप्तेष्ट सुध्दा त्याचा वापर करुन छत्रपतीच्या सैन्यालाही जेरीस आणणारे खंडोजी खोपडे निघाले म्हणून त्यांचे कौतुक करावयाचे का? त्यांची निर्भत्सना करावयाची आणि छत्रपतींनी जी विजयाची ललकारी दिली त्याच्या कौतुकाची उभारी घेऊन, त्यांची स्फूर्ती घ्यावयाची असते. आजही आमचा तो मूलमंत्र आहे. जय भवानी, जय शिवाजी. त्यामुळे आमच्या मनगटात ताकद येते, स्फूर्ती येते आणि त्यातून आमच्यात लढण्याची हिंमत येते. पण त्यातूनही कोणी अवदसा निघाला असेल, तो तुम्हाला माहीत असेल, तुमचा अनुभव असेल तर अशा अवदशांकरिता हा पक्ष नाही आणि घोषणा पण नाही. ती पवित्र घोषणा आमच्या आदरणीय शिवसेना प्रमुखांनी आमच्या मनगटात सळसळणाऱ्या रक्ताकरिता दिलेली आहे. अन्यायाला तोंड देत असताना तुमच्यामध्येही ती राहो. कारण आपण त्या मुशीतून आलेले आहोत. म्हणून निर्भत्सना करताना आपण ज्याच्याकडून मोठे झालो त्यांची कधीही निर्भत्सना करु नका. आपण आईच्या उदराचा कधी अवमान करीत नाही. ते मातृत्व असते आणि म्हणून...

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, मी असे म्हणालो होतो की, जय शिवाजी, जय भवानी, टाका वर्गणी. अशा प्रकारे महाराष्ट्रात काही ठिकाणी मोठया प्रमाणात वसुली केलेली चालते. मी शिवसेनेमध्ये असतानाही चालत होती आणि दुर्दैवाने आजही ती चालते. महाराष्ट्राची ही संस्कृती नाही, मी फक्त त्याचा संदर्भ दिला होता. सन्माननीय सदस्यांनी एवढे मनाला लावून घेऊ नये. पण जर असे घडत असेल तर आपण त्यांना स्पष्ट आदेश द्यावेत, निर्देश द्यावेत एवढेच मला त्यातून ध्वनित करावयाचे होते.

श्री. दिवाकर रावते : मी हेच ध्वनित करण्याकरिता या ठिकाणी सांगत होतो पण शेवटी आरसा बदलला की चेहरे बदलतात. मी एवढेच सांगितले की, असे जे अवदसे असतात त्यांच्याकरिता शिवसेना प्रमुखांनी ही घोषणा केलेली नाही. त्याकाळात छत्रपतींनाही दगा देणारे त्यावेळचे मराठे होते. म्हणून त्या मराठयांची अवहेलना करत छत्रपती पुढे गेले नाहीत तर स्वत:च्या मर्दुमकीवर पुढे गेलेले आहेत म्हणून जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणा देत आम्ही निष्ठावंत शिवसैनिक असेच पुढे जात राहू अशा कुडमुडया आणि तोडबाज लोकांची आम्ही पर्वा करणार नाही कधी सपाटयात आले तर आम्ही त्यांना आमच्या पध्दतीने साफ करु एवढेच या ठिकाणी सांगू इच्छितो. धन्यवाद.

----- यानंतर श्री. बरवड....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, छत्रपती शिवरायांच्या मुंबईत अरबी समुद्रामध्ये होणाऱ्या स्मारकाच्या निमित्ताने नियम 97 अन्वये या ठिकाणी जी चर्चा झाली त्या चर्चेला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी सुरुवात केली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, भाई जगताप, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, संजय केळकर, राजन तेली, भगवान साळुंके, विनायक मेटे, दिवाकर रावते साहेब यांनी अतिशय मोलाच्या सूचना केल्या, प्रश्न उपस्थित केले आणि त्यामध्ये काही टिकाटिप्पणी झाली. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, यामध्ये प्रत्येकाला, या सभागृहातील सदस्यांच्याच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व मराठी माणसांच्या मनामध्ये हे भव्य शिवस्मारक झाले पाहिजे याबद्दल एकमत आहे. त्याबद्दल तीव्र भावना आहेत आणि लवकरात लवकर अंतिम निर्णय होऊन कामाला सुरुवात झाली पाहिजे अशा भावना आहेत. शासनाच्या वतीने आणि माझ्या स्वत:च्या वतीने मी त्या सर्व भावनांशी मी समरस आहे. त्या भावनांचा मी आदर करतो.

सभापती महोदय, या प्रकल्पाच्या संदर्भात आतापर्यंत जो काही घटनाक्रम घडलेला आहे त्याबद्दल मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो. अर्थात नुसताच घटनाक्रम देऊन किंवा तारखा सांगून काम चालणार नाही परंतु हे काम पुढे नेण्याकरिता आपल्याला काय काय करावे लागणार आहे, यामध्ये सरकारने आतापर्यंत कशा पध्दतीची पावले टाकलेली आहेत याची माहिती मी देणार आहे. समज-गैरसमज खूप झालेले आहेत. सुरुवातीला 4 जुलै, 2005 साली तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन झाली आणि त्या समितीच्या अन्वये मुंबई लगतच्या अरबी समुद्रामध्ये शिवछत्रपतींचे भव्य स्मारक उभारण्याबद्दल निर्णय झाला. त्या स्मारकाच्या जागेचे निश्चित स्वरुप, स्मारकासाठी लागणारी आर्थिक तरतूद, स्मारकाची उभारणी, त्याची कालमर्यादा, त्या ठिकाणी कोणी काम करावयाचे, त्याचा अधिकार वगैरे ठरविण्याकरिता उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आणि त्या स्मारकाची तांत्रिक रुपरेषा ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दुसरी एक समिती नेमण्याचा निर्णय झाला. उच्चस्तरीय समितीमध्ये 28 ऑक्टोबर, 2005 रोजी स्मारकाच्या जागेबद्दल विचारविनिमय करण्यात आला आणि समितीने 29 ऑक्टोबर, 2005 रोजी त्या ठिकाणी जाऊन संभाव्य जागेची पाहणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

केली. त्यातून अरबी समुद्रात मरीन ड्राईव्हच्या जवळची जागा सकृतदर्शनी निश्चित केली. या अनुषंगाने ऑगस्ट, 2006 मध्ये नेव्हल कमांडकडे संदर्भ करण्यात आला आणि त्यांचे अभिप्राय मागविण्यात आले. नेव्हल कमांडने सदर जागेबद्दल आक्षेप नसल्याचे कळविले. नेव्हीने आक्षेप नसल्याचे कळविल्यानंतर त्यामध्ये त्यांनी एकच सांगितले होते की, त्या ठिकाणी उच्च शक्तीची एक सबमरीन केबल खालून जाते, त्या ठिकाणी खोदकाम करु नये. त्या केबलपासून किमान 200 मीटर अंतरावर जे काही करावयाचे असेल ते करा असे नेव्हीने सांगितल्यानंतर त्याची नोंद घेण्यात आली. त्याचबरोबर मुंबई पोर्ट ट्रस्टकडून देखील ना हरकत मिळविण्याचा प्रयत्न झाला. या स्मारकाची ढोबळ रुपरेषा अशी की, हे स्मारक स्टॅच्यू ऑफ लिबर्टी पेक्षाही अधिक उंच असावे, जवळजवळ 309 फुट म्हणजे स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षा किमान एक मीटर अधिक उंच असावे, महाराजांचा पुतळा अश्वारूढ पुतळा असावा, एक आंतरराष्ट्रीय स्मारक व्हावे या दृष्टीने त्या ठिकाणी स्मारकाच्या परिसरामध्ये एक वस्तू संग्रहालय, महाराजांच्या विविध वस्तूंचे त्या ठिकाणी म्युझियमसारखे करावे, त्यामध्ये पत्रे असतील, महाराजांच्या वेळेला केलेली आवाहने असतील, अशा ऐतिहासिक संकल्पनांचा यामध्ये समावेश करावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

पुढे उपाहारगृह, पुस्तक विक्री केंद्र, ऑडिटोरियमची व्यवस्था करण्याची संकल्पना पुढे आली.

दिनांक 15.11.2008 रोजी स्पर्धात्मक बोली करण्यासाठी निविदा बोलविण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोलीच्या आधारे वास्तुशास्त्रज्ञांना बोलविले. त्यांच्याकडून संकल्पना चित्र व आराखडे मागविण्यात आले. त्यामध्ये एकूण 11 जणांनी निविदा भरल्या होत्या. त्यापैकी 5 संकल्पनांची शिफारस बोर्ड ऑफ ॲसेसरीने मुख्यमंत्री यांना केली. त्यामध्ये 5 जणांचे सादरीकरण करण्यात आले. त्यापैकी 3 संस्थांना शॉर्ट लिस्ट करण्यात आले. मे.पी.जी.पत्की ॲण्ड असोसिएट, मे.बेन्स्ले डिझाईन स्टुडिओ, थायलंड आणि त्यांच्याबरोबर मे.टीम वर्क आर्किटेक्ट,मुंबई अशी संयुक्त कंपनी तिसरे मे.नितीन परुळेकर या तीन कंपन्यांची छोटी यादी तयार करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने या तिन्ही संस्थांच्या आर्किटेक्टच्या संकल्पना व आराखडे पाहिले, त्यांचे सादरीकरण पाहिले. त्या सर्व संकल्पनांचा व आराखड्यांचा परीक्षण व अभ्यास करुन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मे.बेन्स्ले डिझाईन स्टुडिओ, थायलंड व मे.टीम वर्क आर्किटेक्ट, मुंबई या संयुक्त कंपनीला किंवा निविदाकरांची निवड करण्यात आली. अरबी समुद्रातील प्रस्तावित जागा ही मलबार हिल, मरिन ड्राईव्ह, गिरगाव चौपाटी यांच्या मध्यभागी असून सुमारे 1 कि.मी.अंतरावर असेल असे सांगितले गेले. याबाबतच्या सर्व माहितीचे दिनांक 25.8.2009 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर प्रस्तुतीकरण करण्यात आले. "स्मारकाच्या उभारणीसाठी संकल्प चित्र सादर करणा-या वास्तुशास्त्र संस्थांबरोबर करावयाचा करारनामा विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात आला असून त्याची अंतिम कार्यवाही ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे" असे यात नमूद केलेले आहे.

याबाबत मी सांगू इच्छितो की, वास्तुशास्त्र पध्दतीने डिझाईन तयार करणे हा एक भाग झाला. त्याचबरोबर प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमणे, एन्व्हायर्नमेण्टल कन्सल्टंट नेमणे, सर्व्हे इन्व्हेस्टिगेशन करणे, कारण जमिनीमध्ये किती खोली कोठे आहे ते तपासण्यासाठी व्यक्तीची नेमणूक करणे, जिओ इन्व्हेटिगेशन करणे कारण आत खड्डे आहेत, दगड आहे की माती आहे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

याची तपासणी करण्यासाठी नेमणूक करणे, अशा प्रकारे अनेक कन्सल्टंट नेमावे लागतील अशी माहिती पुढे आली. तसेच मातीची तपासणी करावी लागेल असेही पुढे आले. तसेच नेव्हीच्या अटी होत्या त्याही स्वीकाराव्या लागतील असेही सांगण्यात आले. याची सर्वस्वी जबाबदारी म्हणजे स्मारकासाठी आर्किटेक्ट नेमणे, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमणे, हे कोणी करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. ज्या आर्टिटेक्टला नेमण्यात येईल त्यांनीच हे सर्व कन्सल्टंट नेमावयाचे आणि त्यांनी स्वत:च्या फी मधून त्यांना फी द्यावयाची की शासनाने फी द्यावयाची वगैरे तांत्रिक बाबीतून हा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग व कन्सल्टंट यांच्यामध्ये मागेपुढे होत राहिला. दरम्यानच्या काळात या बेन्स्ले कंपनीने गोव्यामध्ये एक विधान केले. ते विधान आक्षेपार्ह असल्यामुळे 2010 मधील विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यामुळे बराचसा वेळ गेला. एका बाजूला आर्किटेक्ट नेमणे, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमणे, त्यांची फी निश्चित करणे, करारनामा करणे हे सर्व अवघड होते. त्या करारनाम्याचे प्रारुप माझ्याकडे आहे. त्यावेळी सकृतदर्शनी सीआरझेडचे नियम अस्तित्वात होते व समुद्रात भराव घालण्यास मनाई आहे अशा प्रकारचे मत व्यक्त करण्यात आले. समुद्रात भराव घालावयाचा की नाही असा मूलभूत प्रश्न असेल तर बाकी आर्किटेक्ट नेमणे, प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टंट नेमणे, त्यांची फी निश्चित करणे, करारनामा करणे, त्यांना ॲडव्हान्स दिल्यावर अडचण निर्माण झाल्यास काय होईल अशी शंका निर्माण झाली. म्हणून केंद्रीय पर्यावरण खात्याची तत्वत: मान्यता घ्यावी व कायद्याची अडचण असेल किंवा सीआरझेड कायद्यामुळे हा प्रोजेक्ट करता येत नसेल तर त्यासाठी कायद्यात बदल करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न केला पाहिजे व त्यासाठी राज्य सरकारने मदत केली पाहिजे अशा प्रकारची कल्पना पुढे आली.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथीराज चव्हाण....

म्हणून मी मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा या बाबतीत सादरीकरण करुन पाहिले. सादरीकरण पाहिल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की आपण या बाबतीत पुढे जात असताना मध्ये कोणत्या अडचणी निर्माण झाल्या, मग ते पर्यावरण खाते असेल, विधी व न्याय खाते असेल अथवा अन्य काही अडचण असेल, मुळातच अडचणी निर्माण झाल्या तर मग मोठीच अडचण होईल. म्हणून तत्कालीन पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश मुंबईला आले होते त्यावेळी त्यांच्या बरोबर या प्रकल्पाची चर्चा करुन त्यांना प्रकल्प अहवाल सादर केला आणि सांगितले की, जी मूळ कल्पना आहे ती अर्थातच पुढे मागे करता येईल, समुद्रामध्ये एक कि.मी.अंतरावर भर टाकून सुमारे चारएक हेक्टर प्लॅटफॉर्म करावा लागेल आणि तो केल्यानंतर तेथे भव्य पुतळा आणि अन्य सोयी उभ्या करावयाच्या आहेत. सकृतदर्शनी सीआरझेड नियमामध्ये जे नमूद केलेले आहे त्यामध्ये भराव टाकून काय काय करता येणार नाही याची सूची दिलेली आहे. त्यामध्ये पुतळ्याचा कुठे उल्लेख नाही. त्यामुळे पुतळयाबद्दल सूची सायलेण्ट असेल तर आपल्याला पुतळा करता येईल का असा धागा धरुन पुढे जायला आम्ही सुरुवात केली. त्यावेळी श्री. जयराम रमेश यांनी आश्वासन दिले की, हे मी पहातो आणि सादरीकरण व चर्चेला वेळ देतो. आपण हे दिल्लीमध्ये करु या. त्यांना मी सांगितले की, हा अत्यंत संवेदनशीलतेचा आणि महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या भावनेचा प्रश्न आहे. या प्रकल्पाला तत्वत: मान्यता द्या. बाकीचा डिटेल प्रोजेक्ट आणि इतर गोष्टी आम्ही करु. या बाबतीत केन्द्रातर्फे आम्हाला ज्या ज्या सूचना केल्या जातील त्या आम्ही पूर्ण करु, त्या बाबतीत व्यवहार्य असा मार्ग काढू. याप्रमाणे आमची चर्चा झाली. त्यानंतर केन्द्रीय पर्यावरण खात्याचे मंत्री महोदय बदलले. नवीन मंत्र्यांना आम्ही जाऊन भेटलो आणि त्यांना सांगितले की, पूर्वीचे मंत्री श्री. जयराम रमेश यांच्या बरोबर आमची अशी अशी चर्चा झालेली आहे. प्रकल्प अहवालाचा प्राथमिक आराखडा दिलेला असून आपणाकडून तत्वत: "go ahead" पाहिजे. डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट, कन्सल्टण्ट नेमण्याची प्रक्रिया चालू ठेवण्याचा निर्णय मी घेतला. त्यानंतर दुसरा कन्सेप्ट आराखडा पुढे आला तर तो आराखडा घेऊन त्यामध्ये जे काही बदल करावे लागतील ते बदल करुन किंवा अनुज्ञेय असेल तर काही बदल न करता प्रोजेक्ट करावयाचा असे प्रयत्न चालू राहिले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, केन्द्रीय तसेच महाराष्ट्राच्या पर्यावरण खात्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा झाली. महाराष्ट्राच्या पर्यावरण खात्याने या प्रकल्पाला मान्यता दिलेली नाही असे सांगण्यात आले. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. पर्यावरण खात्याने याबाबतीत स्पष्टीकरण दिलेले आहे की आताचे जे सीआरझेडचे नियम आहेत त्यामध्ये अशा प्रकारची ॲक्टिव्हिटी अनुज्ञेय नाही. परंतु त्यामध्ये स्टॅच्यूचा उल्लेख नसल्यामुळे स्टॅच्यू करायला परवानगी आहे असे मानले तरी आपल्याला पुढे जाता येईल. आता परिस्थिती अशी आहे की, एका बाजूला आपण निविदेच्या प्रक्रियेतून आर्किटेक्ट सिलेक्ट केलेला आहे, त्यांना किती फी द्यावयाची, ते काय काम करणार, त्यांचा करारनामा यादृष्टीने चर्चा चालू आहे. दुस-या बाजूला सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत संकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु झालेले आहे. 4 हेक्टर जमीन घेऊन हा प्रकल्प करावयाचा आहे. या बाबतीत सर्वांशी चर्चा करुन पुढे जावे लागेल. मला याबाबतीत एवढेच सांगावयाचे आहे की, केन्द्रीय पर्यावरण खात्याने हे करता येणार नाही असे कुठे सांगितले नाही आणि जरी त्यांचे ऑब्जेक्शन असले तरी हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, भावनेचा प्रश्न आहे. त्यामुळे यामध्ये काही बदल करावे लागते तर ते बदल करुन घेऊन आणि पर्यावरणाला कोणताही धोका निर्माण होईल अशी कोणतीही ॲक्टिव्हिटी न करता आम्हाला छत्रपती शिवरायांचे भव्यदिव्य स्मारक करावयाचे आहे असा महाराष्ट्रातील सर्व लोकांचा हा संकल्प असून तो पूर्ण करण्याकरिता सर्वांनी आम्हाला मदत करावी अशी आमची भूमिका आहे. कुठे काय करायचे हे आपल्याला बसून ठरवावे लागेल. या बाबतीत मी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यानंतर असे ठरविले की, पहिल्यांदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावयाचा...

श्री. रामदास कदम : हा अहवाल किती दिवसात तयार होईल ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : हा प्रकल्प अहवाल लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न राहील. सार्वजनिक बांधकाम खात्याशी याबाबतीत चर्चा झालेली आहे. अर्थातच हा डिटेल प्रोजेक्ट नसेल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

आता माझ्याकडे करारनाम्याचा ड्राफ्ट आहे. आपण तो ड्राफ्ट अजून मंजूर केलेला नाही. त्या ड्राफ्टमध्ये काम पूर्ण होण्यास 60 महिन्यांचा कालावधी लागेल असे नमूद केलेले आहे. हा कालावधी काही निश्चित नाही. आपण याबाबतीत पुन्हा चर्चा करु. या स्मारकाशी संबंधित विविध पैलू आहेत त्याबाबतची माहिती मी आपल्यासमोर मांडली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यास शासनास कोणतीही अडचण आली तरी त्यावर तोडगा काढून आपल्याला ते काम पूर्ण करावयाचे आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य शासनाच्या या भूमिके बरोबर राहतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. गरज भासल्यास आपण सगळे एकत्र जाऊन त्या ठिकाणी नियमात बदल करावयाचा असेल तर तो बदल करण्याचा प्रयत्न करु. यासंबंधी जे काम चालले आहे, ते काम ज्या गतीने व्हावयास पाहिजे, त्या गतीने झालेले नाही ही गोष्ट मी मान्य करतो. हे काम जलद गतीने व्हावयास पाहिजे होते. परंतु यापुढच्या काळात या कामाला लवकरात लवकर चालना देण्यात येईल असा शासनाकडून प्रयत्न राहील.

सभापती : ही औपचारिक चर्चा आहे. अशा प्रकारची चर्चा ही उत्तराचे भाषण झाल्यानंतर संपते. तरी देखील अपवादात्मक बाब म्हणून दोन्ही बाजूच्या तीन-तीन सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मी उपलब्ध करुन देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तरपणे निवेदन केलेले आहे. परंतु मला दोन,तीन गोष्टी त्यांच्याकडून जाणून घ्यावयाच्या आहेत. या स्मारकाच्या बाबतीत तुम्हाला आणि आम्हाला काय वाटते याबाबतीत प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जात नाही. त्यांच्या कृतीमुळे या विषयाची अवहेलना होत आहे असा आमचा खरा आक्षेप आहे आणि म्हणून आम्ही आमचे मत व्यक्त करताना ती भूमिका सभागृहात मांडली आहे. पोषक पध्दतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे असे अधिकाऱ्यांना वाटत नाही हे आपल्या एकंदरीत निवेदनावरुन स्पष्ट होते. आपण याबाबतच्या निविदा कधी काढल्या ? प्रत्यक्षात निविदा कधी प्राप्त झाल्या? आपण निवेदन करताना विधी खाते, सार्वजनिक बांधकाम खाते अशा दोन, तीन खात्यांची नावे घेतली. त्या खात्यांमध्ये सदर प्रस्ताव कधीपासून फिरतो आहे त्यासंबंधीचा कालावधी आम्हाला पाहिजे. या खात्यांकडून किती महिन्यांपासून टोलवा टोलवी चालली आहे हे आमच्या लक्षात येईल. आपण या बाबतीत सगळयांना एकत्र बोलावणार आहात,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यावेळी यासंदर्भात प्रत्यक्षात काय चालले आहे व यासाठी काय करावे लागेल ते आम्हाला कळेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण विभागाचे नियम 2011 मध्ये आले. त्याच्या आधी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्याबाबतचा विषय सुरु झाला होता. 2011 च्या आत सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विधी विभाग यांनी या कामास गती घेतली असती तर 2011 च्या पर्यावरण विभागाच्या नियमाच्या तडाख्यात हे स्मारक अडकले नसते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्री महोदय हे चिंतेपोटी बोलले असतील. स्मारक बांधण्यास 60 महिन्यांचा कालावधी लागणार आहे, हा नंतरचा प्रश्न आहे. परंतु स्मारक उभारणीसाठी आम्ही केंद्र शासनाकडून पुढील आठ महिन्यात, बारा महिन्यात सर्व प्रकारच्या परवानग्या घेऊन येऊ अशा प्रकारची माहिती दिली तर ती व्यवहारिक ठरेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन मी अत्यंत शांततापूर्वक ऐकले आहे. या विषयाची सुरुवात 2004 पासून झाली. आता 2012 हे वर्ष सुरु आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे अरबी समुद्रात होणार नाही, ते स्मारक दुसऱ्या ठिकाणी समुद्राच्या किनाऱ्यावर होणार आहे, अशा प्रकारचे वक्तव्य दरम्यानच्या काळात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केले. सदरच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्रात वेगळया प्रकारचा मॅसेज गेला व या मॅसेजमुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये खळबळ झाली. कोणत्याही परिस्थितीमध्ये, कोणत्याही अडचणी आल्या तरी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रातच होईल अशा प्रकारचे पक्के आश्वासन महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून हवे आहे. तशा प्रकारचे आश्वासन दिले जाईल काय ? या स्मारकाच्या बांधकामास 5 वर्षे लागतील. या स्मारकासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखून, त्यासंदर्भात सर्व परवानग्या घेऊन तसेच त्या प्रोजेक्टला मान्यता देऊन एक वर्षाच्या आता कामाला प्रत्यक्षात सुरुवात होईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. उप मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा त्यांची भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांनी जे स्टेटमेंट केले त्यामुळेच आम्हाला हा विषय सभागृहात उपस्थित करावा लागला. कोणत्या परिस्थितीत त्यांनी स्टेटमेंट केले होते याचा खुलासा होणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, बांधकाम करण्यास पाच वर्षे लागतील. परंतु कामाचे टप्पे कोणत्या पध्दतीचे असतील हे स्पष्ट झाले पाहिजे. केंद्राकडून ज्या परवानग्या घ्याव्या लागतील त्यासाठी किती कालावधी लागेल हे सांगितले गेले पाहिजे. या विषयाबाबत माननीय पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी विरोधी पक्षाचे सहकार्य आवश्यक असल्यास आम्ही जरुर शासनाला सहकार्य करु. शेवटी हा विषय महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेच्या अस्मितेचा आहे. हा राजकारणाचा विषय होऊ शकत नाही. ज्या पध्दतीने नवी मुंबईच्या विमानतळाबाबत प्रयत्न झाला तसा प्रयत्न या स्मारकाच्या उभारणीसाठी होणे आवश्यक आहे. 2004 पासून आतापर्यंत आठ वर्षांचा कालावधी लोटला आहे. आणखी किती कालावधी लागेल हे स्पष्ट झाले पाहिजे. केंद्रीय पर्यावरण विभागाकडून मान्यता मिळविण्यास किती कालावधी लागेल आणि प्रत्यक्षात कामाला केव्हा सुरुवात होईल हे सभागृहाला सांगितले जाईल काय?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सर्वात प्रथम मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचे मनापासून आभार मानतो. महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेचे लक्ष या सभागृहातील या विषयावरील चर्चेकडे लागले होते. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर हिंदुस्थानचे दैवत आहेत. या दैवताच्या स्मारकाबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा मी मुद्दाम उल्लेख करतो. भावना सर्वांच्याच सारख्या आहेत. उद्या वेळ आली तर दोन्ही सभागृहाचे सर्व सन्माननीय सदस्य या विषयाच्या निमित्ताने राजीनामा द्यायला तयार आहेत, परंतु ते स्मारक त्याच ठिकाणी उभे राहिले पाहिजे अशा प्रकारची भावना या ठिकाणी व्यक्त केली गेली. इतक्या तीव्र भावना आहेत. म्हणून या स्मारकाच्या बांधकामाला 5 वर्षे लागणार असली तरी इतर ज्या गोष्टी शासनाच्या अखत्यारित आहेत त्या गोष्टी मर्यादित काळात व्हाव्यात. त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रकाश टाकावा अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत तळमळीने उत्तराच्या भाषणातून विषय मांडण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी निश्चितपणे त्यांचे कौतुक करतो. माझ्याकडे या विषयाबाबत शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे उपलब्ध आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी नवीन काय सांगितले असा मला प्रश्न पडला आहे. उत्तराच्या भाषणात नवीन काहीच सांगितलेले नाही. जी काही सांगितली ती सगळी पूर्वीचीच माहिती आहे. 2009 पासूनच्या कागदपत्राच्या सर्व झेरॉक्स प्रती माझ्याकडे उपलब्ध आहेत.....(बेल वाजल्यानंतर)....सभापती महोदय, मी आपल्याला एका मिनिटात संपवितो.

सभापती : माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, सभागृहामध्ये सदस्यांनी मर्यादा पाळून वक्तव्य करणे आवश्यक आहे. माननीय सदस्यांनी जे काही वक्तव्य केले ते अयोग्य असेल तर कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या तोंडून काही चुकीचे वक्तव्य बाहेर पडले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती : सभागृहात काय बोलावे, कसे बोलावे, सभापतींच्या बाबतीत कसा उल्लेख करावा याची मर्यादा माननीय सदस्यांनी पाळली पाहिजे.

श्री.विनायक मेटे : माझ्याकडून तोंडून चुकून काही वक्तव्य केले गेले त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

नंतर श्री.खर्चे....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : महोदय, महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाची अस्मिता असलेला हा अतिशय जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा प्रश्न होता. माननीय मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी "छत्रपतींचा पुतळा" असा उल्लेख केला. पण आपल्याला छत्रपतींचा पुतळा नको तर स्मारकच पाहिजे आणि त्या स्मारकासाठी दोन्ही सभागृहांची संयुक्त समिती तयार करुन ते समुद्रातच होईल अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. सय्यद ज़मा : मैं माननीय मुख्यमंत्री और माननीय उप मुख्यमंत्री को धन्यवाद देता हूँ. इस समय संसद का बजट सत्र चल रहा है. पूरे महाराष्ट्र की जनता की भावनाओं को देखते हुए अगर इस कार्य के लिए हमें सी.आर.जेड. एक्ट या किसी और पर्यावरण एक्ट में संशोधन करने की आवश्यकता हो तो वह संसद या विधान मंडल के इसी बजट सत्र में आना चाहिए, ऐसा मेरा सुझाव है.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभागृहात जे जे नवीन मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत त्यामध्ये सभागृहाच्या आणि सभागृहाच्या वतीने राज्यातील जनतेच्या भावना प्रतिबिंबित होतात याबद्दल कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. मी माझ्या निवेदनात मुद्दाम काही क्रॉनॉलॉजी सांगितली, कम समय कार्यक्रम सांगितला. राज्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन अरबी समुद्रातच योग्य असेल त्या ठिकाणी शिव छत्रपतींचे भव्य स्मारक होईल. त्यांचा अश्वारुढ पुतळा असावा, त्या ठिकाणी इतर सोयी असाव्यात आणि राज्यातील व देशातील तसेच बाहेरच्या देशातील पर्यटकांच्या अभ्यासासाठीच्या सुविधा असाव्यात. अरबी समुद्रात एक किलोमीटर अंतरावर, पूर्वकल्पनेप्रमाणेच अर्थात त्यात 100-200 मीटरचा फरक होऊ शकतो पण समुद्रातच हे स्मारक असेल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, आम्ही दरम्यानच्या काळात वर्तमान पत्रातून जे वाचले की राज्याचे मुख्य सचिव, काही अधिकारी तसेच माननीय पालक मंत्री यांनी या स्मारकासाठी दुसरीकडे जागा शोधली. याबाबतचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : महोदय, या सर्व प्रक्रियेत वेळ लागणारच आहे. या सभागृहात असाही उल्लेख करण्यात आला की जानेवारी, 2011 ला परवानगी मिळाली असती तर बरे झाले असते. पण जानेवारी 2011 च्या सीआरझेड नोटिफिकेशनमुळे यामध्ये आणखी स्पष्टता आलेली आहे पण यापूर्वी हे परमिटेड होते असा कुठेही उल्लेख दिसत नाही. माझ्या माहितीप्रमाणे सभागृहात सन्माननीय सदस्यांनी इतर स्मारकांचा उल्लेख केला त्यासंदर्भात मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ही स्मारके हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीची आहेत. काही स्मारके असलेल्या खडकांवर किंवा बेटांवर झालेली आहेत असाही उल्लेख येथे झाला. पण आपल्याला अशा स्मारकांशी तुलना करावयाची नाही तर आपल्याला अरबी समुद्रातच हे स्मारक तयार करावयाचे आहे. तसे करण्यात केंद्रीय पर्यावरण खात्याच्या काही अडचणी असतील तर त्या दूर करण्याचाही प्रयत्न करावयाचा आहे. परिवर्तन करावयाचे असेल तर ते नियमात किंवा कायद्यात करुन पुढे जावयाचे आहे यासाठी हे शासन कटिबध्द आहे व त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य लागेल. वेळेबद्दल सांगायचे तर शासनाकडून यासाठी जो प्रस्ताव पाठवावयाचा आहे तो जास्तीत जास्त लवकर पाठविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. अंतिम प्रकल्प अहवालच पाहिजे असे नाही तर एक मूळ संकल्पना घेऊन आपण केंद्राकडे प्रस्ताव पाठवू. त्यात किती जमीन लागणार आहे व आणखी काय काय आवश्यक आहे अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाकडे लवकरात लवकर सादर करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात परवानगी मिळण्याची निश्चित तारीख आता सांगता येणार नाही परंतु ही परवानगी वर्षभरात मिळण्यास अडचण येणार नाही अशी माझी धारणा आहे. या स्मारकाच्या संदर्भात दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांचे सहकार्य घेऊन दिल्लीमध्ये पर्यावरण खात्याशी चर्चा करुन प्रश्न सोडविले जातील व राज्य शासनाच्या वतीने कराराच्या अटी काय असतील यासंदर्भात राज्य शासनाचे विधी व न्याय विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मी महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभे करण्यासाठी हे शासन कटिबद्ध आहे. हे स्मारक नक्की होईल अशी मी सदनाला खात्री देतो.

धन्यवाद.

सभापती : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी औचित्याचा एक मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. सदर औचित्याचा मुद्दा कांद्याच्या अनुषंगाने असून नाशिक येथे कांदा उत्पादक शेतक-यांचे जे आंदोलन सुरु आहे त्यासंदर्भात औचित्याचा मुद्दा आहे. हा औचित्याचा मुद्दा शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. एक अपवाद म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देत आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आदरणीय सभापती महोदय, आज सभागृहात योगायोगाने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री श्री. छगन भुजबळ साहेब उपस्थित आहेत. नाशिक येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 10 हजारापेक्षा जास्त कांदा उत्पादक शेतकरी समुदाय बसलेला आहे. जोपर्यंत कांद्याच्या संदर्भात सरकार भूमिका घेणार नाही तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातून एकाही व्यक्तीला बाहेर पडू देणार नाही अशा पध्दतीची भूमिका या समुदायाने घेतलेली आहे. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून आदरणीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, नाशिक येथे एखाद्या वेळेस परिस्थिती चिघळू शकते, परिस्थिती बदलू शकते त्यामुळे सभागृहाचे आजचे कामकाज संपण्याच्या आधी कांद्याच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे हे सांगितले तर बरे होईल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी औचित्याच्या माध्यमातून जो मुद्दा मांडलेला आहे त्याची नोंद घेऊन माननीय सहकार मंत्र्यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

सभापती : आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा पुन्हा सुरु होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(पुढे सुरु...

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सन 2012 व 2013 हे वर्ष साजरे केले जात आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण वाचत असतांना एका गोष्टीचे अत्यंत दु:ख वाटले. आधुनिक महाराष्ट्राच्या व्यवस्थेमध्ये विदर्भाचा सर्वात मोठा वाटा होता. महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळी सांगितले होते की, जर विदर्भाचा विकास झाला नाही तर मी स्वत: विदर्भ वेगळे करुन देईन. आपण स्व.यशवंतराव चव्हाणांची जन्मशताब्दी साजरी करीत असतांना, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन 53 वर्षे झाली परंतु अद्यापपावेतो विदर्भाचा विकास झाला नाही. विदर्भामध्ये सिंचनाचा, रस्त्याचा, विजेचा जो प्रचंड अनुशेष वाढला आहे त्याबाबत जन्मशताब्दी वर्षामध्ये विदर्भाला काही तरी मिळेल असे वाटले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्रीमती शोभा फडणवीस...

परंतु हे घडले नाही याचे मला दु:ख वाटते. दर दिवशी मुलींची होणारी विक्री, महिलांवरील वाढते अत्याचार, लहान मुलींवर होणारे बलात्कार आणि त्यांचे मृत्यू या क्रमवारीत महाराष्ट्र भारतात चौथ्या क्रमांकावर आहे. सदर क्रमवारी कमी करण्यासंबंधी कोणतीही उपाययोजना माननीय राज्यपालांच्या यंदाच्या अभिभाषणामध्ये नाही.

तिन्ही प्रदेशांचा प्रादेशिक समतोल विकास साधण्यासाठी महाराष्ट्राचे अर्थतज्ज्ञ श्री.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने अभ्यास करण्याबाबत कुणाचेही दुमत नाही. विदर्भ वैधानिक विकास मंडळाचा जो निधी आम्हाला मिळायचा तो निधी गेल्या दोन वर्षापासून आम्हाला मिळालेला नाही. एकही पैसा आम्हाला दिलेला नाही. हा विदर्भावर अन्याय नाही काय ? विदर्भावर होणारा हा सरळ सरळ अन्याय आहे. आमच्याकडे अनुशेष आहे. आमचा विकास खुंटलेला असताना दोन वर्षांचा निधी न दिल्यामुळे आणखी मोठ्या प्रमाणावर अनुशेष निर्माण झालेला आहे. विदर्भाचा विकास मोठ्या प्रमाणावर खुंटलेला आहे. विदर्भातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. वन विभागाच्या हरकतीमुळे सिंचनाच्या कामाला देखील वाव मिळत नाही. सिंचनाचा फायदा विदर्भाला झालेला नाही. असे असताना यंदाचे वर्ष आपण श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. असे करीत असताना विदर्भात अजून किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतील याचा हिशोब करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे मला अतिशय वाईट वाटत आहे.

मानव विकास अभियानाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. राजुरा, कोरपणा हे छोटे तालुके आहेत. तेथे मोठ्या प्रमाणावर विकास न झाल्यामुळे आदिवासींवर अन्याय होत आहे. तेथे आजही सिंचनाची व्यवस्था नाही, रस्ते नाहीत. तेथील अनुशेष अजूनही भरलेला नाही. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आजही 50 टक्के रस्ते झालेले नाहीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झालेली नाही, आजही शाळा नाही. सिंचनाची व्यवस्था नाही. आम्हाला येथील निर्देशांकापर्यंत आणण्याचे काम झालेले नसताना देखील मोठ्या प्रमाणावर आमच्यावर अन्याय करण्यात येत आहे. येथे आमचा हिस्सा हिसकावून घेण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे, याचे देखील मला खऱ्या अर्थाने वाईट वाटत आहे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

संकटात सापडलेल्या महिलांसाठी विशेष हेल्पलाईन क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधण्याची सुविधा पूर्ण केली. माझ्या माहितीप्रमाणे महिन्यापूर्वी महाराष्ट्र टाइम्समध्ये लेख आला होता. त्यात असे म्हटले होते की, संकटकाळी हेल्पलाईनवर मदत मागितली तर तेथे फोन घेणाराही कोणी सापडत नाही. मदत करण्याचीही सोय होत नाही. त्यामुळे मुंबईतील हेल्पलाईन पहिल्यांदा दुरूस्त करावी. महिलांना चांगली मदत मिळेल हे पहावे. मगच उर्वरित महाराष्ट्राचा विचार करावा. कुठलीही योजना अर्धवट सोडून बाकीच्या ठिकाणी आम्ही करतो असे सांगून तोंडला पाने पुसण्याचे काम शासनाने थांबवावे असे मला येथे खेदाने म्हणावेसे वाटते.

नक्षलग्रस्त जिल्हे म्हणून आपण गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांचा समावेश केला. वास्तविक चंद्रपूर जिल्हा हा नक्षलग्रस्तांचे संकटकाळी लपण्याचे ठिकाण झाले आहे. सर्वात जास्त नक्षलवादी चंद्रपूर जिल्ह्यात सापडले आहेत. आपण फक्त गडचिरोली आणि गोंदियाचा विचार करीत असताना मला शासनाला एक गोष्ट सांगावयाची आहे की, आजही नक्षलवाद्यांना रोखण्यामध्ये शासन अपयशी ठरले आहे.

यानंर श्रीमती रणदिवे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

आजही त्याठिकाणी दिवसा ढवळ्या 9.00 वाजता सगळया लोकांसमोर काँग्रेसच्या नेत्यांचे आणि अध्यक्षांचे खून केले जातात तरी सुध्दा नक्षलवादी पकडले जात नाहीत. तसेच तरुण आदिवासींनाही भर दिवसा मोठ्या प्रमाणात लोकांसमोर गोळ्या घालून ठार मारण्यात येते आणि अशा घटनांच्या बाबतीत सरकार अजूनपर्यंत काही कंट्रोल करु शकलेले नाही. म्हणून विकासाच्या योजनांमुळे तेथील नक्षलवाद थांबेल असे म्हणत असताना तेथे केवळ 25 कोटी रुपये दिले, 30 कोटी रुपये दिले हे सांगत असताना शासनाने सद्सद्विवेकबुध्दीने विचार केला पाहिजे. आम्ही सतत मागणी करीत आहोत की, त्याठिकाणी असलेल्या रिक्त जागा भरा. केवळ पैशाने विकास होत नसतो. तेथील माणसांमुळे,अधिकाऱ्यांमुळे विकास होत असतो. परंतु प्रत्यक्षात तेथे अधिकारी नाहीत, नायब तहसीलदार नाहीत, पटवारी नाहीत, मग तेथील भागाचा विकास कसा होणार आहे हा प्रश्न आहे. आजही चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 59 नायब तहसीलदारांपैकी अजूनही 19 जागा रिक्त आहेत. अशा परिस्थितीत शासन कोणता विकास करणार आहे हा प्रश्न आहे. केवळ पैसे देऊन आणि आमच्या तोंडाला पाने पुसण्यासाठी सांगत असाल की, आम्ही एवढे करीत आहोत, तेवढे करीत आहोत. तर ते योग्य नाही. प्रत्यक्षात तेथे काम करणारी माणसे नाहीत. अशा वेळी जर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या माध्यमातून शासनाला याची जाणीव होत असेल तर ते चांगले आहे. परंतु मला एका गोष्टीचे दु:ख वाटते की, कोणालाही आमच्या जखमा दिसत नाहीत, कोणालाही आमच्या हृदयामधील वेदना दिसत नाहीत तर केवळ वरुन केलेले लेपन दिसत आहे. म्हणून केवळ आमची समजूत घालण्यापेक्षा याबाबतीत सरकारने जर काही कृती केली असती तर बरे झाले असते. तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून आम्हाला असे कळले असते की, शासन या भागामध्ये रिक्त असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या जागा भरणार आहे तर त्यातून आम्हाला खऱ्या अर्थाने दिलासा मिळाला असता.

तसेच ई-संग्राम, बहुउद्देशिय प्रिंटर, संगणक, इंटरनेट जोडणी करुन त्याठिकाणी 20 हजार स्थानिक युवकांचे तांत्रिक स्वरुपाचे मनुष्यबळ पुरविण्यात येणार आहे.आपण ई-संग्राम योजना आणली पण वीज गेल्यावर त्या योजनेचे काय करावयाचे? आपण ई-संग्रामच्या नावाखाली विकास आणणार आहात. पण प्रत्यक्षात खेड्यातील वीज दुपारभर गायब असते आणि ती रात्री येते. मात्र त्यावेळी सदरहू काम करणारे कर्मचारी घरी असणार. मग अशा स्थितीमध्ये आम्हाला खरोखरच याचा उपयोग होणार आहे काय?आमच्याकडे दिवसभर 10-10,12-12 तास भारनियमन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असते.अशा वेळी आम्ही कोणत्या संगणकावरुन संबंधितांना माहिती कळविणार आणि त्यासाठी कोणत्या संगणकाचा आणि प्रिंटरचा उपयोग करणार हा प्रश्न आहे. केवळ जर कागदोपत्री विकास दाखवून आम्हाला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न होत असेल तर ते बरोबर नाही. याठिकाणी ग्रामीण भागामध्ये 24 तास वीज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काम झाले तरच या भागाचा विकास होऊ शकतो.

सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जुन्या पाटबंधारे प्रकल्पाची दुरुस्ती, नूतनीकरण आणि पुन:स्थापन या केंद्र शासनाच्या कार्यक्रमाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. याबाबत मी शासनाकडे हरकत नोंदविलेली आहे की, आमच्याकडे सगळे जुने तलाव आहेत म्हणजे शिवकालीन तलाव, माजी मालगुजारी तलाव आहेत. अशा वेळी आमच्याकडे हा निधी देण्याऐवजी तो पश्चिम महाराष्ट्रामध्ये देण्यात आला आणि विदर्भातील 11 जिल्ह्यातील फक्त 48 तलाव दुरुस्तीसाठी हाती घेण्यात आले. मात्र त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील एकाही तलावाचा समावेश नाही. केंद्र शासनाचा निधी कोणत्याही मार्गाने आला तरी तो विदर्भाच्या वाट्याला कधीच येत नाही. त्यामुळे याबाबतीतही विदर्भावर अन्याय होत आहे. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जे सांगण्यात आले ते पहाता आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचेच काम होत आहे आणि आम्हाला कोणत्याही पध्दतीने मदत उपलब्ध होत नाही याचा मला खेद वाटतो.

सभापती महोदय, वीज भार नियमन 2012 मध्ये संपणार असे सांगण्यात आले आहे. पण ते कशा प्रकारे संपणार आहे हा प्रश्न आहे. आज आपल्याकडे विजेचे प्रकल्प आहेत, पण मध्यंतरी एक अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार आपण आजच्या घडीला 30 टक्के कमी वीज निर्माण करीत आहोत. मग त्यासाठी कोळसा मिळत नसेल किंवा त्याचे ग्रेडेशन जबाबदार असेल किंवा पाणी कमी असेल, मशिनरी जबाबदार असेल. पण सध्या आपण पाहिजे तेवढी वीज निर्माण करु शकत नाही. अशा वेळी आपण 2012 मध्ये भारनियमन कसे कमी करणार आहोत? तसेच या संबंधात शासनाने खाजगी कंपन्यांना आणलेले आहे पण त्या कंपन्या खरेच सुरु झाल्या आहेत काय? त्या कंपन्यांच्या माध्यमातून वीज निर्माण झाली आहे काय? खापरखेडा येथे प्रयत्न करण्यात आला परंतु तेथे पूर्णपणे वीज निर्मिती सुरु झाली आहे काय याचा विचार न करता आपण असे सांगत आहोत की,आपण लोकांना भारनियमनातून मुक्त करु.मात्र यासंबंधात आम्ही केवळ आव्हानच ऐकत आहोत. पण अजूनपर्यंत आम्हाला तशा प्रकारची वस्तुस्थिती दिसत नाही. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

शासन प्रत्यक्षात जे करीत आहे तेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधून आम्हाला सांगण्यात आले. याठिकाणी जेव्हा माननीय राज्यपालांसारख्या मोठ्या व्यक्तीच्या अभिभाषणाचा उल्लेख होतो अशा वेळी शासनाने कृपा करुन त्यावर टीका करण्याची वेळ आमच्यावर आणू नये.

यानंतर श्री.शिगम अ. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ग्रामीण विकास विभागाच्या माध्यमातून 100 कोटी वृक्षांची लागवड करणार असल्याचा उल्लेख आहे, ही चांगली बाब आहे. आपण जुलै-ऑगस्ट महिन्यात रोपे लावतो परंतु त्यावेळी रोपे तयार नसतात आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात रोपे असतात त्यावेळी पाऊस नसतो. पाऊस नसताना रोपे मिळतात अशी परिस्थिती आहे. मग ती रोपे ग्रामपंचायत कार्यालयाच्या मागे पडून सडून जातात. केवळ योजना राबवावयाच्या आणि पैसा खर्च करायचा, परंतु प्रत्यक्षात त्याचे स्वरुप दिसत नसेल तर आपण कोणत्या पध्दतीने पर्यावरण वाढविणार आहात ? आपण कोणत्या पध्दतीने 21 वरुन 33 वर नेणार आहात, किती वर्षात पर्यावरणाचा बॅकलॉग कमी करणार आहात ? विदर्भावर आणखी किती अन्याय करणार आहात ? आम्ही 40 टक्के वन राखून महाराष्ट्राचा बोजा आम्ही सांभाळावयाचा हे काही बरोबर नाही. तेव्हा वृक्ष लागवड करत असताना वेळीच रोपे देण्याची व्यवस्था झाली तर काही प्रमाणात झाडे लागू शकतील. परंतु ही बाब शासनाच्या डोक्यात येईल की नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, सन 2011-2012 मध्ये शासनाने राज्य नदी संवर्धन योजना सुरु केली. उप राजधानातील नागपूरच्या महानगरपालिका क्षेत्रातील नाग नदीमध्ये जाणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न प्रचंड मोठा आहे. हे सांडपाणी कन्हान नदीच्या मार्गातून गोसीखुर्द मधून पलीकडे जाते आणि या पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जातो. तेव्हा पाणी शुध्दीकरणाचा प्रस्ताव शासनास दिलेला आहे. 350 कोटी रुपयांचा हा प्रस्ताव आहे. एवढा मोठा खर्च करण्याची नागपूर महानगरपालिकेची ऐपत नाही, त्यांच्या जवळ तेवढा पैसा नाही. तेव्हा कमीत कमी नाग नदीच्या पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून 300 कोटी रुपयांची तरतूद करुन हा प्रश्न सोडवावा एवढे बोलून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला विरोध करुन माझे भाषण पूर्ण करते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे भाषण झाले. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले बोलतील. परंतु त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेताना कोणी मंत्री महोदय दिसत नाहीत. सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलायचे आणि सभागृहाच्या भिंतीनी ते ऐकायचे काय ? ही चर्चा कोणीही गंभीरतेने घेताना दिसत नाही. हा सदस्यांचा अपमान आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य सभागृहात महत्वाच्या विषयावर बोलत असताना माननीय मंत्री महोदयांनी महत्वाच्या मुद्यांची नोंद करुन घेणे आवश्यक आहे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे दृढ संकल्प, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासनाचा संकल्पित घोषवारा, राज्यातील जनतेचा कल्याणाचा विचार, जनतेच्या भवितव्याची चिंता, राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे लोकांना दिलेले आश्वासक शब्द. शब्द प्रामाण्य म्हणजे राज्यपालांचे अभिभाषण आणि हे शब्द प्रामाण्य राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ओतप्रोत भरलेले आहे म्हणून मी माननीय राज्यपालांचा मन:पूर्वक आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या विषयी आदर व्यक्त करण्यात आलेला आहे. त्यांचे जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. त्या निमित्ताने "यशवंत पंचायत राज अभियान" राज्य शासनातर्फे सुरु करण्यात आलेले आहे त्याबद्दल शासनास धन्यवाद दिले पाहिजेत.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीचा मूलभूत सिध्दांत समन्यायी पध्दतीने वाटप करणे हा आहे. परंतु या समितीचा कालावधी किती राहणार आहे याचा बोध होत नाही.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

समन्यायी वाटपाचे निकष लोकांसमोर कधी येणार आहेत आणि कधी एकदा या निधीचे वाटप होणार आहे यासाठी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या ठिकाणची जनता आतुर आहे. म्हणून तो कालावधी मंत्री महोदयांनी स्पष्ट करावा जेणेकरुन महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळू शकेल. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मानव विकासाची संकल्पना मांडलेली आहे. पूर्वी जिल्हा हा घटक होता. आता राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात तालुका हा घटक धरण्यात आलेला आहे. मी त्याही पुढे जाऊन असे म्हणेन की, महाराष्ट्रातील प्रत्येक गाव वेगळे आहे. प्रत्येक गावचा शिवार वेगळा आहे. प्रत्येक गावची माती वेगळी आहे. त्यामुळे त्या गावातील मानवाचा विकास हा त्या शिवारावर अवलंबून आहे. म्हणून आज ना उद्या या महाराष्ट्र शासनाला गाव हा घटक गृहीत धरावा लागेल. परंतु आता तालुका हा घटक गृहीत धरण्यात आला आहे त्याबद्दल मी या शासनाचे मन:पूर्वक आभार मानतो. पण मानवाचा विकास करावयाचा असेल तर आज ना उद्या गाव ही संकल्पना गृहीत धरणे अत्यंत आवश्यक आहे त्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत असा आग्रह मी धरणार आहे.

सभापती महोदय, परतीचा पाऊस कमी प्रमाणात झाला त्यामुळे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण झालली आहे. अनेक भागामध्ये पाणी टंचाई आहे. भीषण दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने टँकरने पाणीपुरवठा करण्याचे अधिकार तहसीलदारांना दिलेले आहेत ही अतिशय आंनदाची गोष्ट आहे. पण महाराष्ट्रातील पशुधनाला आणि गोधनाला वाचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे काय नियोजन आहे? ते नियोजन या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्राला समजले पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय, या निमित्ताने या संबंधीचे स्पष्टीकरण या ठिकाणी निश्चितपणे केल्याशिवाय राहणार नाहीत असे मला वाटते. एक अतिशय क्रांतिकारक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. 50 टक्के महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आलेल्या आहेत. "महिलाओंका राज आया है. चाँद जमीन पर है और चाँदनी आकाश में छा गई है." असे अभूतपूर्व दृश्य या महाराष्ट्रात दिसत आहे, याचे सर्व श्रेय आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी आणि आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांना देणे औचित्यपूर्ण ठरेल. हजारो महिला स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या आहेत. जिच्या हाती स्वराज्य संस्थेची दोरी ती पुरुषापेक्षा बरी असे अधिकारी म्हणू लागलेले आहेत कारण महिला राज अधिकाऱ्यांना जास्त

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

सोईस्कर आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे चित्र परिवर्तनाच्या दिशेने जाणारे आहे. हे अदभूत चित्र आहे. ही अपूर्वाई आहे. ही अपूर्वाई महाराष्ट्र शासनाने आणलेली आहे त्याबद्दल महाराष्ट्र शासनाला मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. महाराष्ट्र शासनाचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाची निर्मल ग्राम योजना आहे. संपूर्ण देशामध्ये या याजनेंतर्गत 25145 पुरस्कार दिले गेले आहेत. त्यापैकी 9082 पुरस्कार महाराष्ट्रात दिले गेले आहेत. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. पण ज्या निर्मल ग्राम पंचायतीला दहा वर्षापूर्वी हे पुरस्कार दिले गेले आहेत त्यांची आज काय परिस्थिती आहे याचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. सन 2011 मध्येही काही पुरस्कार नव्याने दिले गेले आहेत. पण दहा वर्षापूर्वी ज्या ग्राम पंचायतींना पुरस्कार दिले गेले आहेत त्यांची आज काय परिस्थिती आहे याचाही आढावा घ्यावा लागेल. परिवर्तन घडलेले आहे. गावामध्ये नवीन ग्राम पंचायत आलेली आहे. वाद निर्माण झालले आहेत. त्यामुळे ज्या अनेक ग्राम पंचायतींना पुरस्कार मिळालेले आहेत त्या ठिकाणी पूर्वीचीच दुर्गंधी निर्माण झालेली आहे. त्यामुळे याचाही आढावा महाराष्ट्र शासनाने निश्चितपणे घेतला पाहिजे. कारण असे आहे की, त्या ग्राम पंचायतीचा खुराक बंद केला आणि लंगोट गेला अशी अवस्था आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

त्यामुळे त्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा. तो प्रयत्न जर राज्य शासनाकडून झाला तर ते महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक ठरेल.

सभापती महोदय, विदर्भातील आपदग्रस्त जिल्ह्यातील 4 लाख शेतकऱ्यांना अर्ध्या किमतीमध्ये दर्जेदार बियाणे दिले गेले. त्यामुळे कापूस, सोयाबीन, तूर या पिकांचे विक्रमी उत्पादन झालेले आहे. हा सुध्दा महाराष्ट्र शासनाचा अतिशय क्रांतिकारक निर्णय आहे. या निर्णयाचा परिणाम म्हणून जे आपदग्रस्त शेतकरी आहेत त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये निश्चितपणे सुधारणा घडलेली आहे. कडधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाला 'कृषी कर्मण पुरस्कार' मिळाला. केंद्र शासनाचा हा पुरस्कार आहे. शासन धन्यवादास पात्र आहे. महाराष्ट्र शासनाने एक क्रांतिकारक निर्णय घेतलेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचा उल्लेख आहे. महाराष्ट्रामधील ज्या शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांपर्यंत पीक कर्ज हवे असेल त्यांना ते कर्ज बिनव्याजी देण्याची संकल्पना महाराष्ट्र शासन राबवित आहे आणि 3 लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाला फक्त 1 टक्का व्याज आहे. आजपर्यंत खरीप आणि रब्बी पिकासाठी 15960 कोटी रुपयांचे कर्ज 51 लाख शेतकऱ्यांना मंजूर केलेले आहे. हा एक क्रांतिकारक निर्णय आहे. हा महाराष्ट्रातील उच्चांक आहे. हा उच्चांक प्रस्थापित करण्यामध्ये राज्य शासनाला यश आले त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो तसेच आदरणीय राज्यपालांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केलेले आहे. कापसाचे पीक हे विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. संपूर्ण मराठवाड्यामध्ये बीड जिल्हा कापसाच्या उत्पादनामध्ये उच्चांक प्रस्थापित करणारा जिल्हा आहे. वस्त्रोद्योग धोरणाचा परिणाम निश्चितपणे बीड जिल्ह्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. आपण महाराष्ट्रातील जवळजवळ 54 सहकारी सूत गिरण्यांना 106 कोटी रुपये बिनव्याजी दिले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हा एक प्रकारचा दिलासा आहे. ज्या 54 सूत गिरण्यांना बिनव्याजी 106 कोटी रुपये दिले गेले त्यातील मराठवाडा आणि विदर्भातील किती सूत गिरण्या आहेत याचेही स्पष्टीकरण राज्य शासनाने दिले पाहिजे. तसा माझा त्यांना आग्रह राहील, माझी विनंती राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, मी आदरणीय श्री. राणे साहेबांना धन्यवाद देणार आहे, त्यांचे अभिनंदन करणार आहे. महाराष्ट्रामध्ये उद्योग खाते हे प्रथम क्रमांकाचे खाते आहे. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी एकतृतीयांश गुंतवणूक उद्योग खात्यामध्ये करण्यात आलेली आहे. देशामध्ये प्रथम क्रमांकाची गुंतवणूक उद्योग खात्यामध्ये झालेली आहे. एक खिडकी योजना निर्माण करुन मुंबई-दिल्ली कॉरिडॉर निर्माण करण्याचा प्रयत्न उद्योग खात्यामार्फत झालेला आहे. त्यामुळे अनेक उद्योजक येणार आहेत आणि महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक करणार आहेत. गुजरातला मागे टाकणार आहेत. अरबी समुद्रापेक्षाही मोठे काम महाराष्ट्रामध्ये निर्माण होणार आहे. एक महत्वाची गोष्ट या ठिकाणी अशी घडणार आहे की, 20 लाख कोटी रुपयांपेक्षाही अधिक उत्पन्न या आर्थिक वर्षामध्ये निर्माण होणार आहे आणि त्यामधून 81 लाख रोजगार महाराष्ट्रामध्ये निर्माण होणार आहेत. आमच्या विरोधी पक्षाच्या डोळ्यामध्ये मला गुलाबपाणी घालावयाचे आहे जेणेकरुन त्यांनी हे दृश्य बघावे. एका कवीचे असे म्हणणे आहे की,

हुस्न का एक शेरा है
जब इश्क नजर आये
तो पर्दे में चले जाना
शरमाते रहना

जे चांगले आहे ते चांगले स्वीकारण्याची दानत हा संस्काराचा भाग आहे. हा संस्कार आपल्यावर झालेला आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

परंतु बळेच रेटण्याचे काम सुरु आहे ते बंद करावे अशी आग्रही मी विनंती करतो.

नद्यांचे संवर्धन करण्याची संकल्पना राज्यपालांनी मांडलेली आहे. आज महाराष्ट्रामध्ये वाळू माफीया नद्यांचे शोषण करीत आहेत. हे शोषण थांबविले पाहिजे. हे शोषण थांबविले तरच नद्या जोड प्रकल्प यशस्वी होणार आहे. म्हणून नद्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे संतुलन राखणारी नदी आमची माता आहे. त्यामुळे ही संकल्पना अतिशय चांगली आहे.

सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्र्यांनी दिनांक 12.12.2012 पर्यंत लोडशेडिंगमुक्त महाराष्ट्र अशी संकल्पना मांडलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्र लोडशेडिंगची आतुरतेने वाट पहात आहे. आदरणीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडे जे खाते जाते ते खाते जाते होऊन फिरते. त्या जात्याचा खुंटा दादांकडे आहे. त्यामुळे त्यांना माझी विनंती आहे की, आपण हा खुंटा जरा जोरात फिरवावा. त्यामुळे डिसेंबर, 2012 पर्यंत महाराष्ट्र भारनियमनमुक्त झालेला असेल. त्यामुळे विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या डोक्यातही प्रकाश पडेल.

सभापती महोदय, राज्यपालांनी 100 कोटी वृक्षांचा संकल्प केला आहे. वन खाते माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांच्याकडे आहे. सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम हे अतिशय कर्तबगार आहेत. ते म्हणजे वटवृक्ष आहेत. या वटवृक्षाची मुळे व पारंब्या एक झालेल्या आहेत. या पारंब्या व मुळांनी जर प्रशासन आवळले तर मला अशी खात्री आहे की, 100 कोटी वृक्ष महाराष्ट्रात लागतील, त्यांचे जतन होईल, संवर्धन होईल आणि भविष्यामध्ये तरुण पिढी त्या वृक्षांखाली अभ्यास करण्यासाठी बसलेली दिसेल. त्यावेळी ते माननीय वन मंत्र्यांना आशीर्वाद देतील. तुमचा वेल मांडवावर जावो. उतरंडी भरुन पावो, खापराची मडकी सोन्याची होवोत. अशा प्रकारच्या शुभेच्छा ते दिल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांचा पतंग आकाशात उंच उडो. अशी सदिच्छा मीही यानिमित्ताने व्यक्त करतो.

मी एवढेच सांगेन की, बाभुळ, सुबाभुळ या झाडांबरोबर वड, पिंपळ, चिंच, आंबा, काजू यांची झाडे असावीत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस कडू लिंबाच्या झाडांचा उल्लेख करीत आहेत. पण मी त्यांना सांगेन की, आमच्याकडे गोड फळांची झाडेच रुजलेली

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.सुरेश नवले.....

नाहीत, कडू लिंब तर औषधी वनस्पती आहे. गुढी पाडव्याच्या दिवशी कडू लिंबाची पूजा केली जाते. त्या भारतीय संस्कृतीच्या पूजक आहेत. आपण अंहिसा, सत्य, ब्रम्हचर्य असे म्हणणाऱ्या आहात. परंतु संस्कृतीचे जतन आपल्याकडून होत नाही हे आमचे दुर्दैव आहे. महाराष्ट्रात कोणाच्या लग्नाला जाऊ नका असे आदेश काढले जातात, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे काय असे मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना विचारतो. माननीय श्री.नारायण राणे साहेबांच्या मुलाच्या लग्नाला जाऊ नये अशा प्रकारचे फर्मान काढण्यात आले होते. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे काय ? ते जे संस्कृती जपत आहेत त्यात सुधारणा व्हावी अशी मला अपेक्षा आहे. आकांक्षा आहे, इच्छा आहे, भावना आहे, आशा आहे. आपण आशेची निराशा करु नये एवढीच माझी अपेक्षा आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यामध्ये 4.21 लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. त्याबद्दल सिंचन खात्याला मी मनापासून धन्यवाद देतो. जी कोरडवाहू शेती आणि पडीक जमीन आहे ती ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला तर तो योग्य अशा प्रकारचा निर्णय होईल.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना फक्त 8 जिल्ह्यांना लागू करण्यात आलेली आहे. ही योजना सर्व महाराष्ट्राला लागू करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-यांचे, सर्वसामान्य माणसाचे दरडोई उत्पन्न अतिशय कमी आहे. त्यामुळे राजीव गांधी जीवनदायी योजना संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भाला लागू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, उच्च महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनातर्फे 10 वसतिगृहे बांधण्यात येणार आहेत. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. बीड जिल्ह्यामध्ये ऊसतोड कामगार आणि कष्टकरी फार मोठया प्रमाणावर आहेत. श्रमाला प्रतिष्ठा देणा-यांचा हा बीड जिल्हा आहे. त्यामुळे अशा जिल्ह्यामध्ये वसतिगृह केले तर या शासनाला निश्चितपणे गोरगरिबांचा दुवा मिळेल आणि पुढील 25 वर्षे हे आघाडीचे शासन महाराष्ट्रामध्ये राहील. म्हणून किमान त्यासाठी तरी हे काम या शासनाने करावे. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती योजना शासनाने जाहीर केलेली असून 172 विद्यार्थ्यांवर 28.42 कोटी रु. खर्च करण्यात आलेले आहेत. परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची महाराष्ट्रातील खूप विद्यार्थ्यांची इच्छा असते. ही शिक्षणाची त्यांची अभिलाषा महाराष्ट्र सरकारने पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत.

सभापती महोदय, मुंबईमध्ये मोनो आणि मेट्रो रेल हातात हात घालून धावणार आहेत. "गाडी बुला रही है, शिटी बजा रही है" हे गाणे मला या निमित्ताने आठवले. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, मोनो आणि मेट्रो रेल हातात हात घालून, घड्याळाकडे पाहून लवकरात लवकर धावतील या दृष्टीने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, शासनाने बौद्ध परिक्रमा प्रकल्पाला मंजुरी दिलेली आहे. मी हिंदू असलो तरी बुद्धाचा उपासक आहे. प्रत्येकाच्या आत मध्ये एक बुद्ध दडलेला असतो. कर्नाटक सरकारला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

त्यांच्यातला बुद्ध जागा करण्यास सांगण्याची गरज आहे. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणा-या आंदोलकांवर अत्याचार करण्याचे काम ते करीत आहेत. त्यामुळे त्यांच्यातील बुद्ध जागा झाला पाहिजे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. यामध्ये कर्नाटक सरकारचा विषय कुठे येतो ? सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र सरकारबद्दल काय ते बोलावे, राज्याच्या मंत्रिमंडळाबद्दल बोलावे. कर्नाटक राज्यापेक्षा पहिल्यांदा आपण आपल्या राज्यातील बुद्धाला जागे करायला सांगा. ज्यांनी 1952मध्ये गोळीबार केला, अनेक लोकांना मारहाण केली त्या सरकारमधील बुद्ध जागा करा....

प्रा. सुरेश नवले : सीमाप्रश्नासंबंधी सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे. त्यासंबंधी मी उल्लेख केला. सीमावर्ती भागामध्ये आंदोलन करणा-यांवर अन्याय केला जात आहे. त्यामुळे त्यांच्यातील बुद्ध जागा व्हावा ही अपेक्षा आहे. बौद्ध परिक्रमा प्रकल्पामुळे संपूर्ण जगातून पर्यटक महाराष्ट्रामध्ये येतील. महाराष्ट्राची माती कपाळाला लावतील आणि बुद्धाची शांती आणि अहिंसा मनामध्ये जपतील. बुद्धं शरणं गच्छामि, धंमम् शरणम् गच्छामि, संघम् शरणम् गच्छामि.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

माननीय श्री. धनंजयराव तुम्ही बुध्दांचा मंत्र जपा त्यामुळे तुम्हाला अंत:प्रेरणा मिळेल आणि पुन्हा तुम्हाला नव्या दमाने संघर्ष करण्याची शक्ती प्राप्त होईल. मला राज्य शासनाला विनंती करावयाची आहे की, शासनाकडून हा प्रकल्प राबविला जात आहे, भारत ही बुध्दाची भूमी आहे. या बुध्दाच्या भूमिला पुन्हा एकदा नतमस्तक होऊन माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि आपली सर्वांची रजा घेतो. धन्यवाद.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी विचार मांडले आणि त्यास माननीय सदस्य सर्वश्री.उल्हास पवार, हेमंत टकले यांनी अनुमोदन दिले. तसेच सन्माननीय सदस्यांनी सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांचे अभिनंदनही केले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मी देखील माझे विचार व्यक्त करीत आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे एक सोपस्कार आहे. खरे तर असे वाटले होते की, महाराष्ट्राला नवी दिशा देणारे अभिभाषण असेल. हे अभिभाषण म्हणजे बजेटमध्ये येणाऱ्या सर्व तरतुदींचा एक आरसा आहे असे वाटते. पण दुर्देवाने असे काही घडत नाही म्हणून आम्हाला या अभिभाषणाचा खेद व्यक्त करावा लागतो आहे.

सभापती महोदय, मघाशीच सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी 20 लक्ष कोटी रुपये उत्पादनाच्या स्वरुपात शासनास प्राप्त होईल. तेवढे पैसे उपलब्ध झाले तर या राज्यावरील सर्व कर्ज संपेल. तसेच त्यांनी 21 कोटी रोजगार तयार होईल असेही त्यांनी माहिती दिली. 20 लक्ष कोटी रुपये उत्पादनाच्या स्वरुपात प्राप्त झाले तर या राज्यावर कर्जाचा डोंगर आहे, तो कर्जाचा डोंगर अर्ध्यावर निश्चितपणे येऊ शकेल. आपण अशी अपेक्षा करु की, पुढील वर्षी शासनाच्या वतीने मांडण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पात फिस्कल डेपिसिट वैगरे प्रकार नसेल. अजून एक वर्ष आहे, दरम्यानच्या कालावधीत काय होते ते पाहू.

सभापती महोदय, या अभिभाषणाच्या निमित्ताने मी काही गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. माननीय राज्यपाल हे मुंबई विद्यापीठाचे कुलपती आहेत. मुंबई विद्यापीठाची सत्ता त्यांच्या हातात आहे. आज या मुंबई विद्यापीठाकडे जवळ जवळ 14 हजार विद्यार्थ्यांनी पाठ फिरविली आहे हे दुर्देवी सत्य आपल्यासमोर आहे. 2008-09 मध्ये 99548 विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला होता. 2009-10 मध्ये 2,30,148 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. 2010-11मध्ये 2,15,859 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. म्हणजे तब्बल 14 हजार विद्यार्थी मुंबई विद्यापीठात कमी झाले. आज या विषयावर तारांकित प्रश्न होता. परंतु वेळे अभावी तो प्रश्न सभागृहात चर्चेला येऊ शकला नाही. मुंबई विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली आहे, त्याची कारणे काय आहेत याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात याबाबतचा उल्लेख असावयास पाहिजे होता. या गोष्टीची जाणीव माननीय राज्यपाल महोदयांना आहे की नाही याची मला माहिती नाही.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपल्या भाषणात असा उल्लेख केला की, मुंबई विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 14 ते 15 हजाराने कमी होत आहे. आपण याचा उलट अर्थ कशासाठी घ्यावयाचा ? विद्यापीठापेक्षा इतर कोर्सेस देणाऱ्या संस्था वाढत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल तिकडे गेला असेल, त्यामुळे विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चितपणे कमी-जास्त होऊ शकते. त्यामुळे त्याचा विद्यापीठाला दोष देण्यात काही औचित्य आहे असे मला वाटत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबतीतील उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उत्तराच्या भाषणात केला तर बरे होईल असे मला वाटते. मुंबई विद्यापीठाचे एक वेगळे नाव आहे. मुंबई विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असतात. या वर्षी अचानक 14 हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश का घेतला नाही याची माहिती मी नंतर सांगतो. मुंबई विद्यापीठात प्राचार्य नाहीत. प्राचार्य शोधण्यासाठी विद्यापीठ दारोदार फिरत आहेत. पदवी महाविद्यालयामध्ये 319 प्राचार्य कमी आहेत. एकूण 620 पदे आहेत. त्यात रिक्त पदे 319 एवढी आहेत. मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयाला प्राचार्यच नाहीत. ज्या विद्यापीठातील महाविद्यालयांमध्ये प्राचार्यच नाही, त्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यास कोण उत्सुक असणार ? माहितीच्या अधिकारात ही सर्व माहिती मी मिळवून घेतली आहे. मुंबई विद्यापीठातील 9 महाविद्यालयात प्राचार्यच नाहीत याबाबतची त्या महाविद्यालयांकडून माहितीच दिली जात नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

ही मुंबई विद्यापीठाची स्थिती आहे. माननीय राज्यपाल हे सर्व विद्यापीठांचे प्रमुख आहेत. आज खाजगी विद्यापीठांचे भवितव्य अंधारात आहे. खाजगी विद्यापीठासंबंधीचे विधेयक माननीय राज्यपालांकडे मान्यतेसाठी पडून आहे. या सभागृहात मंजूर झालेल्या विधेयकाला सार्वत्रिक विरोध झाला. सभागृहात विधेयक मंजूर होत असताना कोणी भूमिका मांडली नाही. विधेयकावर चर्चा करीत असताना आम्ही विरोध केला होता. अशा विधेयकामध्ये कोणकोणत्या तरतुदी असावयास पाहिजेत हे आम्ही सांगितले होते. सामाजिक घटकांसाठी जागा राखून ठेवल्या पाहिजेत, त्यांचा समावेश होणे आवश्यक आहे असे आम्ही आवर्जून सांगितले होते. परंतु केवळ परदेशी विद्यापीठे आपल्या देशात यावीत म्हणून विधेयक अडवून ठेवले आहे.

सभापती महोदय, आज एमपीएससीची अवस्था तशीच झालेली आहे. महाराष्ट्रातील तरुणांनी सनदी अधिकारी व्हावे यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. परंतु एमपीएससीच्या परीक्षेतील कृषी विषयाचे काय झाले? सभागृहामध्ये या विषयावरील लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. कृषी विषयाचा समावेश करण्यास शासन तयार नाही. शेतकऱ्याच्या मुलाला 25 गुण मिळत होते, ते आता 7.5 टक्क्यावर आणले गेले. हे या राज्यातील शेतकऱ्यांचे आणि पर्यायाने त्यांच्या मुलांचे दुर्दैव आहे. या संदर्भात माननीय राज्यपालांनी लक्ष द्यावे एवढीच माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अभिभाषणातील 74 वा मुद्दा महत्वाचा आहे. राज्य सरकारकडून माननीय राज्यपालांची फसवणूक कशी केली जाते हे या मुद्यावरुन दिसून येते. राज्यातील आदिवासी विकासासाठी विविध योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत आणि त्यांच्या मासिक निर्वाह भत्त्यामध्ये विभागीय स्तरावर 200 रुपयांवरुन 800 रुपये, जिल्हा स्तरावर 75 रुपयांवरुन 600 रुपये आणि तालुका स्तरावर 50 रुपयांवरुन 500 रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. उदाहरण म्हणून सांगू इच्छितो, ठाणे जिल्हयातील शहापूर, मुरबाड, किन्हवली, खर्डी, उल्हासनगर आणि नवी मुंबई येथील विद्यार्थ्यांना चार महिन्यांपासून निर्वाह भत्ता मिळालेला नाही. शहापूर आदिवासी प्रकल्पांतर्गत या मुलांचा समावेश आहे. शहापूर, मुरबाड, किन्हवली, खर्डी, उल्हासनगर आणि नवी मुंबई येथील आदिवासी विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता गेल्या चार महिन्यांपासून मिळालेला नाही. विद्यार्थ्यांनी या भत्त्याच्या रक्कमेतून तेल, कंगवा, साबण खरेदी करायचे आहे. या विद्यार्थ्यांना आता काय करायचे? 702 मुले आणि 190 मुली इतकी अल्प संख्या असताना सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.गिते... 17:15

डॉ.दीपक सावंत.....

राज्य शासन निर्वाह भत्ता देऊ शकत नाही.

सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे 200 कोटी रुपये थकलेले आहेत. खाजगी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी परताव्याची रक्कम 16 फेब्रुवारी, 2012 पर्यंत परत करावी असे सुप्रीम कोर्टाने सांगितले होते. आजपर्यंत हा परतावा दिलेला नाही. म्हणून कोर्टाने आदेश दिले की, विभागाच्या प्रधान सचिवांनी कोर्टात हजर रहावे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांची गैरहजेरी कमी करण्यासाठी शासनाने पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. वास्तविक शासनाने उपस्थिती भत्ता रद्द करुन शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने घ्यायचे असा हा प्रकार आहे. आश्रमशाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची तरतूद करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे असे म्हटले आहे. परंतु आदिवासी आश्रमशाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करायला शिक्षक उपलब्ध आहे का? बायोमॅट्रिक पध्दत लागू करण्यास सभागृहाने मान्यता दिली त्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक जात नाहीत, तेथे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची काय व्यवस्था केलेली आहे? आश्रमशाळांमध्ये खडू-फळा नाही, मुले कुडाच्या भिंती फळा म्हणून वापरतात, कपाटाचा दरवाजा फळा म्हणून वापरतात, तेथे व्यवसाय प्रशिक्षण कोण देणार?

सभापती महोदय, हज यात्रेसंबंधी अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. मी त्यासंबंधी बोलू इच्छित नाही. परंतु 2012 पासून 7 विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या सभागृहात याच विषयावर लक्षवेधी सूचना चर्चेला आलेली होती. मिलन सबवे येथील पुलाखाली मदरसा होता, त्या ठिकाणी मस्जीद बांधण्याचे काम सुरु आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

मुंबईचे पोलीस आयुक्त माननीय श्री. अरुप पटनाईक यांनी सुध्दा विरोध केला होता की अशा ठिकाणी आपण मस्जीद बांधू नका तरी देखील ती बांधण्यात आली आणि ती देखील पोलिसांच्या संरक्षणात बांधली गेली. तसेच पूर्वी या जागेचे क्षेत्रफळ केवळ 280 चौ. फूट इतकेच होते पण आता तर एमएमआरडीए ने त्यासाठी 1200 चौरस फूट जागा दिली. यासाठी मुंबई महापालिका व राज्य शासनाचा विरोध असतानाही ही जागा देण्यात आली आहे.

महोदय, मुद्दा क्र. 69 मध्ये म्हटले आहे की, "परदेशातील प्रमुख विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ज्यांना परवडत नाही अशा अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता, शासनाने त्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करण्याची योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत 172 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी 28.42 कोटी रुपये इतकी रक्कम प्रदान करण्यात आली आहे." शासन गेल्या कित्येक वर्षांपासून या मुलांचा शैक्षणिक स्तर वाढावा म्हणून प्रयत्न करीत आहे मग आजपर्यंत फक्त 172 मुलांनाच का निवडण्यात आले, एवढीच मुले शासनाला मिळाली आहेत काय याचाही अंतर्मुख होऊन विचार होणे आवश्यक आहे.

महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी 10 वसतिगृहे शासनाने तयार करावीत यासाठी मी अर्धा-तास चर्चा देखील सभागृहात उपस्थित केली होती. त्याबाबत अद्यापही शासनाने विचार केलेला दिसत नाही. तसेच मुंबईत राज्यातूनच रोजगारासाठी जी मुले व मुली येतात ती सकाळी येतात आणि सायंकाळी त्यांना परत जावे लागते. अशा मुलांना मुलाखतीसाठी मुंबईत आल्यानंतर एक दिवसाची विश्रांती मिळावी व त्यासाठी त्यांना हॉटेल्समध्ये राहणे परवडत नाही म्हणून ही वसतिगृहे वेगवेगळ्या भागात असावीत अशी मी मागणी केली होती. त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी ही योजना मान्य केली होती. त्यासंदर्भात बैठका देखील झाल्या होत्या आणि शेवटी नवी मुंबईत त्यासाठी जागा देण्यात येईल म्हणून सभागृहातच सांगण्यात आले होते पण त्याचे पुढे काय झाले याचा खुलासा होणे आवश्यक आहे तसेच या 10 वसतिगृहांसाठी कोठे व कशी जागा मिळेल याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर राजीव गांधी आरोग्य योजनेचा उल्लेख करण्यात आला. या योजनेच्या माध्यमातून 1.50 लाख रुपयापर्यंतची मर्यादा शासनाने वाढविलेली आहे. तसेच त्या अंतर्गत 972

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

विविध प्रकारच्या रोगांवर उपचार करण्यात येईल असेही सांगण्यात आले आहे. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी अभिभाषणामध्ये ही योजना केवळ आठ जिल्ह्यापुरतीच मर्यादित असल्याचे सांगितले. ही योजना राज्यातील 8 जिल्ह्यांपुरतीच मर्यादित आहे की संपूर्ण राज्यासाठी लागू आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. कारण माननीय आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी जो सोहळा आयोजित केला होता ती योजना कोणती व अभिभाषणातून उल्लेख केलेली योजना कोणती याची माहिती मिळणे अपेक्षित आहे. कारण अशा प्रकारे दोन योजना असतील तर त्या एकमेकांवर विरोधाभास तयार करतील अशी भीती वाटते. तसेच आपल्या राज्यात बालमृत्युचा दर आजपर्यंत 28 एवढा होता आणि माता प्रसूतीच्या दरम्यान मृत्यू पावण्याचा दर प्रति लाख 104 एवढा घटलेला आहे असेही सांगण्यात आले. पण राज्यातील कुपोषणाची परिस्थिती काय आहे, ज्याची नोंद संपूर्ण जगाने घेतलेली आहे तसेच आपल्या माननीय पंतप्रधानांनी सुध्दा घेतलेली आहे त्याबाबत शासनाची कोणती योजना आहे याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे खेड्यात कुपोषण होते तसे शहरात सुध्दा टॉवरच्या छायेत कुपोषणाचे प्रमाण वाढत चालले याचा शासनाने विचार केला आहे काय ? फक्त दर घटला म्हणून समाधान न मानता शासनाने वेगवेगळ्या ज्या योजना आखल्या आहेत त्या केवळ कागदावरच राहतात व त्यांचा फायदा मात्र प्रत्यक्षात होत नाही. त्यात माहेर योजना, जननी सुरक्षा योजना अशा योजनांची आकडेवारी ही फसवीच आहे असे माझे ठाम मत आहे, त्याचाही शासनाने विचार केला पाहिजे.

महोदय, पर्यावरण आणि तंत्र प्रदूषण व्यवस्थेबाबत बोलताना मी असे म्हणेन की नुकताच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी पर्यावरणाच्या नावाखाली एवढा बाऊ केला पण ग्लोबल वॉर्मिंगचा उल्लेख मात्र माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कुठेही दिसत नाही. पुढील काळात कदाचित पाऊस जास्त पडला, अवेळी पाऊस झाला आणि समुद्राच्या लाटांचे प्रमाण वाढून मुंबईत पाणी शिरले तर कोणत्या व्यवस्थेचा शोध घेणार याचा मात्र कोठेच उल्लेख नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, आज आपण मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करीत आहोत. परंतु संपूर्ण राज्यामध्ये 2.25 लक्ष मुले शिक्षणापासून वंचित आहेत असा "असर" या संस्थेचा रिपोर्ट आहे. एकूण 2.18 लक्ष मुलांपैकी 42 हजार मुले कधीही शाळेत गेलेली नाहीत. करोडो रुपये खर्च करुन सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून काय मिळवले हा माझ्या मनात प्रश्न आहे. राज्यातील वेगवेगळया शाळांमधून 1.76 लक्ष मुले ड्रॉपऑऊट आहेत. त्यामुळे यासंदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्याशिवाय पर्याय नाही. राज्य शासनाने माननीय राज्यपाल महोदयांना जी काही आकडेवारी दिलेली आहे ती फसवी दिलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण आता केवळ एक उपचार म्हणून राहिले आहे एवढे सांगून माझे दोन शब्द संपवितो.
जय हिंद, जय महाराष्ट्र

उप सभापती : आता अर्धातास चर्चा घेण्यात येईल. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषवरील उर्वरित चर्चा उद्या घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अनुदानित शाळामधील कायम विनाअनुदानित तुकडयांचा कायम शब्द वगळणे

मु. शी. : अनुदानित शाळामधील कायम विनाअनुदानित तुकडयांचा कायम शब्द वगळणे यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"दिनांक २० जुलै, २००९ च्या शासन निर्णयानुसार कायम विना अनुदानित शाळांचा परवानगी आदेशातील कायम शब्द वगळण्याचा शासनाने निर्णय घेणे, राज्यातील सुमारे ४,००० हजार प्राथमिक व माध्यमिक शाळांना या निर्णयाचा लाभ होणे, कायम विना अनुदानित शाळांबरोबरच वाढीव तुकड्यांना शासनाने कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देणे, अशासकीय अनुदानित शाळांमध्ये शेकडो तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर सुरु असणे, कायम विना अनुदानित तुकड्यांचा कायम शब्द न वगळणे, शेकडो तुकड्या व तुकड्यांवर काम करणारे शिक्षक वेतनापासून वंचित राहणे, शाळांप्रमाणे अनुदानित शाळांमधील कायम विना अनुदानित तुकड्यांचा कायम शब्द वगळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, अर्धातास चर्चेच्या माध्यमातून राज्यातील अनुदानित संस्थामधील कायम विना अनुदानित शाळांचा प्रश्न या निमित्ताने मी मांडू इच्छितो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये ब-याचशा प्राथमिक व माध्यमिक शाळा 100 टक्के अनुदानित आहेत. मध्यंतरी शासनाने 24 नोव्हेंबर, 2001 रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा कायम विना अनुदानित तत्वावर देण्याचा निर्णय घेतला. त्याच बरोबर शासनाने अनुदानित शाळांमध्ये वाढीव तुकडया दिल्या त्या सुध्दा अनुदानावर,टप्पानिहाय अनुदानावर किंवा विना अनुदानितवर देण्याऐवजी राज्य शासनाने या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

तुकडयांना सुध्दा कायम विना अनुदानावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. परिणामत: 24 नोव्हेंबर, 2001 नंतर या राज्यातील नवीन प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळांना शासनाने परवानगी दिली. या सर्व शाळा कायम विना अनुदानित तत्वावर दिल्या गेल्या. इतकेच नव्हेतर ज्या शाळांना 100 टक्के अनुदान आहे त्या शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा पगार राज्य शासनाकडून होत आहे. अशा शाळामध्ये विद्यार्थी संख्या वाढली किंवा अन्य कारणामुळे तुकडी वाढली, वाढीव तुकडी, अतिरिक्त तुकडी निर्माण झाली तर या तुकडयांना सुध्दा राज्य शासन कायम विनाअनुदानित या तत्वावर मान्यता दिली.

सभापती महोदय, 7-8 वर्षापासून सातत्याने हा विषय सुरु होता की, या राज्यामध्ये विशेषत: ज्या शाळा ग्रामीण भागात, झोपडपट्टी भागात सुरु आहेत अशा शाळा कायम विनाअनुदानित तत्वावर चालू शकत नाही, या शाळा बंद पडावयास लागल्या, शिक्षकांना पगार मिळेनासे झाले त्यामुळे या शाळांचा कायम शब्द काढावा, या शाळानांही अनुदान देण्याची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी अशी सातत्याने मागणी होत होती. यासंदर्भात संघटनांनी आंदोलने केली, सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चाही झाली. या सर्व विषयांचा शासनाने गांभीर्याने दखल घेतल्यामुळे मी माननीय मंत्रीमहोदयांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सर्व कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढून टाकण्यात यावा अशी सर्वांचीच मागणी होती. यामध्ये इंग्रजी माध्यम वगळून प्राथमिक, माध्यमिक शाळा या सर्व शाळांचा "कायम" शब्द शासनाने काढला व दि. 20 जुलै, 2009 रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

त्या सर्व शाळांचे मूल्यांकन होईल व त्यांना अनुदान मिळेल. किमान त्या शाळा आता विना अनुदानित झाल्या आहेत. त्या शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना भविष्यामध्ये अनुदान मिळण्याचा, वेतन मिळण्याचा महत्त्वाचा मार्ग मिळाला. एक चांगला दिलासा शिक्षकांना मिळू शकला. सदर जी.आर.निघाल्यानंतर कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना विना अनुदानित झाल्याबद्दल दिलासा मिळाला.

या राज्यातील ज्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना 100 टक्के अनुदान मिळते तेथे सुद्धा कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिलेल्या ज्या तुकड्या आहेत. त्यांचा सुद्धा कायम हा शब्द काढून टाकणे आवश्यक होते. शासनाचा 20 जुलै 2009 चा शासन निर्णय निघाला त्यात फक्त शाळांचा उल्लेख करण्यात आला. तुकड्यांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. त्यामुळे हा जी.आर.निघाल्यानंतर आम्ही सातत्याने मागणी करीत होतो. मी तत्कालीन अवर सचिव श्रीमती सुवर्णा खरात यांना भेटलो. मी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये माहिती मागितली की, किती तुकड्यांचा कायम शब्द काढल्यानंतर भविष्यामध्ये आपल्याला अनुदान द्यावे लागेल. मला माहितीच्या अधिकारामध्ये परवा म्हणजे 15 मार्चला उत्तर मिळाले आहे की, अशा प्रकारची कोणतीही माहिती आमच्याकडे उपलब्ध नाही. शासनाकडे अशी कुठलीच माहिती नाही की अशा किती तुकड्या आहेत. अनुदानित शाळामधील कायम विना अनुदानावर सुरू असलेल्या, शासनाने मान्यता दिलेल्या तुकड्यांची संख्या किती याबद्दल माझा तसा काही आक्षेप नाही. सर्व संस्था चालकाची मागणी आहे की, शाळांप्रमाणेच कायम विना अनुदानित तुकडीमधील कायम शब्द वगळावा. या संबंधी मी शासनाला अनेक वेळा पत्र लिहिली आहेत. गेल्या 3 वर्षापासून माझा पत्रव्यवहार सुरू आहे. मी आदरणीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. त्यांचे देखील मला उत्तर आले. आदरणीय उप मुख्यमंत्री महोदय यांना देखील पत्र लिहिले. त्यांचे देखील मला उत्तर आले. आदरणीय शिक्षण मंत्री महोदयांना देखील पत्र लिहिले. त्यांची देखील दोन पत्रे मला आलीत. हा विषय शासनाच्या विचाराधीन आहे. आम्ही विचार करीत आहोत. अशा प्रकारचे उत्तर मला देण्यात आले होते. काल मला माहिती मिळाली की, आता शासन निर्णय तातडीने निर्गमित होत आहे. अद्यापि तो निर्णय निर्गमित झालेला नाही. मी आज सकाळी देखील नेटवर जी.आर.निर्गमित झाला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

आहे की नाही हे पाहिले होते. शासन निर्णय घेणार आहे अशी माझ्याकडे माहिती होती.

या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, 100 टक्के अनुदानित शाळांमधील कायम विना अनुदानित तुकड्यांचा, शाळांप्रमाणेच "कायम" हा शब्द वगळण्यात यावा. या सगळ्या शाळा विना अनुदानित सजमण्यात याव्यात. आपण शाळांचे मूल्यांकन करणार आहोत आणि टप्पानिहाय अनुदान देणार आहोत. या तुकडयांना सुद्धा आपण जेव्हा पासून मान्यता दिली आहे, तेव्हा पासून या तुकड्यांचे वय विचारात घ्यावे. साधारणपणे आपण 4 वर्षे अनुदान देत नाही. पाचव्या वर्षी पासून आपण 20 टक्के, 40 टक्के अनुदान देतो. 24 नोव्हेंबर 2001 रोजी धोरणात्मक निर्णय

झालेला आहे. माझ्याकडे अनेक शाळांची यादी आहे. ज्यांना 24 नोव्हेंबर 2001 पूर्वी म्हणजे 1998 व 2000 मध्ये कायम विना अनुदानित तुकड्या दिलेल्या आहेत. या सर्व तुकड्यांचा कायम शब्द काढून त्यांचे वय विचारात घेऊन टप्पा निहाय अनुदानासाठी पात्र धरावे आणि लवकरात लवकर अनुदान देण्यात यावे. नव्हे येत्या शैक्षणिक वर्षामध्ये अनुदान देण्याचा विचार करावा अशा प्रकारची नम्र विनंती सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी शासनाला आणि माननीय मंत्रिमहोदयांना करतो. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी येथे जी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे ती अतिशय महत्त्वाची आहे. त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या राज्यातील चार हजार प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील कायमचा शब्द दिनांक 20 जुलै 2009 रोजीच्या जी.आर.नुसार काढला आहे, असे आता येथे सांगण्यात आले. 19 नोव्हेंबर रोजी मूल्यांकनाबाबत जी.आर.काढला आहे. कायम विनाअनुदान तत्त्वावर शाळा देत असतानाच ज्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे त्या शाळेत काही तुकड्या कायम विनाअनुदानावर दिलेल्या आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याला कोणतेही अनुदान नाही. ज्या नियमाने शाळा मंजूर केलेल्या आहेत, तशाच पध्दतीने तुकड्या मंजूर केलेल्या आहेत आणि त्यांची संख्या फार नाही. ही संख्या प्राथमिक शाळांमध्ये कमी आहे आणि माध्यमिकमध्ये त्यापेक्षाही कमी आहे.जर उच्च माध्यमिक शाळा असेल तर तेथे या तुकड्यांवर शिक्षक नेमलेले आहेत. त्याला शासनाची मान्यता आहे पण त्यांच्यासाठी "कायम" हा शब्द नाही. म्हणून मी विनंती करतो की, शासनाने या तुकड्यांच्या संबंधातील "कायम" हा शब्द काढून ज्या कायम अनुदान तत्वावरील शाळा आहेत, त्यांच्याबरोबरच या तुकड्यांचे मूल्यांकन करुन त्यांना सुध्दा अनुदान देण्यासंबंधीचा शासन निर्णय घ्यावा आणि ताबडतोब शासनाने कायम शब्द काढावा असा शासन निर्णय निर्गमित करावा अशी मी विनंती करतो.

. . . .3 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, याठिकाणी दि.20 जुलैच्या शासन निर्णयाबद्दल चर्चा सुरु आहे. यामध्ये 10 वी पर्यंतच्या शाळांच्या बाबतीत कायम हा शब्द काढलेला आहे आणि आता तुकड्यांच्या संदर्भात "कायम" हा शब्द काढण्याचा विषय चर्चेसाठी आलेला आहे. मला दोनच उप प्रश्न विचारावयाचे आहेत. एक म्हणजे तुकड्यांचा कायम हा शब्द काढल्यानंतर या तुकड्या अनुदानित शाळांमधील असल्यामुळे त्यांच्या मुल्यांकनाची कोणतीही आवश्यकता नाही. त्यांना वयोमानाने अनुदान दिले पाहिजे हा विषय शासनाच्या विचाराधीन आहे काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, कायम अनुदानाच्या तुकड्या अकरावी व बारावीच्या अनुदानित शाळा-कॉलेज मध्ये दिलेल्या आहेत. त्यांचाही कायम शब्द काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने मी फक्त शासनाची धोरणात्मक बाजू समजून घेऊ इच्छितो. शासनाने माध्यमिक शाळा संहिता तयार केली. ही संहिता म्हणजे संस्था आणि शासन यांच्यातील करार होता. शाळांना मान्यता देणे आणि अनुदान देणे यासंदर्भात माध्यमिक शाळा संहितेमध्ये तरतुदी असून आजही त्या कायम आहेत. त्या तरतुदीनुसार शासन शाळांना अनुदान देणार आहे की देणार नाही ? तसेच नवीन धोरणानुसार शासन अनुदानाबाबत जे धोरण आहे, त्याची अंमलबजावणी करणार आहे काय ?

. . . .3 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 04 नोव्हेंबर 2001 मध्ये शासनाने मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेतला आणि त्यानुसार कायम हा शब्द काढण्यात आला. त्यानंतर दिनांक 24 नोव्हेंबर 2001 मध्ये याबाबतीत शासन निर्णय निर्गमित झाला. त्यानंतर शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मान्यता शासनाकडून देण्यात आली आणि त्याचप्रमाणे अतिरिक्त तुकड्यांना, जादा तुकड्यांना सुध्दा कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर 16 जून 2009 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, कायम शब्द हे प्राथमिक आणि माध्यमिक तसेच इंग्रजी शाळा वगळून काढण्यात यावा. त्यानुसार हा शब्द काढण्यात आलेला आहे आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय 20 जुलै 2009 मध्ये निर्गमित करण्यात आला. त्यावेळी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, 2012-2013 या वर्षामध्ये मूल्यांकन करुन नवीन अनुदान सूत्राप्रमाणे जर त्या शाळा त्यामध्ये बसत असतील तर त्यांना अनुदान देण्यात यावे. याबाबतीत असे गृहीत होते की, जर शाळेच्या बाबतीत कायम शब्द वगळण्यात आलेला आहे तर आपोआपच तुकड्यांच्या बाबतीत तसे होणार आहे.पण यामध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आणि यामध्ये अशा प्रकारचा संभ्रम नसावा म्हणून दि.9 मार्च 2012 रोजी प्राथमिक तुकड्यांसाठी हा निर्णय घेण्यात आला आणि त्याबाबत शासन निर्णय काढण्यात आला. पण 9 मार्च 2012 च्या शासन निर्णयामध्ये माध्यमिक शाळांच्या संबंधातील निर्णय घे्ण्याचे राहिले होते.त्याच्यामुळे 15 मार्च रोजी माध्यमिक शाळांच्या बाबतीत देखील शासन निर्णय काढण्यात आलेला असून तो संकेत स्थळावर देखील टाकण्यात आलेला आहे.आज शासनाने असा निर्णय घोषित केलेला आहे की,जसे आपण शाळांच्या संबंधातील कायम हा शब्द काढलेला आहे, त्याप्रमाणे अतिरिक्त आणि जादा तुकड्यांच्या बाबतीत देखील कायम हा शब्द काढण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.शिगम अ. . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी उच्च माध्यमिक शाळांतील तुकड्यांचा कायम शब्द काढून टाकणार आहात काय असा प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छिते की, ही बाब अजून शासनाच्या विचाराधीन आहे, त्याबाबत अजून निर्णय झालेला नाही.

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सांगितले की, वयानुसार तुकड्यांना अनुदान द्यावे. त्याबाबत सांगू इच्छिते की, याबाबत शासनाचा निर्णय झालेला नाही. शासनाने शाळांचे मूल्यांकन करुन आणि सन 2012-2013 पासूनच नवीन अनुदान सूत्राप्रमाणेच अनुदान देण्याचे ठरविलेले आहे. त्याप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, धोरणात्मक निर्णय शासनच घेणार आहे आणि शासनाने घेतलेला निर्णय आम्हाला मान्यच करावा लागतो, तो आमचा नाईलाज आहे. शाळांचे मूल्यांकन करणे वगैरे बाबी ठीक आहेत. शाळांमध्ये भौतिक सुविधा आहेत काय, शाळेत नेमलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच अन्य बाबींची पूर्तता होत आहे किंवा नाही याची पाहणी करणे या सर्व गोष्टी ठीक आहेत. परंतु ज्या शाळांना 100 टक्के अनुदान मिळते त्या शाळांतील तुकड्यांना मान्यता आहे. विद्यार्थी संख्या पुरेशी आहे. शाळेने रोष्टरचे बंधन पाळलेले आहे. शिक्षकांच्या नेमणुका झालेल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी शिक्षकांना मान्यता दिलेली आहे. त्या शाळांना 100 टक्के अनुदान मिळते याचा अर्थ त्या शाळेमध्ये सर्व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. आता त्या तुकड्यांना मान्यता देणे एवढाच प्रश्न आहे. शासन कोणते मूल्यांकन करणार आहे हे मला समजत नाही. शाळांसाठी मूल्यांकनांचे तत्व मान्य करु शकतो. तुकड्यांना अनुदान देताना मूल्यांकनाचा कोणताही विषय येत नाही. तेव्हा मूल्यांकनाचा अडथळा निर्माण करुन त्या तुकड्यांना अनुदानापासून वंचित ठेवू नये, शासनाच्या धोरणानुसार सन 2012-2013 पासून त्या तुकड्यांना अनुदान मिळावे. तेव्हा मूल्यांकनाचा मुद्दा वगळावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शाळा 100 टक्के अनुदानित असली तरी त्या शाळेची तपासणी होणार नाही, असे नाही. लर्निंग आऊटकम्स कशा प्रकारचे असावेत याबाबत आपण निकष ठरविलेले आहेत. शाळेत गळतीचे प्रमाण किती आहे, उपस्थिती किती आहे या सर्व बाबी तपासणे गरजेचे आहे. तेव्हा शाळांचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नाशिक जिल्ह्यातील भगर विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात येणे

मु.शी.: नाशिक जिल्ह्यातील भगर विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात येणे या संबंधी श्री. जयंवतराव जाधव, वि.प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो,

"राज्यात विविध भागात सन 2011 मध्ये भगरीच्या पीठातून विषबाधेची घटना घडल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील भगर विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात येणे, माहे डिसेंबर 2011 मध्ये राष्ट्रीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेल्या भगर नमुन्यातील भगरीमध्ये कुठलाही दोष नसल्याचा अहवाल प्राप्त होणे, मात्र प्रयोगशाळेचा अहवाल येऊन दोन महिने उलटत नाही तोच नाशिक जिल्ह्यातील भगर मिलवर पुन्हा एफडीएच्या वतीने छापे टाकणे, भगरीच्या पीठातून विषबाधा होऊनही प्रशासन पीठ तयार करणाऱ्या भगर मिलवर कारवाई करत आहे. संपूर्ण भारतात 90 टक्के भगर नाशिक जिल्ह्यातून विक्री केली जात असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही".

सभापती महोदय, गेल्या नवरात्रीच्या सुमारास पुणे आणि सांगली परिसरामध्ये भगरीच्या माध्यमातून विषबाधा झाली अशा बातम्या प्रसिध्द झाल्या. त्या बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषधे प्रशासनाने ज्या ज्या ठिकाणी विषबाधेचा प्रकार घडला त्या ठिकाणी खातरजमा करुन कारवाई सुरु केली. मुळात भगर यास वरीचे तांदूळ म्हणून देखील ओळखले जाते. नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातील जव्हार आणि शहापूर या आदिवासी तालुक्यात हे पीक घेतले जाते. कणसातून जो दाणा काढला जातो. या दाण्यातून आदिवासी बांधव वरीचे पीक घेतात. कणसे मिलमध्ये आणून त्यातून भगरीचे उत्पादन केले जाते. त्याला पॉलीश करण्याचा एक प्रकार आहे. या व्यतिरिक्त कोणतेही रसायन वा केमिकल भगर मिलमध्ये केले जात नाही. नाशिक जिल्ह्यामध्ये भगरीचे उत्पादन 90 टक्के आहे.

सभापती महोदय, सांगली आणि पुणे परिसरात भगरीच्या उत्पादनापासून होणाऱ्या पदार्थातून विषबाधा झाल्यानंतर अन्न व औषधे प्रशासनाने त्याचे नमुने तपासण्यासाठी घेतले असता असे निदर्शनास आले की, भगरीच्या पदार्थापासून विषबाधा झालेली नाही तर

यानंतर कु.थोरात...

अप्रधारित प्रश्न / शिफारशी नाही

श्री. जयवंतराव जाधव..

तर त्या भगरीच्या माध्यमातून जेथे पीठ तयार केले गेले त्या पीठामध्ये ती भेसळ झाली आणि त्यामुळे हा प्रकार घडला आहे असे निष्पन्न झालेले असताना सुध्दा प्रशासनाच्या माध्यमातून नाशिक व ठाणे जिल्हयामध्ये असलेल्या भगरीच्या मिलवर प्रचंड निर्बंध घालण्यात आले आहेत. त्या ठिकाणची पोलीस यंत्रणा असेल किंवा त्या ठिकाणी असलेल्या या खात्याच्या माध्यमातून तेथे जाऊन कारवाई करण्यात आली आणि या भगर मिल बंद करण्यात आल्या. या भगर मिलवर वेगवेगळया प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. वास्तविक भगर कोणत्याही केमिकलचा वापर न करता तयार होत असल्यामुळे याबाबतीत पीठ तयार करणाऱ्या कारखानदारावर कारवाई होणे आवश्यक होते पण ती कारवाई न होता भगर मिलवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे या भगर मिलच्या चालकांना आर्थिक आणि सामाजिक फटका बसलेला आहे.

सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, साधारणपणे 150 ठिकाणचे नमुने घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी फक्त चार ठिकाणचे भगर बाधित आहे असे सांगण्यात आलेले आहे. तसेच यामध्ये ग्लुकोसाईडचे अस्तित्व आहे असे निदर्शनास आलेले आहे. तसेच हे ग्लुकोसाईडचे अस्तित्व कोद्रा भगरीमुळे होते असे निष्पन्न झालेले आहे. परंतु नाशिक जिल्हा असेल, ठाणे जिल्हा असेल या ठिकाणी ही कोद्रा भगर उत्पादितच होत नाही हे सुध्दा मला या ठिकाणी शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, नाशिक व ठाणे जिल्हयातील भगर मिलवर जी कारवाई झालेली आहे ती चुकीची झालली आहे. जेथे पीठ निर्माण होते त्या ठिकाणी कारवाई करावयास पाहिजे होती त्या ठिकाणी कारवाई न करता नाशिक व ठाणे जिल्हयातील भगर मिलवर कारवाई झालेली आहे ती चुकीची आहे ती कारवाई दूर करावी अशी मी शासनाला या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून विनंती करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील भगर मिल चालविणाऱ्या व्यावसायिकांकडे या मध्यंतरीच्या प्रकारामुळे अतिशय संशयाने बघण्यात येत आहे. वास्तविक येथील भगरीचे राष्ट्रीय प्रयोग शाळेत जे नमुने पाठविण्यात आलेले आहेत त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा दोष नसल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. असे असताना पुन्हा एकदा कुठे तरी विषबाधा झाली हे कारण देऊन या सगळया भगर मिलवर बंदी घालण्यापर्यंतची मजल गेली आहे. हे सगळे होत असताना यातील प्रक्रियेचा जो भाग आहे तो नीट समजून घेण्याची आवश्यकता होती. भगर उत्पादित झाल्यानंतर त्यावर कोणत्याही रासायनिक प्रक्रियेशिवाय ती बाजारात उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याच्या पुढच्या टप्प्यामध्ये तिचे जेव्हा पीठ तयार करण्यात येते तेव्हा त्या ठिकाणी अशा प्रकारची भेसळ होण्याची शक्यता आहे. तेव्हा हा प्रकार म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी अशा प्रकारचा यातून निष्कर्ष निघू शकतो. भगर मिलवर करण्यात आलेल्या कारवाईमुळे नाशिक जिल्हयातील आणि ठाणे जिल्हयातील भगर उत्पादक आणि भगर मिल या व्यवसायात असलेल्या लोकांवर फार मोठे संकट आलेले आहे. म्हणून याचा पुनर्विचार करुन निश्चितपणे जर भेसळ झाली असेल आणि या भेसळीमुळे पीठामधून विषबाधा झाली असेल तर पुढच्या टप्प्यावरची जी प्रक्रिया आहे त्या ठिकाणी तपासणी करण्याची आवश्यकता आहे. म्हणून भगर मिलवर करण्यात आलेल्या कारवाईची गंभीर दखल घेऊन या भगर मिल व्यावसायिकांना यातून मुक्त करावे अशी मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा विषय या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केलेला आहे. उपवासाच्या दिवशी भगर खाल्ली जाते. देवाची श्रध्दा आपण उपवास पाळून करतो आणि किमान त्यामध्ये भेसळ असू नये हे तारतम्य या ठिकाणी कोठे तरी दिसून आलेले नाही. त्यामुळेच ही कारवाई झालेली आहे. सावा आणि वरई या दोन माध्यमातून ही भगर निर्माण होते. भगर तयार करणारे कारखाने किंवा त्याचे सॉर्टीन्ग करणारे कारखाने नाशिक आणि ठाणे या भागामध्ये जास्त आहेत. 90 टक्के कारखाने नाशिकमध्ये आहेत.

सभापती महोदय, मला पहिल्यांदा एका विषयाचा खुलासा करावयाचा आहे की, जे नमुने अप्रमाणित आढळून आलेले आहेत ते भगरीचेच आहेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे पिठाचे नमुने घेतले ते प्रमाणित म्हणून उपलब्ध झालेले आहेत. याची व्याप्ती खूप मोठी असल्यामुळेच पुण्याच्या लेबॉरटरीमधून त्यांचे टेस्टिंग केल्यानंतर म्हैसूरला देखील आपण हे नमुने पाठविले आणि म्हैसूरमधून त्याचे रिपोर्ट मागविले. त्यामध्ये देखील काही नमुने अप्रमाणित असल्याचे दिसून आलेले आहेत. म्हणजे ज्या कारखान्यामध्ये ही प्रक्रिया होते त्याच ठिकाणी काही फॉरेन ऑब्जेक्ट्स यामध्ये घातले गेलेले आहेत, हे यामधून सिध्द झालेले आहे. कारण या ठिकाणी पीठ तयार करणारा कारखाना कोठेही नाही. त्या भगरीचे किंवा वरईचे पीठ नंतर प्रत्येक जण आपापल्या परीने जसे लागेल तसे करतो. ज्या ठिकाणी पीठ करुन ऑफिशियली विकले जाते असा पिठाचा कारखाना या ठिकाणी कोठेही नाही. त्यामुळे या सर्व कारखान्यांमधून आपण जे काही नमुने घेतलेले आहेत त्यापैकी जे अप्रमाणित नमुने आलेले आहेत त्या संदर्भात आपल्या नवीन कायद्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई होणार आहे. कारण आता फूड सेफ्टी ॲक्ट आलेला आहे. त्या ॲक्टच्या कलम 49(2) अनुसार एक वर्षापर्यंतची शिक्षा असेल किंवा कोर्टामध्ये जो काही निर्णय होईल त्या पध्दतीने ही कारवाई होणार आहे. या ठिकाणी कोणावरही अन्याय होणार नाही, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे परंतु नाशिक जिल्ह्यामधील भगर कारखानदारांवर जी काही कारवाई झालेली आहे ती आधी मागे घेणार का असा जो मुख्य प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांचा होता त्या प्रश्नाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विक्रम काळे ...

उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. मला असे वाटते की, या सर्व प्रकरणामध्ये पीठ आणि भगर हे दोन वेगवेगळे भाग आहेत. भगर वेगळीकडे तयार होते आणि पीठ वेगळीकडे तयार केले जाते, हे आपल्याला माहीत आहे. भगर उपवासाच्या दिवशी वापरली जाते. उपवासाच्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्याचा उपयोग होतो. या ठिकाणी मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार झालेला आहे. असा प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून या संपूर्ण प्रकरणाची पुन्हा चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांना जास्तीत जास्त कडक शासन कायद्याच्या माध्यमातून करण्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे कोणतीही कारवाई मागे घेतली जाणार नाही. जे दोषी असतील त्यांच्यावर या ठिकाणी शंभर टक्के कारवाई होणार. जे नमुने प्रमाणित आले त्या कारखान्यावर कारवाई होण्याचा प्रश्नच येत नाही. ज्या कारखान्यातून घेतलेले सॅम्पल अप्रमाणित आढळून आले असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई होणार आहे. भविष्य काळात ही भेसळ होऊ नये यासाठी आपण एक कमिटी नेमलेली आहे. त्यामध्ये इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे लोक असतील, आरोग्य विभागाचे लोक असतील किंवा अन्न व औषध प्रशासनातील लोक असतील, त्यांच्या माध्यमातून भविष्य काळात असे चुकीचे प्रकार होऊ नयेत यासाठी उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने ही कमिटी स्थापन केलेली आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना एकच प्रश्न विचारावयाचा आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, भगरीमध्ये काही तरी भेसळ केली जाते. त्यामध्ये काय भेसळ केली जाते ? आपल्या महाराष्ट्रातील जो मराठी समाज आहे तो उपवासाच्या निमित्ताने वरईचा भात खातात. खासकरुन आमच्या कोकणामध्ये वऱ्याचा भात म्हणतो तो करुन खातात. यामध्ये भेसळ ओळखण्याची पध्दत जर आपण सांगणार नसाल किंवा काय भेसळ केली जाते हे सांगणार नसाल तर महाराष्ट्रातील जनता भेसळ कसे ओळखू शकेल. असे प्रकार वाढत राहिले तर त्यातून जास्त त्रास होईल. म्हणून यासाठी शासन ठोस उपाययोजना करणार का, ठोस पावले उचलणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या भगरीचे चार प्रकार आहेत. सावा व वरई हे दोन प्रकार आपल्या राज्यात तयार होतात. कोदरा व गुरजी हे दोन प्रकार इतर राज्यात तयार होतात. इतर राज्यातील प्रकार 20 रु. प्रती किलो या दराने मिळतात. आपल्या राज्यातील प्रकार 60 रु.प्रती किलो या दराने मिळतात. 20 रुपये दराच्या प्रकाराची भेसळ केल्यामुळे विषबाधा होते. त्यामुळे युरिक ॲसिड किंवा ग्लोकोसाईडच्या माध्यमातून काही परिणाम होण्याची शक्यता आहे. हे पीक शेतातून आणल्यानंतर सहा महिने तसेच ठेवून नंतर त्यावर प्रक्रिया करावी असे निष्कर्ष पुढे आलेले आहेत. या निष्कर्षांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून ही समिती नेमलेली आहे. फॅक्टरीवर काही निर्बंध आणल्याशिवाय सामान्य माणूस चांगली भगर ओळखू शकणार नाही. कारण त्याची लिटमस शासन टेस्ट करु शकत नाही. त्यामुळे कारखान्याच्या माध्यमातूनच चांगली भगर बाजारात यावी असा शासनाचा प्रयत्न राहील.

उप सभापती : अर्धा तासाच्या चर्चा संपलेल्या आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 20 मार्च, 2012 रोजी सकाळी 11 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 56 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 20 मार्च, 2012 रोजीच्या सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही